अल्पावधीत लोकप्रिय ठरलेले
ग्रंथप्रसाराला वाहिलेले दर्जेदार मासिक

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ सप्टेंबर, २०१५ ◆
◆ किंमत १५ रुपये ◆

## गणपती बाप्पा मोरया

सर्व वाचकांना गणेश चतुर्थीच्या हार्दिक शुभेच्छा...





# पुस्तक प्रकाशन सोहळा



मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे

## कसं बोललात!

जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार
आर. के. लक्ष्मण लिखित
'You Said It'! या 'कॉमन मॅन'च्या
व्यंगचित्रांच्या मराठीतील
सात भागांच्या संचाचे प्रकाशन




(डावीकडून) **श्रीमती कमला लक्ष्मण** (दिवंगत आर. के. लक्ष्मण यांच्या पत्नी),
**श्री. शां. ब. मुजुमदार** (कुलपती, सिम्बायोसिस विद्यापीठ),
**श्री. मंगेश तेंडुलकर** (ज्येष्ठ व्यंगचित्रकार),
**श्री. अविनाश भोमे** (अनुवादक),
डेलिहंटच्या **अंजली देशमुख** व
**श्री. सुनिल मेहता,** यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

# मेहता मराठी ग्रंथजगत

। सप्टेंबर २०१५ । वर्ष पंधरावे । अंक नववा ।

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी,
बाजीराव रोड, टेलिफोनभवनसमोर,
पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४
२४४७५४६२
Extension
(ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५

E-mail : info@mehtapublishinghouse.com

संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| संपादकीय | ४ | चिंतन | ८० |
| साहित्यवार्ता | ८ | विशेष | ८६ |
| पुरस्कार | २८ | श्रद्धांजली | ९० |
| पुस्तक परिचय | | बालनगरी | ९२ |
| क्रिटिकल मास | ३८ | | |
| अ नोट फ्रॉम इचियो | ५६ | | |

**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




## पुस्तके का वाचायची? कशी वाचायची?

अत्यंत वेगवान आणि अत्यंत स्वस्त अशा इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या या गदारोळात वाचनसंस्कृतीवरचा आपला विश्वास उडत चालला आहे. वाचायचे कशासाठी... वाचायची गरजच काय... असे प्रश्न अनेकांना पडतात. टेलिव्हिजनवर बरेच काही बघायला मिळते. वृत्तपत्रांमधून विविध विषयांवरची भरपूर माहिती मिळते. हॅरॉल्ड ब्लूम म्हणतो, 'म्हणून तर वाचनाची गरज आहे.' हॅरॉल्ड ब्लूम हा एक अमेरिकन साहित्य समीक्षक. तो विचारतो, 'आपल्याला उपलब्ध होणाऱ्या माहितीला आज अंत नाही; पण शहाणपण कुठं शोधायचं?'

त्यासाठी पुस्तकं हवीत; आणि पुस्तकं वाचायला हवीत. Information is endlessly available to us; where shall wisdom be found?

हॅराल्ड ब्लूम म्हणतो, 'तुम्ही नशीबवान असाल तर एखादा शिक्षक तुम्हाला भेटतो आणि तो शहाणपणाचा मार्ग दाखवतो. पण शेवटी तुम्ही एकटेच असता; आणि तेथे इतर कोणी मदतीला नसते.'

आपला एकाकी एकांतवास आपल्यासाठी वाचनाच्या रूपाने जणू सुखाचा महान खजिनाच खुला करते आणि हे सुख आपल्याला स्वास्थ्य देणारे असते.

वाचन तुम्हाला तुमच्या स्वतःमधल्या, तुमच्या मित्रांमधल्या आणि मित्र होऊ शकणाऱ्यांमधल्या वेगळेपणाकडे खेचून घेते.

It returns you to otherness, whether in yourself or in friends, or in those who may become friends.

Imaginative literature is otherness and as such alleviates loneliness.

We read not only because we cannot know enough people, but because friendship is so vulnerable, so likely to diminish or disappear, overcome by space, time, imperfect sympathies, and all the sorrows of familiar and professional life.

शेक्सपिअरचे एखादे नाटक वाचणे, एखादे भावगीत वाचणे आणि एखादी कादंबरी वाचणे, यांत काही फरक आहे का?

आपण कोण आहोत यावर हा फरक अवलंबून आहे. कारण आपण स्वतःला वाचन या क्रियेपासून दूर ठेवू शकत नाही.-

आपण बहुतेक सर्व जण काही विशिष्ट अपेक्षा ठेवून वाचनाकडे वळतो.

म्हणून एखादी कादंबरी वाचायला घेतो तेव्हा आपण स्वतःला किंवा आपल्या मित्रांना भेटणार आहोत अशी अपेक्षा असत. तशी ती नसेल तर निदान आपल्याला ओळखू येण्यासारखा समकालीन किंवा ऐतिहासिक सामाजिक वास्तवाला सामोरे जाणार आहोत, अशी अपेक्षा असते.

जॉन ॲशबेरीच्या काव्यसंग्रहाकडून असणाऱ्या माझ्या अपेक्षा आणि इरिस मरडोकच्या नव्या कादंबरीच्या आगमनाने माझ्या मनात निर्माण होणाऱ्या संवेदना यात फरक असतो.

सुमार लेखन हे सर्व सारखे असते; श्रेष्ठ लेखन हे विविध पातळ्यांवरचे असते. वाङ्मय प्रकार हे त्यातील विश्वासार्ह वर्गीकरण असते.

आजही नाट्यपूर्ण आणि निवेदनात्मक कविता लिहिल्या जातात आणि त्या वाचनीय असतात. पण त्यांची संख्या मोजकीच असते. मी ॲशबेरी वाचतो तेव्हा ॲशबेरीच्या पुनर्भेटीची अपेक्षा ठेवतो. माझा एकांतवास हा इतरांना आणि अदरनेससाठी भेटण्यासाठी आतुर असतो.

इरिस मरडोक ही आपल्या अत्यंत पारंपरिक चांगल्या कादंबरीकारांपैकी एक आहे. लोक, कथानक, आध्यात्मिक आणि लैंगिक चिंतन आणि आयरॉनिक सामाजिक शहाणपण मरडोकने मला 'ब्लीक हाऊस' किंवा 'मिडल मार्च' द्यावे अशी अपेक्षा मी करीत नाही.

कादंबऱ्या या पूर्वी कलात्मक आनंदासाठी आणि आध्यात्मिक अंतर्दृष्टीसाठी वाचल्या जात. या सहस्रकातही त्या त्याचसाठी वाचायला हव्यात.

हॅराल्ड ब्लूमने आपली भूमिका पुढीलप्रमाणे मांडली आहे.

आपली मते आणि निर्णय ठरवण्याची क्षमता आपण टिकवून धरायची असेल तर आपण आपल्यासाठी वाचन करीत राहायला हवे.

आपण कसे वाचतो?

आपण काय वाचतो?

हे सर्वस्वी आपल्यावर निर्भर असता कामा नये. पण ते का वाचतो हे सर्वस्वी आपला स्वतःच्या मर्जीवर आणि आवडीवर अवलंबून असते.

आपण केवळ वेळ घालवण्यासाठी वाचन करत असू, किंवा काही बाह्य तातडीच्या कारणासाठी वाचत असू; परंतु शेवटी वाचनाला काही वेळ लागत असतोच.

भगवद्‌गीतेचे वाचक काही विशिष्ट आत्मशोधाच्या दृष्टीने भगवद्‌गीतेचा मागोवा घेत असतात. त्यांना त्याबद्दल काही तातडी वा अधीरता असते, तशी तातडी वा अधीरता शेक्सपिअरचे नाटक वाचताना असण्याचे कारण नाही. पण शोध मात्र दोन्ही वाचताना समानच असतो.

वाचनाचा एक उपयोग- आपण स्वतः बदलासाठी स्वत:ची तयारी करीत राहणे. सर्वांत अंतिम परिवर्तन हे विश्वात्मक असते. हॅराल्ड ब्लूम वाचनाकडे एकट्याने एकाकीपणे करायचे कार्य म्हणून बघतो. एक शैक्षणिक उपक्रम म्हणून त्याकडे पाहत नाही.

आपण एकटे असतो आणि वाचत असतो तेव्हा ज्या रीतीने वाचत असतो, त्याद्वारा भूतकाळाशी बऱ्याच प्रमाणात आपण सांधा जोडत असतो.

आदर्श वाचक (आणि आयुष्यभरचा नायक) म्हणजे डॉ. सॅम्युएल जॉन्सन. त्याने अविरत वाचनाचे सामर्थ्य आणि मर्यादा दोन्ही जाणून, त्याबद्दल स्पष्टपणे मत मांडले आहे.

त्याच्या इतर सर्व क्रियांप्रमाणे, वाचनाने एक मुख्य उद्दिष्ट साधले पाहिजे. 'जे आपल्या जवळ येत असते, ज्याचा आपल्याला विशिष्ट कामासाठी वापर करता येतो, ते आत्मसात करणे.'

सर फ्रॅन्सिस बेकनने विशिष्ट कामासाठी वापर ही जॉन्सनची अपेक्षा आणखी स्पष्ट केली.

एखाद्याचे खंडन करण्यासाठी किंवा एखाद्याला खोटे ठरवण्यासाठी वाचू नका किंवा एखादी गोष्ट गृहीत धरून तिच्यावरील विश्वास दृढ करण्यासाठी वाचू नका; वक्तव्य वा उपदेश शोधण्यासाठी वाचू नका, तर प्रत्येक गोष्ट तोलून पाहून विचारात घेण्यासाठी वाचा.



## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

शॉप नं. - जी/१५, प्रोझन मॉल, चिखल ठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी www.wordpowerbookshop@gmail.com येथे संपर्क साधा.

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse




## सुहासिनी देशपांडे यांना 'निळू फुले स्मृती पुरस्कार'

विश्वकर्मा प्रतिष्ठानचा 'निळू फुले स्मृती कलागौरव पुरस्कार' अभिनेत्री सुहासिनी देशपांडे, सामाजिक कार्यकर्ते ज्ञानेश्वर भालेराव, सुदाम खैरनार, योग प्रशिक्षक दत्ता कोहिनकर, मृदंगवादक गणपत सुतार यांना ज्येष्ठ समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या हस्ते देण्यात आले.

## तीन कॅमेरे असलेला स्मार्टफोन

सध्याचे युग स्मार्टफोनचे म्हटले जाते. कारण जवळपास दर आठवड्याला कोणता तरी नवा स्मार्टफोन, वेगळ्या कोणत्या तरी फीचर्ससह बाजारात दाखल होतो. फ्लिपकार्टसारख्या वेबसाईटवर त्याची नोंदणी करून घेतली जाते आणि बघता बघता काही सेकंदांत तो 'आउट ऑफ स्टॉक'ही होतो. असाच एक नवा स्मार्टफोन 'झोलो' या कंपनीने दाखल केला आहे. त्याचे नाव आहे 'ब्लॅक' आणि त्याचे वैशिष्ट्य म्हणजे त्याला तीन कॅमेरे आहेत. १३ मेगापिक्सेल आणि दोन मेगापिक्सेल अशा क्षमतेचे दोन कॅमेरे मागच्या बाजूला आहेत. त्यांपैकी एक कॅमेरा फोटो टिपण्यासाठी, तर दुसरा कॅमेरा फोटोच्या खोलीचा अंदाज घेण्यासाठी आहे. त्यामुळे ज्याचा फोटो काढला जात आहे, ती गोष्ट जवळ आहे की लांब, हे फोनला कळते. त्यामुळे फोटो अधिक चांगला यायला मदत होते. फोटोसाठी वेगवेगळी फीचर्सही या फोनमध्ये उपलब्ध आहेत. वाइड अँगल लेन्स आणि फ्लॅशसह तब्बल पाच मेगापिक्सेलचा फ्रंट कॅमेराही या फोनला आहे. त्याशिवाय फोटो स्टुडिओ हे अॅडोबचे अॅप्लिकेशनही या फोनमध्ये असल्याने, फोटो एडिट करणे, अधिक सुंदर करणे शक्य होणार आहे.

दोन्ही बाजूंना असलेल्या कॉर्निंग गोरिला ग्लासमुळे हा फोन मजबूत असून, त्याची जाडी केवळ ७.३ मिलिमीटर एवढीच आहे. या फोनचा

स्क्रीन १९२० बाय १०८० एवढ्या रिझॉल्युशनचा, साडेपाच इंची आणि एचडी क्षमतेचा आहे. सेकंड जनरेशन क्वालकॉम स्नॅपड्रॅगन ऑक्टा कोअर प्रोसेसर, दोन जीबी रॅम, हायब्रिड ड्युएल सिम, १६ जीबीची अंतर्गत आणि ३२ जीबी एक्स्पांडेबल मेमरी, ३२०० एमएएचची बॅटरी, वेगाने चार्जिंग होण्यासाठी क्विक चार्ज तंत्रज्ञान अशी वेगवेगळी फीचर्स या फोनमध्ये आहेत. या फोनची किंमत १२,९९९ रुपये आहे. 'झोलो' ही भारतीय कंपनी असून, २०१२ मध्ये या कंपनीने झोलो एक्स ९०० हा इंटेल प्रोसेसर असलेला जगातील पहिला स्मार्टफोन सादर केला होता.

## विश्वास पाटील यांची नवी कादंबरी : लस्ट फॉर लालबाग

'संभाजी'कार विश्वास पाटील हे मराठी कादंबरीमधील अग्रगण्य नाव. पानिपत, झाडाझडती, संभाजी, महानायक अशी एकाहून एक सरस साहित्यलेणी विश्वास पाटील यांनी मराठी भाषेला दिली आहेत. दीर्घ कालावधीनंतर विश्वास पाटील यांची नवी कादंबरी 'लस्ट फॉर लालबाग' नोव्हेंबरमध्ये प्रसिद्ध होत आहे, असे पत्रकार परिषदेत जाहीर करण्यात आले.

केवळ महाराष्ट्राचे नव्हे, तर साऱ्या देशाचे अर्थकारण ढवळून काढणारा, लालबाग-परळच्या कापडगिरणीत काम करणाऱ्या लक्षावधी कामगारांचे अन् कुटुंबीयांचे जीवन उद्ध्वस्त करणारा दीर्घ संप. त्या संपात अनेकांच्या संसाराची वाताहत झाली. त्यांच्यापैकीच एक इंदाराम. पण ही कथा फक्त इंदाराम अन् त्याची पत्नी अंजू यांची नाही. त्याचे आई-वडील तात्या अन् आवशी यांचीही नाही.

संपाचे नेते डॉ. दत्ता सामंत, महाराष्ट्र राज्याचे अनेक मुख्यमंत्री अन् राजकारणी, मुंबई तराजूत तोलणारे धनदांडगे गिरणीमालक, मुंबईला चॉपरच्या धारेवर अन् बंदुकीच्या नळीवर वेठीला धरणारे भाईलोक आणि या साऱ्या संघर्षात कळत-नकळत भरडले जाणारे असंख्य सामान्यजन या सर्वांनी घडवलेली ही कथा आहे.

## 'बालशिक्षण गाथा'चे प्रकाशन

"चांगला माणूस घडविणे ही काळाची गरज बनली आहे. असा माणूस घडविण्याचे आव्हान आजच्या शिक्षकांसमोर आहे." असे मत कवी प्रवीण दवणे यांनी व्यक्त केले.

स्नेहल प्रकाशनाच्या वतीने रजनी दातेलिखित 'बालशिक्षण गाथा' ग्रंथाचे प्रकाशन झाले. शिक्षणतज्ज्ञ वा.ना. दांडेकर, आमदार मेधा कुलकर्णी, प्रकाशक रवींद्र घाटपांडे उपस्थित होते.

दवणे म्हणाले, ''आपल्याला स्वातंत्र्य मिळवून सात दशके होत आली, मात्र तरीही आपण शिक्षण कसे असावे याबद्दल विचार करत आहोत; दुर्दैव म्हणावे लागेल. आजच्या काळात शिक्षकांमधील पालक आणि पालकांमधील शिक्षक जागा होण्याची गरज आहे. कलावंत जन्माला यावा लागतो, तसेच शिक्षकाचेही आहे. शिक्षकही जन्माला यावा लागतो. पण आज आदर्श शिक्षकांची पिढी हरवत चालली आहे.''

बालशिक्षणाचे महत्त्व सांगताना दांडेकर म्हणाले, ''आपल्या पाल्याला 'ट्विंकल ट्विंकल लिट्ल स्टार' अशी एखादी इंग्रजी कविता आणि सुरवातीचे पाढे तोंडपाठ असले की तो हुशार, असे समजले जाते. खरे तर बालशिक्षण म्हणजे, नको त्या वयात नको ते पाठांतर करून घेणे नव्हे, तर बालशिक्षण हा शिक्षणाचा पाया असल्याचे समजून घेतले पाहिजे.''

## 'रारंगढांग'चे अभिवाचन लॉस एंजेलिसमध्ये

लॉस एंजलिसमध्ये झालेल्या बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या यंदाच्या सतराव्या अधिवेशनाचे खास वैशिष्ट्य ठरले प्रभाकर पेंढारकर यांच्या 'रारंगढांग'या प्रसिद्ध कादंबरीवर आधारित नाट्य अभिवाचन. तीन ते पाच जुलै या कालावधीत ॲनाहोम कन्व्हेन्शन सेंटर येथे हे अधिवेशन झाले. अधिवेशनातील सादरीकरणासाठी आलेल्या शंभराहून अधिक प्रवेशिकांमधून 'रारंगढांग'ची निवड करण्यात आली होती. हिमालयातील बॉर्डर रोडच्या बांधणीसाठी आलेल्या प्रगल्भ नागरी (सिव्हिलियन) अभियंत्याचा आर्मीच्या शिस्तीशी आणि आपल्या कामाच्या गुणवत्तेशी सांगड घालताना होणारा संघर्ष या अभिवाचनातून कलाकारांनी समर्थपणे व्यक्त केला. या अभिवाचनाचे संकलन 'कलापिनी'चे डॉ. अनंत परांजपे यांचे होते, तर दिग्दर्शन शैलेश अरोरा यांनी केले होते. अमोल खरे, वासुदेव झोडे, विनायक देशपांडे, योगेश चोपडे, शैलेश अरोरा आणि मोहन कुंठे यांनी अभिवाचन केले.

## लैंगिकतेवर आता मराठीतून संवाद

लैंगिकता, लिंगभेद आदी अडचणीच्या विषयांवर सहजपणे मराठीतून माहिती मिळावी यासाठी 'तथापि' संस्थेने 'लेट्स टॉक सेक्शुॲलिटी' ही वेबसाइट कार्यान्वित केली. शारीरिक बदलांच्या काळातील विविध समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी ही वेबसाइट मदतनीस ठरणार आहे. या वेबसाइटचे उद्घाटन अभिनेत्री नेहा महाजन हिच्या हस्ते झाले. त्या वेळी मेधा काळे, सामाजिक कार्यकर्त्या नंदिता अंबिके उपस्थित होत्या.

'लैंगिकता संकल्पनेची दैनंदिन जीवनात आपण रोज दखल घेतो असे नाही. लैंगिकता ही जगण्याची मूलभूत अशी गोष्ट आहे. स्त्री-पुरुष एकत्र येणे म्हणजे लैंगिक संबंध नव्हे, तर माणूस म्हणून एकत्र येणे हा विचारदेखील महत्त्वाचा आहे,' असे मत नेहा महाजन हिने व्यक्त केले.

'लहानांपासून ते मोठ्यापर्यंत लैंगिकतेची माहिती पोहोचविण्यासाठी वेबसाईट तयार करण्याचा निर्णय घेतला. याबाबतची माहिती मराठीत मिळणे महत्त्वाचे आहे,' असे नंदिता अंबिके यांनी सांगितले.

## देशात ९७ कोटी मोबाईल

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मनातील 'डिजिटल इंडिया'ची संकल्पना जेव्हा पूर्ण होईल तेव्हा होईल; पण त्याआधीच सव्वाशे कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेला हा अवाढव्य देश 'मोबाइल इंडिया'चे बिरुद मिरवू लागला आहे.

देशातील टेलिफोन जोडण्यांची संख्या १५ मेपर्यंत १०० कोटींवर गेली आहे. मोबाइलच्या झपाट्यापुढे लँडलाइन पुरता मागे पडल्याचेही ही आकडेवारी सांगते. देशातील लँडलाइनची संख्या दोन कोटी, ६२ लाख, तर मोबाइलची संख्या ९७ कोटी, ५७ लाख, आहे.

देशातील फोनजोडण्या घेण्याचा वेगही चांगला आहे. १५ एप्रिल रोजी एकूण फोनधारकांचा आकडा ९९ कोटी, ९७ लाखांच्या घरात होता; तो महिनाभरात एक अब्ज दोन कोटींच्या घरात पोहोचला, अशी आकडेवारी ट्रायने जाहीर केली आहे.

देशातील टेलिफोनव्याप्तीचे प्रमाण ७९.५६ इतके आहे. म्हणजेच साधारण प्रत्येक १०० व्यक्तींमागे फोनजोडण्यांची संख्या सरासरी ८० आहे. राज्यानुसार विचार केल्यास दिल्लीत प्रत्येक व्यक्तीमागे सरासरी दोन फोन

असून, ही व्याप्ती देशातील सर्वाधिक आहे. बिहार यात सर्वांत मागे असून, तेथे सरासरी दोन व्यक्तींमागे एक फोन आहे. महाराष्ट्रातील फोनव्याप्तीची टक्केवारी ९२च्या घरात आहे. म्हणजेच महाराष्ट्रात सरासरी माणशी एक फोन आहे.

देशातील एकूण शहरी भागाचा विचार करता, फोनव्याप्तीचे प्रमाण किंचित घटले असून, ग्रामीण भागात ते वाढले आहे.

## कार्डांच्या व्यवहारांना धोका

सध्या अनेक देश सर्व प्रकारचे आर्थिक व्यवहार 'कॅशलेस' करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भारतातही 'डिजिटल इंडिया' मोहिमेच्या माध्यमातून नागरिकांनी दैनंदिन जीवनात तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर करावा यासाठी सरकार आग्रही झाले आहे. आर्थिक व्यवहारांमध्ये इंटरनेट बँकिग, फोन बँकिंग, क्रेडिट कार्ड, डेबिट कार्ड यांसारख्या सुविधांचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. त्याच वेळी या सुविधांची दुसरी बाजूही तितक्याच वेगाने पुढे येत आहे.

'क्विक हील'ने प्रसिद्ध केलेल्या अहवालानुसार सायबर गुन्हेगारांनी आता क्रेडिट-डेबिट कार्डांद्वारा होणाऱ्या व्यवहारांवर लक्ष केंद्रित केले असून, विविध दुकानांमध्ये कार्ड स्वाइप करण्याच्या मशिनवर हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. सायबर गुन्हेगारांनी बँकिंग क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे. खोटे ई-मेल्स, सोशल साइट्स आणि इतर माध्यमांद्वारा हे व्हायरस कॉम्प्युटर, एटीएम मशिन किंवा मोबाइलमध्ये सोडले जात आहेत. याशिवाय ग्राहकांच्या क्रेडिट आणि डेबिट कार्डांचा ताबादेखील हे गुन्हेगार घेत आहेत. विंडोजवरील बहुतांश व्हायरस ३२ बिट मशिनवर काम करतात; मात्र ६४ बिटवर काम करू शकत नाहीत.

एप्रिल ते जून २०१५ या कालावधीत दरमहा तब्बल पाच लाख मालवेअर सॅम्पल्सची नोंद झाली. जानेवारी ते मार्च २०१५ च्या तुलनेत ही वाढ १६ टक्के होती. काही मालवेअर मोबाइलमधील प्री-इन्स्टॉल्ड ॲपमधूनच आले होते. अँड्रॉइडवरील जाहिरातींच्या माध्यमातूनही व्हायरस सोडण्याचे प्रमाण खूप असल्याचे लक्षात आले आहे. ६७ टक्के सॅम्पलमध्ये त्याचे प्रमाण आढळून आले. या मालवेअर्समध्ये 'अँड्रॉइड, एअरपुश जी' हा मालवेअर मोठ्या प्रमाणात आढळून आला.

सायबर गुन्हेगारांनी आर्थिक व्यवहारांकडे लक्ष वळविले असल्याने, क्रेडिट किंवा डेबिट कार्डाचा वापर करताना, इंटरनेट बँकिंगचा उपयोग करताना ग्राहकांनी खबरदारी घेतली पाहिजे, विशेषतः कार्डाचे पिन नंबर आणि इंटरनेटचे पासवर्ड अन्य व्यक्तींसमोर उघडू करू नयेत, असा सल्ला तज्ज्ञांनी दिला आहे.

## चौथे विश्व संमेलन

अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या चौथ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान ज्येष्ठ लेखक व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या साहित्याचे अभ्यासक डॉ. शेषराव मोरे भूषवणार आहेत. अंदमान येथे ५ व ६ सप्टेंबर रोजी संमेलन होणार आहे.

कविवर्य ना. धों. महानोर यांनी राज्यात दुष्काळ असल्याच्या पार्श्वभूमीवर, अध्यक्षपद स्वीकारण्यास नकार दिला होता. त्यामुळे अंदमानच्या विश्व संमेलनासाठी अध्यक्ष कोण, याची साहित्यप्रेमींमध्ये उत्सुकता होती. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सुवर्ण स्मृती वर्षानिमित्त विश्व संमेलन अंदमान येथे होत असल्याने, सावरकरांच्या साहित्याचे अभ्यासक असलेल्या डॉ. मोरे यांचे नाव अध्यक्षपदासाठी निश्चित करण्यात आले. ऑफबीट डेस्टिनेशन व पोर्ट ब्लेअर येथील महाराष्ट्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे.

'विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होणे ही घटना आनंददायीच आहे. मात्र, स्वातंत्र्याचा तर्कशुद्धपणे व तटस्थपणे केलेल्या अभ्यासाचा हा सन्मान आहे,' अशी भावना नवनिर्वाचित संमेलनाध्यक्ष डॉ. शेषराव मोरे यांनी व्यक्त केली.

## 'रुढार्थाने मी साहित्यिक नाही'

''संमेलनाध्यक्षपदासाठी माझे नाव पुढे आल्यावर महामंडळाला मी रूढार्थाने साहित्यिक नसल्याचे कळवले होते. आजपर्यंत मी कथा, कविता, कादंबरी, ललित लेख असे साहित्य लिहिलेले नाही; मात्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास, कायदा हे साहित्याचे विषय नाहीत का, की कथा, कविता, कादंबरी हेच साहित्य आहे?,'' असा सवाल विश्व मराठी साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित अध्यक्ष डॉ. शेषराव मोरे यांनी उपस्थित केला.

“सावरकरांचे विचार आज देशाला आवश्यक आहेत. त्यांनी धर्मनिरपेक्ष, अंधश्रद्धाविरोधी, भाषाशुद्धी, सामाजिक विकास आदी विषयांवर मौलिक विचार मांडले आहेत. मात्र, सावरकर समाजाला कळलेच नाहीत. त्यांचे विचार कालबाह्य झालेले नाहीत,” असेही मोरे यांनी सांगितले. “जीवनात दुःखाची नेहमीच कारणे असतात; मग आनंद साजरा करायचाच नाही का? दुःखी असतानाही वारकरी पंढरीची वारी करतातच. त्यामुळे दुष्काळाचे दुःख विसरण्यासाठी अंदमानच्या संमेलनात सहभागी व्हा. अंदमान ही साहित्याची पंढरीच आहे.”

## राष्ट्रगीतामधील अधिनायक शब्द ‘पंचम जॉर्ज’साठी नाही

राष्ट्रगीतामधील ‘अधिनायक’ हा शब्द राज्यकर्त्यांचा गौरव करणारा असल्याने तो त्यातून वगळण्यात यावा, असा दावा राजस्थानचे राज्यपाल कल्याणसिंह यांनी केल्यानंतर नवा वाद निर्माण झाला होता. कल्याणसिंह यांच्या या वक्तव्याचे पडसाद टागोरांची कर्मभूमी असणाऱ्या पश्चिम बंगालमध्ये उमटले नसते, तरच नवल.

‘अधिनायक’ हा शब्द भारतमातेला अनुसरून वापरण्यात आल्याचे दिसून येते, असे एक मत आहे. दरम्यान, रवींद्रभारती विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. पवित्र सरकार यांनी वेगळा तर्क मांडला. राष्ट्रगीतामधील अधिनायक शब्द हा भारतीयांच्या जागृत मनोवस्थेला उद्देशून वापरण्यात आला आहे. राष्ट्रगीतामध्ये सुधारणा करण्याची कल्याणसिंह यांची मागणी चुकीची असल्याचे त्यांनी सांगितले.

कोलकात्यामध्ये २६ डिसेंबर १९११ रोजी भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसच्या अधिवेशनामध्ये राष्ट्रगीताचे सर्वप्रथम गायन करण्यात आले होते. खुद्द रवींद्रनाथ टागोरांनी त्याचे गायन केले होते. पुन्हा दुसऱ्या दिवशीही त्याचे गायन करण्यात आले. त्या वेळीही अनेकांनी ‘अधिनायक’ या शब्दाला आक्षेप घेतला होता; पण तो वाद लवकरच संपला. बंगालमधील तत्कालीन विचारवंतांना या शब्दामागची राष्ट्रवादी प्रेरणा माहीत होती.

स्टेट्समन, इंग्लिशमन आणि दि इंडियन या तत्कालीन इंग्रजी वर्तमानपत्रांनादेखील टागोरांनी ‘अधिनायक’ हा शब्द पंचम जॉर्ज यांच्यासाठी वापरल्याचा दावा केला होता. त्या दैनिकांच्या संपादकांना बंगाली आणि हिंदी भाषेचे फारसे ज्ञान नसल्याने, त्यांच्याकडून ही गफलत झाल्याचे बोलले

जाते. याच वेळी राजभूज चौधरी यांनी गायलेले 'बादशाह हमारा' हे गीत पंचम जॉर्ज यांना उद्देशून असल्याचे सांगितले जात होते.

तब्बल २५ वर्षांनी टागोरांनी आपली भूमिका स्पष्ट केली होती. राष्ट्रगीतामधील 'अधिनायक' हा शब्द पाचव्या किंवा सहाव्या जॉर्जसाठी नसून, तो भारतातील जनतेला उद्देशून वापरण्यात आल्याचे त्यांनी म्हटले होते. राष्ट्रगीतामधील 'सिंध' हा शब्द पाकिस्तानातील सिंध प्रांताशी संबंधित नसून तो सिंध संस्कृतीशी निगडित असल्याचे नंतर स्पष्ट केले होते. यामुळे अनेक विचारवंतांचा राष्ट्रगीताला असणारा विरोध मावळला होता. यांत काँग्रेस नेत्यांचाही समावेश होता.

## संतकवींची चित्रे, शिल्पे अन् प्रतिमाही

संतकवींच्या भक्तिरसातील भावनेचा आदर करण्यासाठी चित्र, प्रतिमा आणि शिल्प कलाकृतींचे एक प्रदर्शन बालगंधर्व रंगमंदिर येथे आयोजिण्यात आले होते.

प्रदर्शनाचे उद्घाटन डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते १६ जुलैला झाले. या वेळी अतुल पेठे दिग्दर्शित 'ऐसे कैसे झाले भोंदू' हे रिंगणनाट्य, शास्त्रीय गायिका अंजली मालपेकर यांचा 'नामा म्हणे' हा अभंगांचा कार्यक्रम झाला.

कविसंमेलनात श्रीधर नांदेडकर, नारायण लाळे, अजय कांडर, अंजली कुलकर्णी, सुजाता महाजन, रवी कोरडे, शर्मिष्ठा भोसले, प्रशांत चव्हाण, नितीन केळकर आदी सहभागी झाले होते.

शाहीर संभाजी भगत हे अध्यक्षस्थानी होते.

दिल्लीच्या ललित कला अकादमीने पुण्यात 'वारी'वर एक कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेतील सहभागी कलाकारांनी एकत्र येऊन हे प्रदर्शन आयोजिले होते. जयंत जोशी, शरद कापुसरकर व स्वाती कापुसरकर यांच्यासह २० कलाकारांचा सहभाग होता.

## 'बौद्ध धर्मात पुनर्जन्म ही प्रचलित संकल्पना'

हिंदू धर्मच नव्हे, तर बौद्ध धर्माचाही पुनर्जन्मावर विश्वास असावा. पुनर्जन्म ही संकल्पना बौद्ध धर्मामध्ये इसवी सनाच्या पूर्वीपासून प्रचलित असावी, असा दावा महाराष्ट्र नाणक परिषदेचे कार्यवाह देवदत्त अनगळ यांनी केला.

साउथ अँड साउथ ईस्ट एशियन असोसिएशन फॉर द स्टडी ऑफ कल्चर अँड रिलिजनची सहावी आंतरराष्ट्रीय परिषद नुकतीच श्रीलंकेत झाली. या वेळी अनगळ यांनी बौद्ध धर्मावरील शोधनिबंध सादर केला. यामध्ये त्यांनी पुनर्जन्माविषयीचे संशोधन मांडले आहे.

निरनिराळ्या बारा मूर्तींचा आधार या संशोधनासाठी घेतला आहे. आठ, नऊ आणि अकरा मस्तके असणारी, हावभाव, हातांची संख्या आणि आकार असलेल्या अशा वैशिष्ट्यपूर्ण मूर्ती अनगळ यांनी परिषदेत सादर केल्या. बौद्ध धर्मातील श्रावकापासून ते बोधिसत्त्वापर्यंत आणि अवलोकितेश्वरापर्यंतचा भिक्षूंचा प्रवास अनेक जन्मांपासून होतो. ही संकल्पना महायान पंथाच्या दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रत्यक्षात होती. त्या प्रकारच्या प्रतिमांची किंवा मूर्तीची पूजा भिक्षू करत असावेत, असा निष्कर्ष अनगळ यांनी काढला आहे. त्यासाठी त्यांनी मलेशियातील बुद्धिस्ट मिशनरी सोसायटीने १९८३ मध्ये प्रकाशित केलेल्या 'जेम्स ऑफ बुद्धिस्ट विझ्डम' या पुस्तकाचा आधार घेतल्याचे सांगितले.

## कंपन्यांचा विश्वास मोबाईल ॲपवरच

स्मार्टफोनच्या वाढत्या संख्येमुळे 'बिझनेस' करण्याची बाजारपेठेचीही संकल्पना बदलत चालली आहे. ऑनलाइन मार्केटिंग करणाऱ्या कंपन्यांनी स्मार्टफोनच्या वाढत्या संख्येकडे बघता, आपल्या व्यवसायाच्या पद्धतीत बदल केला आहे. फ्लिपकार्टने सप्टेंबरपासून आपली वेबसाइट बंद करून फक्त मोबाइल ॲपच्या माध्यमातून व्यवसाय करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

'फ्लिपकार्ट'चे ॲप केवळ अँड्राइड नव्हे, तर ओएस आणि विंडोज सिस्टीम असलेल्या मोबाइलमध्येही उपलब्ध आहे. कंपनीच्या मालकीच्या असलेल्या 'मिंत्रा' या ऑनलाइन मार्केटिंग कंपनीने यापूर्वीच आपली वेबसाइट बंद करून ॲपच्या माध्यमातून बिझनेस करण्यास सुरुवात केली आहे. आता फ्लिपकार्टनेही तेच पाऊल उचलण्याचे ठरवले आहे. कंपनीचे चीफ प्रॉडक्ट ऑफिसर पुनित सोनी यांनी हा धाडसी निर्णय जाहीर केला.

ऑनलाइन मार्केटिंग करणाऱ्या कंपनींमध्ये सुमारे ७० टक्के व्यवसाय ॲपच्या माध्यमातूनच होतो. 'मिंत्रा'ने दोन महिन्यांपूर्वीच वेबसाइट बंद करून ॲपच्या माध्यमातून व्यवसाय कार्यान्वित केल्यानंतर कंपनीला केवळ १०

टक्के विक्री घटल्याचा अनुभव आला. परंतु, ९० टक्के ॲप व्हिजिटमधून ७० टक्के खरेदी झाल्याचे आढळून आले. या पार्श्वभूमीवर 'फ्लिपकार्ट'नेही ॲपच्या माध्यमातून व्यवसाय करण्याला प्राधान्य दिले आहे. असा प्रयोग करणारी 'फ्लिपकार्ट' काही एकमेव कंपनी नाही. 'स्नॅपडील' कंपनीचे कुणाल बहल यांनीही गेल्या वर्षी झालेल्या गुगल इव्हेंटमध्ये या संदर्भातील निरीक्षणे मांडली होती. देशातील टु टायर आणि थ्री टायर सिटीमध्ये ऑनलाइन खरेदी करण्यासाठी डेस्कटॉप किंवा कॉम्प्युटरऐवजी मोबाइलचा अधिक वापर होत असल्याचे आढळून आले आहे.

**'ट्रूकॉलर'ची मेसेंजर सर्व्हिस**

मोबाइलवर आलेल्या अनोळखी कॉलची चुटकीसरशी माहिती देणारे ॲप म्हणून प्रसिद्ध असलेल्या 'ट्रूकॉलर' या कंपनीने आपली स्वतःची मेसेंजर सर्व्हिस सुरू केली आहे. सध्या 'ट्रूकॉलर'चे जगभरात १५ कोटी मोबाइल ग्राहक आहेत. 'ट्रूकॉलर'च्या मेसेंजर सर्व्हिससाठी कोणतेही चार्जेस आकारले जाणार नाहीत.

## नेटिझन्सना सरकारचा आधार

सध्या भारतामध्ये ९८ कोटी मोबाईलधारक असून, त्यांतील ३० कोटी लोक हे ॲक्टिव्ह इंटरनेट युजर्स आहेत. पुढील दोन वर्षांमध्ये ही संख्या ९८ कोटींवर नेण्याचा सरकारचा इरादा आहे. तसेच देशभरातील अडीच लाखांपेक्षाही अधिक पंचायती इंटरनेटच्या माध्यमातून जोडल्या जातील, असे रविशंकर प्रसाद यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. देशातील इलेक्ट्रानिक वस्तूंच्या उत्पादक कंपन्यांकडून २४ ते २५ हजार कोटी रुपयांचे प्रस्ताव मिळाले असून, त्यांपैकी बारा हजार कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे, असे त्यांनी सांगितले.

## अभिवाचनातून उलगडले 'शंभर मी'

आपल्या लेखनातून वाचकाला अंतर्मुख करत आपल्या भवतालाविषयी विचार करायला भाग पाडणारे लेखक म्हणजे श्याम मनोहर. त्यांच्या विविधांगी लेखनापैकी एक वेगळ्या धाटणीची कादंबरी म्हणजे 'शंभर मी'. व्यक्ती आणि समाज या दोन्हींवर अनेक बाजूंनी भाष्य करणाऱ्या या कादंबरीचे व्यासंगी पद्धतीने केलेले अभिवाचन रसिकांना अनुभवता

आले.

'महाराष्ट्र गांधी स्मारक निधी' आणि 'शब्दमित्र' संस्थेने आयोजिलेल्या एका कार्यक्रमात गांधी भवन येथे हे अभिवाचन झाले. रणजित मोहिते, प्राजक्ता पाटील, कृतार्थ शेवगावकर आणि हर्षा औताडे या कलाकारांनी केलेल्या अभिवाचनाला उपस्थितांची उत्स्फूर्त दाद मिळाली. कवयित्री अंजली कुलकर्णी आणि अनुराधा काळे यांनी या प्रयोगाचे दिग्दर्शन केले. कुमार सप्तर्षी, अन्वर राजन, तसेच स्वतः श्री. मनोहर उपस्थित होते. मनोहर यांच्याच 'कथित आणि लिखित' या पुस्तकाचे, तसेच कुलकर्णी यांच्या 'रात्र, दुःख आणि कविता' या कवितासंग्रहाचे या वेळी प्रकाशन झाले.

समाजातील विविध स्तरांवरील व्यक्तिरेखा... कित्येकदा तर निर्जीव वस्तूंनाही व्यक्तिरेखा म्हणून उभे करणाऱ्या या कादंबरीचा आशय आणि त्यातून येणारे समाजातील विपरीत वास्तव, असे सारे अभिवाचनातून उभे करण्यात आले. जगणे, मरणे, सुख, दुःख, भास आणि एकूणच जीवनविषयक तत्त्वज्ञान मनोहर यांच्या लेखणीच्या औपरोधिक शैलीचा अनुभवही उपस्थितांना मिळू शकला.

## 'काना-मात्रा-वेलांटी'चे नाना पाटेकर यांच्या हस्ते प्रकाशन

''माझी म्हणून सुखे-दुःखे कुरवाळत बसायला मला वेळ मिळत नाही. एका भूमिकेच्या सुख-दुःखातून बाहेर पडलो की, दुसऱ्या भूमिकेसाठी सुख-दुःखाचा जोगवा मागतो. नाटक-चित्रपट हा माझा कित्ता गिरवणं असतं. या अभिव्यक्तीतून मी पोहोचण्याचा प्रयत्न करतो. अच्युत पालवच्या हाताची चवच वेगळी आहे. त्याच्या हाताने अक्षरे वळतात आणि घडतात. आता सगळं सहज, सोपं मिळतंय. त्यामुळे आळस आलाय. महापुरुषांची नावे घेऊन आपले कोतेपण लपवण्याची वृत्ती वाढते आहे. थोडी वेगळी पायवाट धुंडाळायला वेळच होत नाही,'' अशा शब्दांत प्रसिद्ध अभिनेते नाना पाटेकर यांनी मर्मावर बोट ठेवले.

प्रसिद्ध सुलेखनकार अच्युत पालव यांच्या 'काना-मात्रा-वेलांटी' या देवनागरी सुलेखन कित्त्याचे प्रकाशन नाना पाटेकर आणि चैतन्यमहाराज देगलूरकर यांच्या हस्ते झाले. या निमित्ताने नर्मविनोदी शैलीत नाना पाटेकर यांनी बालपणीच्या आठवणींना उजाळा देत शब्दमैफल रंगविली.

''शाळेत असताना मी वांड होतो. विद्यार्थ्यांमध्ये कधी बसलोच नाही.

सारखं मारायला कोण उठणार, म्हणून गुरुजी मला आपल्याजवळ बसवून घ्यायचे. अंगठे धरण्याची शिक्षा मिळायची. त्यामुळे फळ्यावरचे सुविचार मी नेहमी उलटेच वाचले. पण माझे अक्षर सुंदर. मित्रांच्या लग्नपत्रिका मीच लिहिल्या. सर्वांची लग्नं अजूनही टिकून आहेत, हाच त्या अक्षराचा फायदा. जे. जे. कला महाविद्यालयात कॅलिग्राफी हा माझा विषय होता. हल्ली थोडं काही केले की प्रदर्शन भरविण्याची आणि मार्केटिंग करण्याची हौस असते. अच्युतने २५ वर्षांच्या साधनेनंतर वेगवेगळे प्रयोग केले,'' अशा शब्दांत पाटेकर यांनी पालव यांचा गौरव केला. अच्युत जे पेरतो आहे ते रुजू दे, अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली.

''मला माहीत असलेली मुंबई आणि पुणं आता लोप पावलंय. पुण्यामध्ये आम्ही तिरकस बोलत असलो तरी आपुलकी असायची. ही आपुलकी लोप पावली असून, भांडण आणि गाड्यांची जाळपोळ का होतेय,'' असा सवालही पाटेकर यांनी केला.

नाना पाटेकर म्हणाले, ''नटसम्राट हे नाटक करावेसे वाटत होते. नाटक नाही केले तरी चित्रपट केला. त्या भूमिकेच्या अनुभवातून जात असताना कलाकार आणि माणूस म्हणून त्रास झाला. मला इतका त्रास होत असेल तर, डॉ. श्रीराम लागू, सतीश दुभाषी, यशवंत दत्त, चंद्रकांत गोखले, राजा गोसावी यांनी इतके प्रयोग कसे केले, याचेच नवल वाटले. प्रत्येक प्रयोग म्हणजे कित्ता गिरवणेच आहे. मला कित्ता गिरवता आला नाही. नट म्हणून गवसणे म्हणजे काय, याचा आनंद या भूमिकेने दिला.''

देगूलरकर म्हणाले, ''शब्द आणि अक्षर ही मानवाची मूलभूत अभिव्यक्ती आहे. त्यातही शब्दापेक्षा अक्षराला महत्त्व आहे.''

काळाच्या ओघात नष्ट होणारी कला पालव यांनी पुन्हा आपल्यासमोर आणली असून, त्यांचा हा कित्ता अनेकांनी गिरवावा असाच आहे. मन वळले की पेन वळते आणि पेन वळले की अक्षरेही वळतात, अशी भावना व्यक्त करीत अच्युत पालव यांनी आपला कलाप्रवास उलगडला.

## ग्रंथ प्रदर्शनात धार्मिक पुस्तकांना मागणी

वाचकांची अभिरुची बदलत असल्यामुळे मराठी पुस्तके विकत घेऊन कोण वाचतो, असा प्रश्न आपल्याकडे सर्रास उपस्थित केला जातो; पण पुण्यात सुरू असलेल्या वेगवेगळ्या ग्रंथ प्रदर्शनांना वाचकाचा चांगला

प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे. इतर विषयांबरोबरच सध्या संतसाहित्यावर आधारित पुस्तकांना वाचकांमधून खास मागणी आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज पालखी सोहळा सुरू झाला आहे. या निमित्ताने संतसाहित्यावरील पुस्तकांचा आढावा घेताना विविध लेखकांच्या साहित्यकृतींना वाचक पंसती दर्शवत आहेत, हे दिसून आले. म्हणूनच वारी निमित्ताने पुण्यात विविध ठिकाणी सुरू असलेल्या ग्रंथ प्रदर्शनात संतसाहित्यविषयक ग्रंथांचे खास दालन करण्यात आले आहे.

'अक्षरधारा'चे रमेश राठीवडेकर म्हणाले, ''कृष्णराव अर्जुन केळुस्कर लिखित 'तुकाराम चरित्र' या ग्रंथाची नवी आवृत्ती बाजारात आली आहे. या पुस्तकापासून अगदी एक रुपयापासून सात हजार रुपये किमतीचे संतसाहित्यावरील ग्रंथ उपलब्ध आहेत. त्यांना खरोखरीच चांगला प्रतिसाद आहे.''

'साहित्य दरबार'चे विनायक धारणे म्हणाले, ''संत साहित्यावरील पुस्तके उतारवयात वाचायची असतात, असे म्हटले जात असले, तरी 'ज्ञानेश्वरी', संत साहित्य शोध आणि बोध', 'तुकाराम गाथा', 'दासबोध', 'तुकाराम दर्शन' अशा ग्रंथांना तरुणाईमधून प्रतिसाद मिळत आहे, हे अधिक महत्त्वाचे वाटते.''

जास्त मागणी असणारी काही पुस्तके : पाच संत चरित्र (गोनीदां), विठ्ठल एक महासमन्वय, श्रीनाथ लीलामृत (डॉ. रा. चिं. ढेरे), तुकाराम गाथा : निवडक अंभग (भालचंद्र नेमाडे), तुकाराम दर्शन आणि प्रसादाची वाणी (डॉ. सदानंद मोरे), दासबोध (के. व्ही. बेलसरे), सार्थ अमृतानुभव (जोग महाराज), तुका म्हणे (दिलीप धोंड), शांतीब्रह्म (लीला गोळे), सार्थ दासबोध (हभप पांगारकर), श्री ज्ञानेश्वरी (साखरे महाराज), तुकारामांच्या अभंगांची चर्चा (वासुदेव पटवर्धन, गणेश केळकर), अमृतानुभव (विष्णुबुवा जोग महाराज), ज्ञानेश्वरी (विनायक फडके), एकनाथी भागवत (दिवाकर घैसास).

## बुकवर्म लाइफ इन मेट्रो

एक हजार स्क्वेअर फूट जागेतलं पुस्तकांचं दुकान! काही वर्षांपूर्वी ही अतिशयोक्ती वाटली असती. त्या छोट्या छोट्या गल्ल्या. तिथं एकमेकांना लागून ५०-६० पुस्तकांची दुकानं, दुकानाबाहेरच पुस्तकांचे गठ्ठे रचून उभे

असणारे पुस्तक विक्रेते अशा पारंपरिक पुस्तकगल्लीनं थेट बुक मॉलपर्यंत मुसंडी मारली आहे.

परवा संध्याकाळी अशाच एका पुस्तकांच्या मॉलमध्ये फेरफटका मारायला गेलो होतो. खरंतर असा फेरफटका मारायला गेल्यावर हमखास एक तरी पुस्तक विकत घेतलं जातंच. हीच तर खरी गंमत आहे. या धावत्या शहरात पुस्तकंच मित्र वाटतात. मग मैत्री वाढवायला काय हरकत आहे?

कामानिमित्त रोज तीन तास प्रवास करण्याची वेळ काही महिन्यांपूर्वी माझ्यावर आली होती. कंपनीतर्फे स्वतंत्र वाहनाची व्यवस्थाही होती. या रोजच्या प्रवासात पुस्तकांनी मला इतकी छान साथ दिली, की रोजचा हा प्रवास कधी संपायचा कळायचेच नाही. बाहेर कितीही गर्दी, कलकल असली, तरी पुस्तकं आपल्याला स्वत:च्या नव्या प्रदेशात घेऊन जातात.

पाहा ना, काही वर्षांपूर्वी काही पुस्तकं मागवून घ्यावी लागत असत. अनेक परदेशी पुस्तकं मिळणंही अवघड असे; पण शहरानं जशी कात टाकली, तशी कपड्यांचे ब्रँड्स, खाण्याच्या आंतरराष्ट्रीय चेन्स यांबरोबरच जगभरातल्या प्रकाशकांकडून प्रकाशित झालेली पुस्तकंही सहज उपलब्ध व्हायला लागली. या पुस्तक मॉल्समुळे वाचनाच्या ग्लॅमरमध्ये वाढहोऊन वाचकांची संख्या दिवसेंदिवस वाढली, तर चांगलंच होईल. मेट्रोचं हेच वैशिष्ट्य आहे. सगळ्या गोष्टी तुमच्या जवळ आणून ठेवलेल्या आहेत; तुम्हाला फक्त हात पुढं करून त्यांचा वापर करायचा आहे.

अगदी लहानपणीच वाचायची सवय लागणं खूप गरजेचं आहे. बऱ्याच जणांना वाचन कंटाळवाणं वाटतं; पण वाचन परदेशी खाण्यासारखं आहे. एकदा तुमची टेस्ट डेव्हलप झाली की तुम्हाला त्याची गोडीच लागते; पण बऱ्याचदा आपण वाचायला सुरुवात करायला उशीरच करतो. मेट्रोमधल्या इतर प्रलोभनांपुढे वाचन थोडं मागं पडतंय, असं वाटण्यामागे कारणही तसंच आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रक्रिया नुकतीच सुरू झाली. लेखी प्रवेश परीक्षेनंतर गटचर्चा आणि मुलाखत अशा महत्त्वाच्या फेऱ्या बऱ्याच वेळा ठेवल्या जातात. त्यामुळे साहिजकच या गटचर्चेमध्ये आपला प्रभाव कसा पाडता येईल, हे शिकण्यासाठी एका प्रशिक्षणाचं आयोजन नुकतंच करण्यात आलं होतं. गटचर्चेची उदाहरणं दाखवून नंतर पॉवर पॉईंटच्या साह्यानं विद्यार्थ्यांना किती बोलावं, कसं बोलावं, हावभाव कसे असावेत, याचं मार्गदर्शन केल्यानंतर मुलांचे गट पाडून प्रत्यक्ष

गटचर्चांना सुरवात करण्यात आली. सरावासाठी घेतलेले विषय तसे सोपेच होते; पण पुढं जे घडलं, ते विचार करायला भाग पाडणारं होतं. मुलं गटचर्चेची पथ्यं योग्य पद्धतीनं पाळत होती; पण त्यांच्या मुद्द्यांमध्ये काही जोर नव्हता. काही जण खूप हिरिरीनं मुद्दे मांडत होते; पण त्यांच्या चर्चेत काही 'मुद्दा'च नव्हता.

कोणताही विषय प्रभावीपणे मांडायचा असेल, तर मुळात विषयज्ञान असणं गरजेचं आहे. वृत्तपत्रांतील फक्त मथळे कोण वाचतं आणि कोण सगळी बातमी सार्थ समजून घेतं, हे गटचर्चेचं निरीक्षण करणाऱ्याला नीट कळतं. आता याला उपाय म्हणजे वाचन. 'वाचाल, तर वाचाल,' हे अगदी खरं आहे. जे आवडतं ते, जे फारसं आवडत नाही ते, जे आवश्यक आहे ते, असं सगळं वाचा.

सुरवातीला छानशा बुक मॉलमध्ये सुरुवात करायला हरकत नाही. प्रशस्त जागेत आपल्याला आवडलेलं पुस्तक घेऊन, पार्श्वभूमीला मंद सुरांची धून आणि फ्रेशनर्सची दरवळ वाचनाला निश्चितच चालना देईल. युवा वर्गाला आकर्षित करणारी, किंडलसुद्धा इथं मिळतात. 'स्टाइल से पढो,' असं सांगणारी ही गॅजेट्स म्हणजे स्वतःबरोबर ग्रंथालय घेऊन फिरल्यासारखं आहे.

एकदा वाचायची सवय जडली, की मग पाहा, तुमच्या प्रत्येक शब्दात, वाक्यात, मुद्द्यात कशी प्रगल्भता येते. हे शहर आपल्यासाठी हजारो-लाखो पुस्तकं घेऊन उभं आहे. विविध भाषांमधील, विविध विषयांमधील ही पुस्तकं म्हणजे जणू या मेट्रोची 'व्हॅली ऑफ फ्लॉवर्स.'

रात्रीचे दहा वाजलेत. शहर तुलनेनं शांत झालंय. गच्चीत छान वारं येतंय आणि हातात एक छान पुस्तक घेऊन मी वाचायच्या तयारीत आहे. चला, मी वाचतो. तुमच काय?...

अंशुमन खुर्जेकर

## व्हिडिओद्वारा उत्पन्न

सोशल नेटवर्किंग साइट्सवर रोज नवनवीन व्हिडिओ व्हायरल होत असतात. असे व्हिडिओ लाखो लोकांकडून पाहिले जातात. याच कल्पनेचे व्यवसायात रूपांतर करण्यासाठी 'फेसबुक'ने आपल्या व्हिडिओमध्ये जाहिराती देऊन उत्पन्न कमाविण्याचा अनोखा मार्ग शोधला आहे. 'यू ट्यूब'ने

ही कल्पना यापूर्वीच यशस्वीरीत्या राबविली आहे. ‘यू ट्यूब’चा मागील वर्षीचा निव्वळ नफा ७६० कोटी डॉलर एवढा आहे. असे व्हिडिओ अपलोड करणाऱ्या व्यक्ती किंवा संस्थेलाही त्यातील उत्पन्नाचा हिस्सा मिळतो.

‘फेसबुक’वर अपलोड करण्यात आलेल्या व्हिडिओमध्ये लवकरच जाहिराती दिसतील. तसेच त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नातील वाटा व्हिडिओ अपलोड करणाऱ्यालाही मिळणार आहे. या नव्या कल्पनेच्या प्रसारासाठी ‘फेसबुक’तर्फे ‘सजेस्टेड व्हिडिओ’ ही नवी सुविधा देण्यात येणार आहे. त्याद्वारा युजरच्या ‘न्यूज फीड’मध्ये लोकप्रिय व्हिडिओंची झलक दाखविण्यात येणार असून, प्रत्यक्ष संपूर्ण व्हिडिओ पाहताना जाहिराती दिसणार आहेत. ‘‘आम्ही ‘सजेस्टेड व्हिडिओ’ ही सुविधा सुरू करत आहोत. त्याद्वारा युजर्सना आवडणारे अनेक व्हिडिओ पाहता येतील. ‘सजेस्टेड व्हिडिओ’मध्ये आम्ही ‘फीड-स्टाइल’ पद्धतीने जाहिराती देण्याचा प्रयोग करीत आहोत. त्यातून मिळालेले उत्पन्न हे माध्यमसमूहामध्ये, तसेच व्हिडिओ निर्मात्यांमध्ये वितरित केले जाईल,’’ अशी माहिती ‘फेसबुक’च्या प्रवक्त्याने दिली.

युजर्सच्या सोयीसाठी ‘फेसबुक’वर अपलोड करण्यात आलेल्या अनेक व्हिडिओंमधून युजरला निवड करण्यास सोपे जावे म्हणून काही व्हिडिओंची शिफारस येईल. ‘सजेस्टेड व्हिडिओ’मध्ये एकाच प्रकाशकाने प्रसिद्ध केलेले, सोशल नेटवर्किंगवर अनेक लोकांनी पाहिलेले, विशिष्ट विषयाशी संबंधित व्हिडिओ उपलब्ध असतील, तसेच युजरची आवड लक्षात घेऊन त्याप्रमाणे त्याच्या त्याच्या न्यूजफीडमध्ये व्हिडिओंची शिफारस करण्यात येईल.

जाहिराती असलेल्या व्हिडिओंद्वारा मिळालेले उत्पन्न व्हिडिओच्या मूळ निर्मात्यालाही मिळणार आहे. मूळ निर्मात्याला ५५ टक्के उत्पन्न मिळेल. अलीकडे डेस्कटॉप आणि लॅपटॉपपेक्षा स्मार्टफोन्सवरून ‘फेसबुक’चा वापर वाढल्याचे ‘फेसबुक’ने म्हटले आहे. त्यामुळे व्हिडिओ निर्मात्यांना कमी आकाराचा व्हिडिओ तयार करण्याचे आव्हान पेलावे लागेल. ई-मार्केटचा अभ्यास करणाऱ्या एका संस्थेच्या अहवालानुसार व्हिडिओ जाहिरातीसाठी या वर्षी अमेरिकेमध्ये तब्बल ७७७ कोटी डॉलर खर्च करण्यात आले होते.

### ‘यू ट्यूब’ला धोका?

‘गुगल’च्या मालकीच्या ‘यू ट्यूब’ या लोकप्रिय व्हिडिओ साइटला ‘फेसबुक’च्या व्हिडिओ सुविधेमुळे धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, ‘यू ट्यूब’ने ही शक्यता फेटाळून लावत ‘फेसबुक’ आणि ‘यू ट्यूब’ या दोन्ही कंपन्या येत्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणात दूरचित्रवाणी वाहिन्यांप्रमाणेच वाढतील, असे म्हटले आहे.

### हिंदी सल्लागार समितीचे सदस्य डॉ. दामोदर खडसे

प्रसिद्ध साहित्यिक, हिंदीचे विशेषज्ञ डॉ. दामोदर खडसे यांची केंद्र सरकारच्या अवकाश आणि अणुऊर्जा विभागाच्या हिंदी सल्लागार समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे. त्यांचा कार्यकाळ तीन वर्षांचा असेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी समितीचे अध्यक्ष आहेत. पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री उपाध्यक्ष आहेत. या समितीची पुनर्रचना नुकतीच करण्यात आली. डॉ. खडसे कवी, कथाकार म्हणून प्रसिद्ध आहेत. हिंदी भाषेबाबत त्यांचे विशेष कार्य आहे. त्यासाठी त्यांनी विशेष लेखनही केले आहे. विविध विषयांवरील ४० पुस्तके त्यांच्या नावावर असून, २० मराठी पुस्तकांचा त्यांनी हिंदीत अनुवाद केला आहे. ते केंद्रीय हिंदी समितीचेही सदस्य आहेत. अनेक राष्ट्रीय पुरस्कारांनी डॉ. खडसे यांचा गौरव करण्यात आला आहे.

### ढोल-ताशा पथके

‘गणपतीबाप्पा, मोरया’च्या जयघोषाने... ढोलाच्या ठोक्याने... ताशाच्या काडीने... झांजांच्या वेडाने.... टोलाच्या धडाडीने.... ध्वजाच्या भरारीने अन् ख्यातनाम गायक शंकर महादेवन यांच्या स्वराने...तरुणाईची मने आणि पावले थिरकली. संगीत असेल किंवा कोणत्याही गोष्टीत अशा प्रकारे एकरूप होणे असेल, हे एक प्रकारचे ‘मेडिटेशन’च असते, असे महादेवन यांनी या वेळी सांगितले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ‘वंदे मातरम्’ संघटनेच्या ‘युवा वाद्य पथका’तर्फे आयोजित समारंभात ढोल-ताशा व इतर वाद्यांची पूजा महादेवन यांच्या हस्ते झाली. त्यानंतर शहरातील विविध ढोल-ताशा पथकांनी एकमेकांच्या पथकातील वाद्यांची पूजा करून या वेळी एकतेचे दर्शन

घडविले. त्याच वेळी 'ओ मेरी माँ ...' 'बगळ्याची माळ फुले...', अशी गाणी म्हणत आणि ढोल-ताशांचा दणदणाट करीत महादेवन यांनी तरुणाईला आपल्या स्वरात आणि तालात गुंतवून टाकले.

महादेवन म्हणाले, ''आपले 'हेरिटेज' संपत चालले आहे, अशी नकारात्मक चर्चा सर्वच ठिकाणी ऐकायला मिळते; पण मला स्वतःला असे काही वाटत नाही. नवी पिढी आपापल्या परीने संस्कृती टिकवून ठेवत आहे. ध्येय पक्के असेल तर यश आपलेच असते, हे लक्षात घ्या; पण ज्यात मनापासून आनंद मिळतो अशा सकारात्मक कामात 'करिअर' करा. आवडीच्या गोष्टीत मन रमवून नकारात्मक गोष्टी मनातून काढून टाका.'' नगरसेवक दीपक मानकर, प्रताप परदेशी, वैभव वाघ उपस्थित होते.

## नव्याने उलगडणार इतिहासाची पाने

औरंगाबाद पर्यटन जिल्हा घोषित होताच देवगिरी किल्ल्याच्या परिसरात 'लाइट अँड साउंड शो' सुरू करण्यासाठी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने पावले उचलली आहेत. यादव ते निझाम असा बाराशे वर्षांचा कालखंड या माध्यमातून मांडण्यात येणार आहे.

पर्यटन जिल्ह्यात प्रमुख पर्यटनस्थळी विकासकामे हाती घेण्यात आली आहेत. दौलताबाद येथे बाराव्या शतकात उभारलेला देवगिरी किल्ला पर्यटकांचे आकर्षण आहे. त्यामुळे जयपूर, ग्वाल्हेर, दिल्ली, गोवळकोंडा किल्ल्याच्या धर्तीवर देवगिरी परिसरात 'लाइट अँड साउंड शो' सुरू होणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या प्रकल्पासाठी पुढाकार घेतला आहे. मागील महिन्यात विशेष समितीने किल्ला परिसराचे सर्वेक्षण केले. भारतमाता मंदिराजवळ पर्यटकांची आसनव्यवस्था करण्यात येणार आहे. रामदेवराय यादव ते निझाम असा हजार वर्षांचा कालखंड यात मांडला जाणार आहे. या कामाची जबाबदारी दुबईच्या नामांकित कंपनीवर सोपवली जाणार आहे. प्रकल्पासाठी पाच ते दहा कोटी रुपये खर्च येईल, अशी शक्यता आहे.

## चित्रांमधून रेखाटले कालिदासाचे वाङ्मय...

महाकवी कालिदासाचे काव्य रंग, प्रतिभाविलास, कालिदासाच्या वाङ्मयातील नायिका, कालिदासाची विविध रूपे, प्रतिमा डोळ्यांपुढे उभे

करणाऱ्या आणि मनाला मोह घालणाऱ्या चित्रांमधून कालिदासाचा जीवनपट उलगडणारे चित्रप्रदर्शन दर्पण कलादालनात भरवण्यात आले आहे.

कलाछाया सांस्कृतिक केंद्राच्या वतीने कालिदास महोत्सवातील चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन ज्येष्ठ अभिनेता, दिग्दर्शक अमोल पालेकर यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ चित्रकार रवी परांजपे, बांधकाम व्यावसायिक आनंद जोग, मीना चंदावरकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

पालेकर म्हणाले, ''आधुनिक झगमगाटात शांत आणि धीरगंभीरपणे कलाछाया संस्थेने असे कार्यक्रम चालू ठेवण्याचा प्रयत्न कौतुकास्पद आहे.''

कलाछाया केंद्राच्या संस्थापक प्रभा मराठे यांनी केंद्राच्या पन्नास वर्षांच्या वाटचालीची माहिती दिली. या चित्रप्रदर्शनात वामन करंजकर, दिनकर थोपटे, जयप्रकाश जगताप, वासुदेव कामथ, जगदीश चाफेकर, अनिल उपळेकर, रवी देव, पंकज भांबुरकर, सचिन जोशी यांनी काढलेली चित्रे लावण्यात आली आहेत.

## **'आकाशातील' लेखक**

'भारतातील अनेक इंग्रजी लेखक एका वेगळ्याच 'उंचीवरून' लिखाण करतात. ते प्रादेशिक संस्कृतीकडे आकाशातून पाहतात. त्यांचे लिखाण वरवरचे असते. त्यामुळे भारत नेमका कसा आहे, ते त्यांच्या साहित्यातून कळतच नाही. प्रादेशिक भाषांमधून लिहिणाऱ्या लेखकांच्या लिखाणात मात्र आपल्या संस्कृतीचे खरे दर्शन होते,' असे प्रत्युत्तर ज्येष्ठ साहित्यिक आणि पत्रकार अरुण साधू यांनी भारतीय प्रादेशिक लिखाणास कमअस्सल लेखणारे इंग्रजी लेखक सलमान रश्दी यांना दिले.

ज्ञानपीठ विजेते भालचंद्र नेमाडे यांच्या लिखाणावर टीका करताना सलमान रश्दी यांनी 'इंग्रजीतील लिखाण हेच खरे भारतीय लिखाण आहे. प्रादेशिक भाषांमध्ये तसे लिखाण दिसत नाही,' असे म्हटले होते. रश्दी यांच्या या वक्तव्याचा साधू यांनी ईशान्य आणि पश्चिम भारतीय साहित्य संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी समाचार घेतला.

४थी आवृत्ती

# A to Z विज्ञान

विज्ञान शब्दसंग्रह

लेखक
डी.एस. इटोकर

किंमत - ९५/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




रोजच्या व्यवहारात विज्ञानातील अनेक शब्द, संज्ञा वापरल्या जातात.
शालेय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात विज्ञानावर आधारित अनेक सिद्धान्त व उपकरणे अभ्यासली जातात;
परंतु त्यांचे अर्थ कित्येकदा माहीत नसतात.
त्यासाठीच 'A to Z विज्ञान'ची निर्मिती झाली आहे.
या पुस्तकात इंग्रजी 'A' या आद्याक्षरापासून 'Z' पर्यंत जास्तीत जास्त शब्दांची आवश्यक त्या ठिकाणी आकृती काढून समजण्यास सोपी अशी मांडणी केली आहे.
वैज्ञानिक खेळण्यांची, प्रयोगांची मनोरंजक पुस्तके देणाऱ्या डी. एस. इटोकर यांचे हे वेगळे पुस्तक आबालवृद्धांना आवडेल, असा विश्वास वाटतो.



# पुरस्कार

## गजेंद्रगडकर, डॉ. भिशीकर यांना पुरस्कार प्रदान

''वास्तवाचे भान राखून जीवनाच्या नव्या प्रश्नांना लेखकांनी सामोरे जायला हवे. मात्र आपल्या लेखनात तत्त्वज्ञानाचा आग्रह धरून लेखकांनी 'ॲक्टिव्हिस्ट' होऊ नये,'' असे मत निवृत्त न्यायमूर्ती नरेंद्र चपळगावकर यांनी व्यक्त केले.

गो. नी. दांडेकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित सोहळ्यात मृण्मयी प्रकाशनाचा 'मृण्मयी पुरस्कार' कथालेखिका मोनिका गजेंद्रगडकर यांना, तर 'नीरा-गोपाल पुरस्कार' सामाजिक कार्यकर्त्या डॉ. स्वर्णलता भिशीकर यांना चपळगावकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. तसेच, 'गोनीदां'च्या 'मोगरा फुलला', 'माचीवरला बुधा' आणि 'शब्दप्रत्यय' या पुस्तकांचे प्रकाशनही करण्यात आले. या वेळी वीणा देव आणि विजय देव उपस्थित होते.

चपळगावकर म्हणाले, ''हिंदू आणि मुस्लिमांमध्ये विवाह व्हावेत; ते ऐक्यासाठी चांगले आहे,' हे सामाजिक कार्यकर्तेच सांगू शकतात. पण लेखकांनी असे सांगण्यापेक्षा हे विवाह झाल्याने संबंधिताना काय काय अडचणी येतात, कोणकोणत्या परिस्थितीला सामोरे जावे लागते... अशा प्रकारचे भावनिक धागे आपल्या लेखनातून उलगडायला हवेत.'' अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले.

''साहित्यातील अभिजातपण संपून चालले आहे. वरवरचे लेखन नव्या पिढीला जास्त भावत आहे. अशा स्थितीत आपण ज्याला साहित्य म्हणतो, ते खरेच साहित्य आहे का? अशा वेळी आम्हा लेखकांसमोर अधिक दर्जेदार लेखन करण्याचे आव्हान उभे आहे,'' असे मोनिका गजेंद्रगडकर यांनी सांगितले. ''कोणताही लेखक पुरस्कारांवर नजर ठेवून लेखन करत नाही; पण काही पुरस्कार मिळावेत, अशी सुप्त अभिलाषा काहींमध्ये असते. अशी

इच्छा न बाळगता अनपेक्षितपणे मिळालेला हा पुरस्कार ‘गोनीदां’च्या आशीर्वादासमान आहे,’’ असेही त्या म्हणाल्या.

## सोनोपंत दांडेकर पुरस्कार

‘‘काही माणसे शिक्षणामुळे तर काही शिक्षण न घेताही हुशार होतात; पण तत्त्वज्ञानामुळे माणसाला खऱ्या अर्थाने शहाणपण मिळते,’’ असे मत डेक्कन कॉलेजचे कुलपती डॉ. गो. बं. देगलूरकर यांनी व्यक्त केले.

सर परशुराम भाऊ महाविद्यालय माजी विद्यार्थी संघटनेचा ‘सोनोपंत ऊर्फ मामासाहेब दांडेकर स्मृती पुरस्कार’ अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांना डॉ. देगलूरकर यांच्या हस्ते प्रदान केला. माजी आमदार उल्हास पवार, प्राचार्य डॉ. दिलीप शेठ, कीर्तनकार चैतन्य महाराज देगलूरकर, संघटनेचे अध्यक्ष विजय उस्तुरे, सचिव राजू चौरे उपस्थित होते.

डॉ. देगलूरकर म्हणाले, ‘‘पुण्यातील अनेक माणसांनी पुण्याला मोठे केले आणि पुण्यानेही अनेक माणसांना मोठे केले. अखिल भारतीय नव्हे, तर वैश्विक कीर्ती मिळवून दिली. या परंपरेत सोनोपंत दांडेकर हे एक होते. त्यांनी संतांचे कार्य आपल्यासमोर आणले.’’ ‘‘डॉ. मोरे म्हणाले, ‘‘संत, वारकरी यांच्याबद्दल पूर्वी काही गैरसमज निर्माण झाले हाते. ते दूर करण्यासाठी दांडेकर यांच्यासह त्या काळच्या जाणकरांनी मोठे कार्य केले.’’ दांडेकर हे माझे ‘रोल मॉडेल’च होते.’’ डॉ. वैजयंती बेलसरे यांनी सूत्रसंचालन केले.

## डॉ. देशमुख यांना बालगंधर्व पुरस्कार

बालगंधर्व संगीत रसिका मंडळातर्फे दिला जाणारा बालगंधर्व गुणगौरव पुरस्कार यंदा नागपूरच्या गायिका डॉ. कल्याणी देशमुख यांना केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

मंडळाचे अध्यक्ष सुरेश साखवळकर, कार्याध्यक्ष नाना कुलकर्णी या वेळी उपस्थित होते. त्याबरोबरच संगीत नाट्यलेखनासाठी दिला जाणारा अण्णासाहेब किर्लोस्कर पुरस्कार डॉ. विकास कशाळकर यांना ‘ऊस डोंगा परी’ या नाटकासाठी दिला गेला. नवीन नाटकाला संगीत दिल्याबद्दल गायनाचार्य भास्करबुवा बखले पुरस्कार पं. सुहास व्यास यांना, डॉ. सवळो केणी पुरस्कार तबलावादक नितीन दिवाकर यांना, गो. ब. देवल पुरस्कार राम शिलकर यांना, काकासाहेब खाडिलकर पुरस्कार गायिका अर्चना कान्हेरे

यांना, खाऊवाले पाटणकर पुरस्कार बाळ चितळे यांना आणि द. कृ. लेले पुरस्कार उल्का घोडेकर व विवेक काटकर यांना प्रदान केला गेला.

रंगबहार स्मरणिकेचे प्रकाशन प्रभू यांच्या हस्ते झाले. उत्तरार्धात पं. रामदास कामत, पं. सुहास व्यास, बकुल पंडित, डॉ. विकास कशाळकर, सुरेश साखवळकर, अर्चना कान्हेरे, डॉ. कल्याणी देशमुख, डॉ. मंजिरी तेंडुलकर, रवींद्र कुलकर्णी आणि आनंद प्रभुदेसाई सहभागी झाले.

## तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांचा सत्कार

अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्त्व हे धगधगत्या अग्निकुंडासारखे होते. त्यांनी आपल्या साहित्यातून समाजप्रबोधनाचे काम केले. भटक्या विमुक्तांना सर्वांत प्रथम त्यांच्या साहित्यात स्थान मिळाले. परंतु त्यांच्या साहित्याचे योग्य मूल्यमापन झाले नाही. म्हणूनच मराठी समीक्षकांनी त्यांची समीक्षा अण्णा भाऊ साठेंच्या साहित्यासाठी पणाला लावावा, अशी इच्छा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी व्यक्त केली. अण्णा भाऊ साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित चर्चेमध्ये मोरे बोलत होते. या प्रसंगी तमाशा कलावंत मंगला बनसोडे यांचा महापौर दत्तात्रय धनकवडे यांच्या हस्ते साडी, सन्मानचिन्ह, शाल व श्रीफल देऊन सत्कार करण्यात आला. या वेळी महापौर दत्तात्रय धनकवडे, शाहीर संभाजी भगत, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, भगवानराव वैराट, सुरेश भालेराव उपस्थित होते.

मोरे म्हणाले, ''अण्णा भाऊ हे माणसांचं निरीक्षण करून त्यांचं सुख - दुःख अनुभवून ते कागदावर उतरविणारे खरे साहित्यिक होते. काही चळवळींत सक्रिय असूनदेखील त्यांनी साहित्यलेखनाला वेळ दिला.''

साहित्य परिषदेसारख्या संस्थांना अण्णा भाऊ साठेंच्या साहित्याबद्दल काही देणे घेणे नाही. समीक्षकांनीदेखील त्यांच्या साहित्याकडे दुर्लक्ष केले आहे. त्यांच्या साहित्याची दखल घेणे गरजेचे असून, यासाठी राज्य सरकारनेदेखील प्रयत्न करावा, असे ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे यांनी सांगितले.

## गौरव परिवार पुरस्कार

'जीवनात अनेक संकटे येतात. हे आपल्या नशिबाला का आले, याचा विचार करत बसण्यापेक्षा जिद्दीने त्यातून मार्ग काढला तर आपले जीवन

सुकर होते, याचा वस्तुपाठ समाजातील अनेक व्यक्तींनी घालून दिला आहे. आपणही आपल्या जगण्यातून समाजासमोर आदर्श निर्माण करा,’ असे आवाहन अरुणा भट यांनी केले.

ए. व्ही. भट परिवाराच्या वतीने आपल्या कर्तृत्व, जिद्द, प्रामाणिकपणे संकटांवर मात करून विविध माध्यमांतून यश मिळविलेल्या व समाजासमोर एक आदर्श निर्माण केलेल्या व्यक्तींचा ‘गौरव परिवार पुरस्कारा’ने भट कुटुंबातीलच व्यक्तींकडून सन्मान  करण्यात आला, त्या वेळी त्या बोलत होत्या. ए. व्ही. भट कंपनीचे संचालक केदार भट व सुप्रिया भट या वेळी उपस्थित होते. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे पुरस्काराचे स्वरूप आहे. पाच प्रकारांमध्ये दिल्या गेलेल्या या पुरस्कारांमध्ये ‘यंग ॲचिव्हर्स’ सन्मान पुरस्कार सिद्धेश पुरकर याल, तर स्मृतिचिन्ह पुरस्कार सई सिधये हिला प्रदान करण्यात आला. राजेश दामले यांनी सूत्रसंचालन केले. मानसी जाधव यांनी पुरस्कारार्थींच्या नावाची घोषणा केली व सुप्रिया भट यांनी आभार मानले.

१. ‘मला माझ्या पाल्याचा अभिमान आहे’ या विभागातील पुरस्कार श्रीकांत लिमये, तर स्मृतिचिन्ह पुरस्कार सुरेश गोरे यांना प्रदान करण्यात आला. ‘मला माझ्या पालकांचा अभिमान आहे’ या विभागातील पुरस्कार सुषमा वैद्य यांना, तर स्मृतिचिन्ह  पुरस्कार दीप्ती प्रधान यांना प्रदान करण्यात आला.

२. ‘आई, बाबा आणि मी एक सॉलिड टीम’ या विभागातील पुरस्कार चंद्रशेखर बागाईतकर यांना, तर स्मृतिचिन्ह पुरस्कार वीणा संतोष यांना प्रदान करण्यात आला.

३. ‘परिघाबाहेरील एक आयुष्य’ या विभागातील पुरस्कार शैलता कुलकर्णी यांना, तर स्मृतिचिन्ह पुरस्कार स्नेहलता हाबडे यांना प्रदान करण्यात आला.

## श्याम मनोहर यांना ‘कुसुमांजली’ पुरस्कार

“इतर भाषांत नवीन काय प्रयोग होतायत, इतर प्रांतांत नवं कुठलं साहित्य येतंय, हे कुणाचंच कुणाला म्हणावं तेवढ्या परिणामकारकतेनं कळत नाही, हे आपल्या आसपासचं सध्याचं दुर्दैवी वास्तव आहे. प्रत्येकाचं असं ‘आपापलंच भलं’ चालत राहिलं, तर साहित्यातली नवनिर्मिती इकडून तिकडे पोचणार कशी? हे थांबवायचं असेल, तर भाषांचं परस्परांशी

नेटवर्किंग व्हावं लागेल. त्यातूनच प्रादेशिक साहित्य सर्वत्र वाचलं जाईल... आणि देशाच्या एकात्मतेलाही त्यातून बळ मिळेल...'' अशा शब्दांत लेखक श्याम मनोहर यांनी आपले मत मांडले.

दिल्लीच्या कुसुमांजली फाउंडेशनचा प्रादेशिक भाषेतील साहित्यासाठी दिला जाणारा अडीच लाख रुपयांचा 'कुसुमांजली पुरस्कार' मनोहर यांच्या 'शंभर मी' कादंबरीला नुकताच जाहीर झाला. त्यानिमित्त साहित्य आणि समाज याविषयी त्यांनी 'सकाळ'शी संवाद साधला.

'शास्त्रीय संगीत नाही का पोचलं भारतभर?... मग साहित्यालाच काय म्हणून अडचण यावी?... त्याची व्यवस्था साधनं उपलब्ध झाली तर हे नक्कीच शक्य आहे,' असे सांगतानाच प्रादेशिक साहित्याचा सन्मान करण्याच्या 'कुसुमांजली'च्या पुढाकाराचे मनोहर यांनी कौतुकही केले. ते म्हणाले. ''याच धर्तीवर महाराष्ट्रातूनही इतर भाषिक वाङ्मयासाठी पुरस्कार दिले जायला हवेत. तेवढा मनाचा मोठेपणा आपण नक्कीच दाखवू शकतो.''

मनोहर म्हणाले, ''कादंबरी अन् इतर साहित्य प्रकारांच्या विविध घाटांचा, रूपांचा आणि भाषाशैलींचा शोध घेता यावा. अनुवाद आणि छोटेखानी वृत्तांतून इतर प्रदेशात काय चाललंय, हे ताडून पाहावं. ज्यांचा लोकांशी सर्वाधिक संबंध येतो (असं आपण साधरणतः मानतो) अशा राजकारण्यांनीही जरा व्यासंग करायला हवा.''

संमेलनांत पूर्वी परभाषिक साहित्यिकांना बोलावलं जायचं. अलीकडे ते बंद झालंय. ती प्रथा पुन्हा सुरू झाल्यास वाचकांची साहित्याबाबतची उत्सुकता वाढू शकेल.


चांगल्या लेखनासाठी त्या त्या विषयाची भाषा तयार व्हायला हवी.

व्यक्तींच्या स्मृती जागवणं ठीक, पण त्यांच्या ज्ञानक्षेत्रातल्या योगदानाचीही चर्चा व्हावी.

संमेलनांतून समाज 'ज्ञानोत्सुक' होतो का?

साहित्य संमेलनांविषयी आपली परखड मते मांडतांना मनोहर म्हणाले, ''सध्या अनेक प्रकारच्या संमेलनांचं सगळीकडे पेव फुटलंय. असं होणं वाईट नाही... पण या संमेलनांतून समाज थोडातरी 'ज्ञानोत्सुक' होतो का, त्याची एकूण जाण आणि जाणीव जरातरी वाढल्याचं दिसतं का, हा मला पडलेला प्रश्न आहे. आताही तुम्ही अंदमानला जाताय... पण त्यातून महाराष्ट्रातल्या लोकांची ज्ञानोत्सुकता वाढणारेय का?'

**३री आवृत्ती**




# वॉरन बफे

लेखक
अतुल कहाते

किंमत - २२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

गुंतवणूक तसेच शेअर बाजार यांच्यात रस असलेल्या माणसाला 'वॉरन बफे' हे नाव माहीत नसणं, हे केवळ अशक्य आहे. गेली कित्येक दशकं बफेनं गुंतवणुकीच्या विश्वात मिळवलेलं यश अफाट आहे. शेअर बाजाराच्या चढ-उतारांवर सातत्यानं मात करून प्रचंड वेगानं त्यानं आपल्या वैयक्तिक संपत्तीत तर भर घातलीच आहे; शिवाय आपल्या 'बर्कशायर हॅथवे' या कंपनीमधल्या भागधारकांनाही कोट्यधीश केलं आहे. त्याचं राहणीमान अत्यंत साधं आहे आणि विनाकारण पैसे खर्च करण्याचा त्याला तिटकारा आहे. अतिशय काटकसरी वृत्तीनं राहणाऱ्या बफेनं आपली जवळपास सगळी संपत्ती सामाजिक कामांसाठी खर्च करण्याचं जाहीर करून सगळ्या जगासमोर एक नवा आदर्श ठेवला आहे. आपल्या कारकिर्दीत कधीही नीतिमत्ता सोडून न वागलेल्या बफेचं माणूस म्हणून महत्त्व याचसाठी खूप जास्त आहे.
अशा या विलक्षण माणसाच्या अफाट आयुष्याची आणि त्याच्या गुंतवणुकीच्या रहस्यांचा उलगडा करणारी ही सफर!

## ज्ञानमार्गाचा सन्मान

अंदमान येथे होणाऱ्या विश्व मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी झालेली शेषराव मोरे यांची निवड सार्थ म्हणायला हवी. अंदमानशी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाव अतूटपणे जोडले गेले आहे. त्याच सावरकारांचा व्यासंग हे शेषराव मोरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अभिन्न अंग आहे. मोरे यांची निवड झाल्यामुळे आता या संमेलनाभोवती साठलेले अनिश्चिततेचे धुकेही विरायला हरकत नाही. रूढार्थाने ललित लिखाण टाळून वैचारिक लिखाणाचा प्रवाह समृद्ध करण्याचे काम मोरे यांनी केले. वाचकानुनय न करता अथक व्यासंग आणि चिंतनातून मोरे यांचे लिखाण साकारले आहे. सावरकरांचे जीवन हा मोरे यांच्या लिखाणाचा आवडता विषय. आरंभी 'सावरकरांचा बुद्धिवाद', 'सावरकरांचे समाजकारण', 'सत्य आणि विपर्यास' या पुस्तकांतून सावरकरांच्या मौलिक विचारांची परखड मीमांसा त्यांनी केली. दिवंगत प्रा. नरहर कुरूंदकर यांच्या परंपरेत घडलेले मोरे परखड विचारांचे लेखक आहेत. मराठवाड्याची तर्ककठोर विचारांची परंपरा त्यांनी समर्थपणे पुढे नेली. नांदेडला अभियांत्रिकी शिकत असताना ते बसायचे मात्र कुरूंदकर यांच्या वर्गात. कुरूंदकरांच्या विचारांचे त्यांच्यावर गारूडच होते. या वाटचालीत कुरूंदकारांशी स्नेह वाढला आणि एका विचारवंताची जडणघडण सुरू झाली. आपल्या प्रत्येक पुस्तकात डॉ. मोरे यांनी सामाजिक व राजकीय घडामोडींचा नवा वेध घेतला. त्यामुळे काही वादही झडले. एक हजार वर्षांच्या कालखंडात भारतावर इस्लामचा दीर्घ परिणाम झाला. या धर्माचा साधकबाधक अभ्यास सावरकर व डॉ. आंबेडकर यांनी केल्याचे मोरे यांच्या ध्यानात आले. त्यामुळे १९९१ मध्ये त्यांनी इस्लामचा सर्वांगीण अभ्यास सुरू केला. रोज सात-आठ तास अभ्यास करूनही वेळ पुरत नसल्याने त्यांनी अखेर औरंगाबदच्या सरकारी अभियांत्रिकी कॉलेजातून स्वेच्छानिवृत्ती घेतली. देशभर भ्रमंती करून अभ्यासक, मौलवी यांच्या भेटी घेतल्या आणि हजारो पुस्तके अभ्यासली. यातून 'मुस्लिम मनाचा शोध', 'प्रेषितानंतरचे चार आदर्श खलिफ' ही पुस्तके साकारली. याच काळात कायद्याची पदवी घेऊन स्वतःच्या लेखनाला एक वेगळा आयाम दिला. ललित लिखाणाचे प्रकार न हाताळता, मोरे यांनी वाचकांना एका विशाल विचारविश्वाचे दर्शन घडविले. मोरे अध्यक्ष झाल्याने विश्व संमेलन अधिक गंभीर होऊन त्यांचे भाषण नवा विचार देईल, अशी अपेक्षा आहे.

## 'आपटे वाचन मंदिर'चे पुरस्कार

इचलकरंजीचे आपटे वाचन मंदिर व इचलकरंजी साहित्य संमेलन स्मृती ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांसाठी पुढील पुस्तकांची निवड करण्यात आली आहे.

१. इंदिरा संत उत्कृष्ट काव्यसंग्रह पुरस्कार - परतीचा रस्ता नाहीय - श्रीधर नांदेडकर.

२. उत्कृष्ट मराठी गद्य साहित्यकृती पुरस्कार - अजुनी चालतोची वाट - भानू काळे.

३. सौ. आशाताई सौंदत्तीकर उत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार - बंद दरवाजा - भारत ससाणे.

४. सौ. केराबाई शेळके उत्कृष्ट कादंबरी पुरस्कार - धूळमाती - कृष्णात खोत.

५. मराठी भाषेतील उत्कृष्ट अनुवादित पुरस्कार - गुड मुस्लिम बॅड मुस्लिम - पुष्पा भावे / मिलिंद चंपानेरकर

६. श्यामराव भिडे उत्कृष्ट ललित गद्य साहित्यकृती पुरस्कार - संगीत बारी - भूषण कोरगावकर

७. पार्वती शंकरराव तेलसिंगे बाल साहित्यकृती पुरस्कार - 'हळू गळू, पळू गळू' व इतर कथा - म. वि. कोल्हटकर

८. महादेव सखाराम फाटक उत्कृष्ट नाट्य साहित्यकृती पुरस्कार - मृच्छकटिकम् अर्थात मातीच्या गाड्याचं प्रकरण - राजीव नाईक

९. गजानन सखाराम फाटक उत्कृष्ट एकांकिका पुरस्कार - संहिता - योगेश सोमण

१० विशेष लक्षणीय पुरस्कार

१. सेनं सायी वेस - वीरा राठोड

२. खचू लागली भुई - नीलम माणगावे

३. मेळघाटातील माहेर - मृणालिनी चितळे

४. भारतातील मुस्लिम स्थापत्यकला - डॉ. दाऊद दळवी.

हिंदी रतन प्रा. रंगनाथ तिवारी

'इतिहास आणि वर्तमान हे काळाचे दोन टप्पे नाहीतच. या कालखंडाला मी सलग मानतो' असा स्वतःच्या लेखनाचा परीघ निश्चित करणाऱ्या प्रा. रंगनाथ तिवारी यांना 'हिन्दीरत्न' हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. बिगरहिन्दी हा मानाचा पुरस्कार जाहीर झाला आहे. बिगरहिन्दी राज्यांत राहून

हिन्दी भाषेत कामगिरी करणाऱ्या लेखकाला एक लाख रुपये व मानचिन्ह अशा स्वरूपाच्या या पुरस्काराने गौरविण्यात येते. त्यांच्या सन्मानामुळे एका अर्थाने हा महाराष्ट्राचाही गौरव आहे.

प्रा. तिवारी हे मराठवाड्यातल्या अंबाजोगाईसारख्या आडवळणाच्या गावी राहून आपली लेखननिष्ठा जोपासत आहेत. 'उत्तमपुरुष एकवचन', 'संपल्या सुरावटी', 'देवगिरी बिलावल', 'बेगमक समरू', 'गुरुदेव' या त्यांच्या मराठी कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. 'देवगिरी बिलावल' (हिन्दी अनुवाद) आणि 'सरधाना की बेगम', 'उत्तरायन' या त्यांच्या हिन्दी कादंबऱ्या आहेत. भालचंद्र नेमाडे यांच्या 'बिढार' या कादंबरीचा अनुवादही त्यांनी केला आहे. कांदबरी या वाङ्मय प्रकारावर विलक्षण हुकमत असणाऱ्या प्रा. तिवारी यांनी कथा, कविता हे वाङ्मय प्रकारही समर्थपणे हाताळले. 'मौनाची महासमाधी' हा त्यांचा कथासंग्रह प्रसिद्ध आहे. अगदी अलीकडेच त्यांनी 'वारी' या विषयावर दीर्घकविता लिहिली आहे. प्रा. तिवारी यांना इतिहासातल्या अनेक व्यक्तिरेखांनी मोहिनी घातली. या व्यक्तिरेखांचे अलौकिकत्व त्यांना भावले. त्यातूनच अशा व्यक्तिरेखांच्या शोधांचा प्रातिभिक प्रवास सुरू झाला. आमिर खुस्त्रो, अल्लाउद्दीन खिलजी, गोपाल नायक, महादजी शिंदे यांच्यापासून ते रस्त्यावर नाचणाऱ्या आणि आपल्या आयुष्यात अनेक नाट्यमय वळणे घेणाऱ्या बेगम समरूपर्यंत असंख्य व्यक्तिरेखांना त्यांनी आपल्या कलाकृतीमध्ये जिवंत केले. महादजी शिंदे यांचा पराक्रम सर्वांनाच माहीत आह; पण प्रा. तिवारी त्यांच्या रसिकतेचाही शोध घेतात. १९७५ मध्ये प्रा. तिवारी यांची 'संपल्या सुरावटी' ही कादंबरी गो. नी. दांडेकर यांच्या हस्ते प्रसिद्ध झाली. रवींद्रनाथ टागोर या व्यक्तिरेखेनेही त्यांना अशीच भुरळ घातली. 'गुरुदेव' या कादंबरीसाठी त्यांनी सात वर्षे घालवली. वेगवेगळे विषय शोधून त्यांची रहस्यमय गुंफण करायची आणि ऐतिहासिक तपशिलांमध्ये मानवी जीवनाच्या व्यामिश्रतेची गुंफण करायची, हे प्रा. तिवारी यांच्या कादंबरी लेखनाचे वैशिष्ट्य आहे. ते मूळचे सोलापूरचे. नोकरीनिमित्ताने १९६४ साली प्रा. तिवारी अंबाजोगाईत दाखल झाले. मराठी व हिन्दी भाषेतले अनेक सन्मान प्रा. तिवारी यांना लाभले. अंबाजोगाईसारख्या गावी राहूनही त्यांच्यातला सृजनशोध निरंतर चालूच आहे.

**११वी आवृत्ती**

# खेकडा



लेखक
रत्नाकर मतकरी

किंमत - १००/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

'खेकडा' या कथासंग्रहातील बहुतेक सर्वच कथांमधून जे भय दाटून राहिलेले आहे, ते वाचकाला कडकडून दंश करणारे आणि जिव्हारी झोंबणारे आहे. या भयात वाचकाचे अवघा मनोव्यापार झपाटून टाकण्याची शक्ती आहे. या कथा वाचून अंगावर जो सरसरून काटा उभा राहतो, तो दीर्घ काळ तसाच टिकून राहतो; कारण या कथा मूलभूत वास्तव कधी विसरत नाहीत.
जसे 'तुमची गोष्ट' आरंभीच लेखक सांगतो, 'ही तुमची गोष्ट आहे म्हणजे तुमच्याही बाबतीत घडू शकेल अशी' आणि शेवटीही निक्षून सांगतो, 'तुमची म्हणून सांगितलेली ही गोष्ट तुमची नव्हेच; एक आपली शक्यता सांगितली एवढेच.' पण तरीही या कथेत ज्या थरारक अनुभवांचे निवेदन आहे, त्याचा प्रभाव इतका विलक्षण आहे की, अपराधाचा स्पर्श तुमच्या मनीमानसी नसूनही, तुमच्या गळ्याभोवती फासाचा स्पर्श झाल्याची भावना तुम्ही अनुभवता.
रत्नाकर मतकरी हे एक सिद्धहस्त कथाकार आहेत आणि या कथासंग्रहातील कथा मराठी भाषेत तरी दुर्मिळ अशा आहेत. या कथांचे अन्य भाषांतून अनुवाद झाले तर ते फक्त मतकरींचेच प्राप्त यश वृद्धिंगत करतील असे नव्हे, तर परिणामी मराठी भाषेलाही ललामभूत ठरतील.




# क्रिटिकल मास



**स्टीव्ह मार्टिनी** यांचा जन्म सॅनफ्रान्सिस्को इथे झाला आणि दक्षिण कॅलिफोर्नियात त्यांचे बालपण गेले. युनिव्हर्सिटी ऑफ कॅलिफोर्निया, सांताक्रूझ इथून त्यांनी ऑनर्स ही पदवी मिळवली. आपल्या कारकिर्दीची सुरुवात त्यांनी वृत्तपत्र क्षेत्रात केली. त्यांनी लॉस एंजलिसमध्ये वृत्तपत्र वार्ताहराचे आणि ‘कॅलिफोर्निया स्टेट कॅपिटल’मध्ये सॅक्रामेंटो इथे संपर्कतज्ज्ञाचे काम केले. पॅसिफिक विद्यापीठातील ‘मॅकजॉर्ज स्कूल ऑफ लॉ’मधून कायद्याची पदवी मिळवण्याआधी ते कायदेविषयक बाबींचे तज्ज्ञ म्हणून काम करत.

‘स्टेट बार ऑफ कॅलिफोर्निया’मध्ये त्यांनी कायदेप्रतिनिधी म्हणून काम केले. क्रूर अत्याचारांचे बळी ठरलेल्यांसाठी असणाऱ्या समितीत खास सल्लागार म्हणूनही त्यांनी काम केले. ते व्यवस्थापन कायद्यातील न्यायाधीश होते आणि सुनावणीचे पर्यवेक्षक अधिकारी होते.

१९८४मध्ये आपल्या प्रतिभेचा उपयोग त्यांनी कादंबरी लिहिण्यासाठी केला. ‘कम्पेलिंग एव्हिडन्स’ या कादंबरीत ‘ॲटर्नी पॉल माद्रिआनी’ याचा परिचय वाचकांना करून दिला. ती कादंबरी १९९२मध्ये प्रकाशित करण्यात आली. त्या कादंबरीला विक्रमी मागणी होती. त्या कादंबरीमुळे वैशिष्ट्यपूर्ण लेखक म्हणून मार्टिनी प्रसिद्धीच्या झोतात आले.

## अण्वस्त्रांची चोरटी वाहतूक करणाऱ्या एका जहाजावर घडलेले थरार नाट्य




लेखक : स्टीव्ह मार्टिनी
अनुवाद : सुदर्शन आठवले

नाव 'डान्सिंग लेडी' (नर्तिका) असलं तरी, आता त्या जहाजाच्या मूळ सौंदर्याचा लवलेशही उरला नव्हता. ते केवळ ६३ फूट लांबीचे, लोखंडाचे गंजलेले धूड उरले होते. जखमांतून पाझरणाऱ्या रक्तासारख्या लालसर गंजाचे जागोजागी घट्ट झालेले ओघळ त्याच्या विद्रूपतेत भर घालत होते, त्याची दुरवस्था दर्शवीत होते.

जहाजाची नाळ आणि त्याचे वर उचलले गेलेले तोंड व्हँकुव्हर बेटाच्या पश्चिमेकडच्या काळ्याशार पाण्यातून सात नॉटिकल मैल वेगाने मार्ग काढीत चालले होते. हवा खराब होत चालली होती, हे घोंघावणाऱ्या वाऱ्याच्या वाढत्या वेगावरून आणि समुद्राच्या उंचावणाऱ्या लाटांवरून स्पष्ट दिसत होते. उंच लाटेवर आरूढ होत आणि तिच्या पाठोपाठच्या खोल गर्तेत कोसळत जहाज कसेबसे मार्गक्रमण करीत होते. लाटा जहाजाला ज्या प्रकारे हेलपाटत होत्या, ते पाहून जहाजाचा कप्तान स्किपर नॉर्डक्विस्ट, त्याचा मुलगा बेन आणि दोन वेळच्या जेवणाच्या मजुरीवर काम करणारा आणखी

एकच खलाशी; अशा जहाजावर असलेल्या मोजक्या तिघांच्या चेहऱ्यावर घोर चिंता पसरली होती.

ते एक बळकट बांधणीचे, दोन इंजिनांचे, खोल समुद्रात मासेमारी करता येईल असे ट्रॉलर पद्धतीचे ताकदवान जहाज होते. त्याच्या सर्वांत मागच्या भागात एका प्रचंड मोठ्या चक्राला गुंडाळून ठेवलेली मासेमारीची जाळी तेवढी सोडली, तर त्या कुरूप जहाजात लक्षवेधक असे काहीही नव्हते. समुद्रात प्रवास करणाऱ्या इतर शंभर जहाजांसारखेच तेही एक अतिसामान्य जहाज होते. आकाशातून जहाजांची टेहळणी करणाऱ्या विमानांनाही त्याची दखल घ्यावीशी वाटली नसती. त्यांनी या जहाजाची निवड करण्याचे हेच एक महत्त्वाचे कारण होते.

जहाजाच्या शिडाच्या हालचालीला लागणारे तेल बरेच ठिकाणी गळते आहे, दोनापैकी एक इंजिन आवश्यक त्या तपासणीवाचूनच हजार तासांहून जास्त काळ चालले आहे, हे आणि असे इतर अनेक दोष नॉर्डक्विस्टसारख्या अनुभवी, तरबेज कप्तानाच्या लक्षात येत नव्हते, असे मुळीच नव्हते; पण त्या अत्यावश्यक दुरुस्त्यांसाठीही त्याच्याकडे पैसे नव्हते. रोज हाडे गोठवणाऱ्या थंडीत, शिडावर बर्फ झेलीत अठरा-अठरा तास काम करूनही त्याला रोजच्या जेवणाची भ्रांत पडत होती; त्याच्या बायकोवर अन्नछत्रातून जेवण आणण्याची पाळी आली होती. या जहाजासाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते साचले होते. धंद्यातल्या या डबघाईला जबाबदार होते अमेरिकन सरकार, जे व्हँकुव्हरच्या पश्चिमेकडील समुद्रात घुसून बेकायदा आणि वारेमाप मासेमारी करणाऱ्या कॅनेडियन मच्छीमारांविरुद्ध काहीही कारवाई करीत नव्हते. त्या अतिक्रमण करणाऱ्या चोरांनी नैर्ऋत्येकडच्या पाण्यातील सामन मासे तर खलास केले होतेच; इतरही कुठले मासे बाकी ठेवले नव्हते. सरकारी अधिकारी या अतिक्रमणाकडे काणाडोळा करीत होते. त्यांचे कान आणि डोळे उघडायला लागणारा पैशांचा खणखणाट करणे नॉर्डक्विस्ट आणि त्याचे अनेक सहकारी मासेमार यांना शक्य नव्हते. सरकारला परिस्थितीची जाणीव करून द्यावी, जाग आणावी यासाठी सरकारविरुद्ध, शासकीय धोरणांविरुद्ध काही असंतुष्टांनी मोहिमा उघडल्या होत्या, संघटनाही उभ्या केल्या होत्या; परंतु त्यांच्या वर्गण्या भरून त्यांच्यात सामील होणेही नॉर्डक्विस्टसारख्या गरिबांना परवडणारे नव्हते.

वाऱ्याच्या वाढत्या जोराला, वेगाला, लाटांच्या वाढत्या उंचीला आणि

खवळलेल्या समुद्राला तोंड देता देता जहाजाची इंजिने थकत आहेत, हे जहाजाच्या कमी कमी होणाऱ्या वेगावरून नॉर्डक्विस्टच्या ध्यानात येऊ लागले. उंचावर असलेल्या काचेच्या केबिनमध्ये जहाजाच्या चक्रासमोर उभे राहून उसळत्या लाटांत जहाज स्थिर ठेवणे त्याला कठीण जाऊ लागले. लाटांची उंची त्याच्या नजरेच्या पातळीइतकी वाढली. हवा अधिकाधिकच बिघडत होती. सागराच्या उन्मत्त होत चाललेल्या लाटा, 'डान्सिंग लेडी'ला त्यांच्याबरोबर तांडव करायला भाग पाडीत होत्या.

खालच्या बाजूला, जहाजाच्या अग्रभागी उभा राहून, दुर्बिणीतून पश्चिम क्षितिजाकडे पाहत असलेला त्याचा मुलगा बेन त्याला दिसत होता. एकदम दुर्बीण दूर करून, मागे वळून, आपल्याकडे तोंड करून, काहीतरी अचाट अफाट पाहिल्याचा आविर्भाव करीत, हातवारे करीत, जोराने ओरडत तो आपले लक्ष कोणत्या महाभयानक संकटाकडे वेधत आहे, हे नॉर्डक्विस्टच्या लक्षात यायला वेळ लागला नाही.

३० फूट उंचीची एक महाकाय लाट एखाद्या डोंगरासारखी त्यांच्या जहाजावर चाल करून येत होती. नॉर्डक्विस्टने क्षणाचाही विलंब न करता जहाजाचे चक्र गरागरा उजवीकडे फिरवले. ३० वर्षांच्या त्याच्या अनुभवापुढे त्या प्रचंड लाटेचे काही चालले नाही. तिची धडक जहाजाच्या पुढच्या निमुळत्या तोंडाऐवजी, क्षणार्धात काटकोनात वळलेल्या जहाजाच्या लांबलचक बाजूने झेलली. जहाज त्या धडकेने हादरले, लाटेत हेलपाटले; पण ती पार झाल्यावर सावरले.

बेन मात्र त्या धक्क्याने डेकवर फेकला गेला, तो सटपटला; पण प्रत्यक्ष मृत्यू समोर ठाकला असतानाही त्याच्याशी धीराने सामना करणाऱ्या आपल्या बापाच्या असाधारण कौशल्याचे, अचूक प्रसंगावधानाचे, अतुलनीय सामर्थ्याचे त्याला आश्चर्य आणि कौतुक वाटले. त्याच्याबद्दलच्या अभिमानाने त्याचा ऊर भरून आला.

* * *

'इस्व्हानिया' हे जहाज एके काळी रशियातील मासेमारी करणाऱ्या जहाजांच्या एका अग्रगण्य समजल्या जाणाऱ्या ताफ्यात होते, यावर विश्वास बसणार नाही अशी त्याची आजची स्थिती होती. आदल्या वर्षीच ते ताफ्यातून वगळून बाद केले गेले होते. पण रशियात सध्या कोणतीच गोष्ट

वेळेवर होत नव्हती, सर्वच बाबतींत चालढकल केली जात होती. त्यामुळे भंगारात जाण्यापूर्वी, कदाचित अखेरच्या प्रवासासाठी ते जराजर्जर जहाज बाहेर पडले होते. बेरिंग समुद्र पार करून, अल्युशियन बेटे आणि गल्फ ऑफ अलास्का यांना वळसा घालून कॅनडाच्या किनाऱ्याकिनाऱ्याने ते अमेरिकेच्या हद्दीत पोचले होते. वाटेत कॅनडाच्या किनाऱ्यावरील प्रिन्स रुपर्ट या बंदरात थांबून जुन्यापुराण्या फर्निचरचा एक मोठा गठ्ठा जहाजावर घेतला गेला होता. ते सोडल्यास डेकच्या मागचीपुढची सामान ठेवण्याची जागा रिकामीच होती आणि ते फर्निचर डेकवरच सहज दिसेल असे, उघड्यावर ठेवले होते. वाटेत कुठल्याही बंदरावर सरकारी अधिकाऱ्यांनी, समुद्रावर गस्त घालणाऱ्या संरक्षकदलाच्या जहाजांनी अडवले तर त्यांना दाखवण्यासाठीच तो माल जहाजावर चढवण्यात आला होता. अमेरिकेच्या हद्दीत शिरण्याचे सबळ कारण देता यावे यासाठी त्याच्या कागदपत्रांवर कॅलिफोर्नियातील ऑकलंड या शहरामधील एक पत्ता नोंदवला होता. अर्थात जहाजाच्या कप्तानाचा त्या पत्त्यावर जाण्याचा कोणताही इरादा नव्हता. जहाजाच्या तळात दडवलेला 'खास' माल पोचवायला ते जहाज एवढा आटापिटा करून, इतक्या लांबवर आले होते. तो माल योग्य ठिकाणी पोचला की, हे फर्निचरचे बेगडी ओझे समुद्राच्या तळाशीच जाणार होते. 'विहित कार्यभाग' यशस्वीपणे पार पडला की, ते जहाज थेट बँकॉकला जाऊन तेथील जहाजांच्या स्मशानात चिरनिद्रा घेणार होते.

सुकाणू धरलेल्या खलाशाने किनाऱ्याच्या पाच अंशात जहाज वळवून प्रवास चालू ठेवला होता. कप्तान यूरी व्हॅलेन्टोक दुर्बिणीतून दूरवरचा वेध घेत होता. लाटांचा जोर पाहून त्याला त्याच्या म्हाताऱ्या जहाजाची काळजी वाटू लागली. लाटांचा जोर इतका होता की, प्रत्येक लाटेबरोबर जहाजात पाणी शिरत होते आणि निरनिराळ्या ठिकाणच्या गळतीमुळे ते सगळे वेगाने जहाजाच्या तळाशी साठत होते. ते उपसण्यासाठी पंप होते; पण ते किती काळ तग धरतील, याविषयी यूरीला शंकाच होती. दुर्बिणीच्या पल्ल्यात काही म्हणजे काही दिसत नव्हते. त्यात पाऊस सुरू झाला. पावसाचे टपोरे थेंब बंदुकीच्या गोळ्यांसारखे कप्तानाच्या केबिनच्या काचेवर आपटू लागले. काचेवरील पाणी बाजूला सारणाऱ्या दोन वायपर्सपैकी एकच कसाबसा चालत होता. त्यामुळे काचेवर पाणी साचून बाहेरचे दिसणेही अशक्य झाले; इतके की, यूरीला त्याच्याच जहाजाचे पुढचे टोक पाहायला अवघड जात

१०वी आवृत्ती

# थैलीभर गोष्टी

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
लीना सोहोनी

किंमत - १७०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.



राजे राजवाडे, महाराण्या, राजपुत्र, राजकन्या, कंजूष माणसं, जवळ फुटकी कवडीही नसलेली दरिद्री माणसं, शहाणी माणसं, विद्वान माणसं, चतुर माणसं, मूर्ख आणि अडाणी माणसं, चमत्कारिक स्त्रिया व पुरुष, चित्रविचित्र घटना या सुरस कथांमधून जिवंत होऊन आपल्या भेटीला येतात.

एका कथेतील बुद्धिमान राजकन्येला आपल्यापेक्षा हुशार पती हवा असतो, म्हणून ती सर्व विवाहोत्सुक तरुणांना प्रत्येकी नऊ प्रश्न विचारण्याची संधी देते; पण अखेर तिलाही निरुत्तर करणारा कोणीतरी भेटतोच... एक अनाथ मुलगा आपल्या दुष्ट काकांना चांगली अद्दल घडवतो... आणि संकटात सापडलेल्या एका वृद्ध जोडप्याला उपयोगी पडतो तो एक ढोल! यातील काही कथा लेखिका सुधा मूर्ती यांनी आपल्या बालपणी आजी-आजोबांकडून ऐकल्या... तर काही कथा देशोदेशी केलेल्या भ्रमंतीच्या दरम्यान त्यांना ऐकायला मिळाल्या... काही कथा त्यांच्या स्वतःच्या कल्पनाशक्तीतून कागदावर उतरल्या...

या सर्वच्या सर्व सुरस, कालातीत अशा लोककथा गेली कित्येक वर्षे लेखिकेच्या मनात घर करून राहिलेल्या आहेत. वेळोवेळी आपल्या सहवासात आलेल्या लहान मुला-मुलींना, आपल्या विद्यार्थ्यांना त्यांनी त्या सांगितल्या आहेत.

आज या कथासंग्रहाच्या रूपाने या सर्व कथा लहान मुलांपासून मोठ्या माणसांपर्यंत सर्वच वाचकांना वाचनासाठी उपलब्ध होत आहेत.

होते. जहाजाची रडारयंत्रणा तर जहाज जेव्हा रशियातील व्हिडिव्होस्टॉक बंदरातून बाहेर पडले तेव्हापासूनच काम करीत नव्हती. त्यामुळे एक-दोनदा तर त्यांची अन्य जहाजाशी टक्कर होता होता वाचली होती. आता तर पावसाने थोड्या अंतरावरचेही दिसणे मुश्कील झाले होते. त्यामुळे त्यांनी जहाजाचा भोंगा वाजवतच ठेवला होता. आपल्या जहाजाच्या या स्थितीचा विचार करताना यूरीला तिची तुलना त्याच्या रशियाच्या सद्यःस्थितीशी केल्यावाचून राहवत नव्हते- पूर्ण बिघडलेली आणि दुरुस्त करायला लागणाऱ्या पैशांची चणचण असलेली!

यूरी व्हॅलेन्टोककडे जहाजावरील त्या 'खास' मालासंबंधीचे एक खास 'चलन' होते. हे चलन फक्त आणीबाणीच्या प्रसंगी; म्हणजे समजा जहाज तपासणीसाठी एखाद्या बंदरात अडवले गेलेच तर वापरायचे होते. ते 'चलन' खोटे होते. अधिकाऱ्यांना तो 'माल' गवसल्यास यूरीने 'हे काय आहे हे मला माहितीच नाही', असा दावा करून, चक्क हात वर करण्याची त्याला आज्ञा देण्यात आली होती. अर्थात त्या 'माला'चे खरे स्वरूप पाहता, त्याचे सोंग अमेरिकन अधिकाऱ्यांसमोर कितपत चालेल याची त्याला शंकाच होती. ते आपल्याला सुखासुखी सोडणार नाहीत. कदाचित चौकशीनंतर आपली रवानगी तुरुंगातही होऊ शकेल, या संकटांसाठी त्याने मनाची तयारीही केली होती. रशियातील तुरुंगापेक्षा अमेरिकेतील तुरुंग जरा बरे, कमी त्रासदायक असावेत, असा आशावादही त्याने मनाशी बाळगला होता.

त्याने टेबलावर पसरलेल्या नकाशावर लक्ष केंद्रित केले. बराच वेळ त्यात डोके घालून जहाजाच्या सांप्रतच्या स्थानाचा अंदाज घेतला. त्याचे अनुभवी गणित त्याला असे सांगत होते की, तो वान दी फ्युकाच्या सामुद्रधुनीच्या पश्चिमेकडे होता. तिथून तो सुमारे ११०-११२ नॉटिकल मैल गेला, तर त्याला प्यूजेटच्या खाडीपलीकडच्या अमेरिकेतील सीॲटल या शहरापर्यंत पोचता येणार होते.

यूरी व्हॅलेन्टोक त्याच्या दीर्घ सागरी कारकिर्दीत अमेरिकेत कधीच आला नव्हता. पण त्याच्या मित्रांपैकी काही अगदी नुकतेच येऊन गेलेले होते आणि त्यातल्या काहींची जहाजे 'इस्व्हानिया'सारखीच मरायला टेकलेली, भंगार म्हणून जाहीर झालेली होती. मात्र त्याचे ते मित्र रशियात परतले मात्र नव्हते. अलीकडे रशियन मच्छीमार जहाजांनी ही प्रथाच पाडली होती की, अमेरिकेच्या सागरी सीमेवर पोचायचे. जहाजावरील परदेशी आयातीचे सर्व

सोपस्कार पार पाडून अधिकारी एकदा जहाजावरून उतरले की, कप्तानासकट जहाजावरील सर्व जणांनी बंदरात उतरायचे. मग नंतर कुणीही जहाजावर परतायचे नाही. कुठल्यातरी गावा-शहरात लांडीलबाडीने अनधिकृत प्रवेश मिळवून तेथेच नव्या भूमीवर, एका नव्या आयुष्याला प्रारंभ करायचा; आपले नशीब आजमवायचे. भंगार जहाजाची विल्हेवाट लावायची जबाबदारीही अमेरिकनांवरच सोडून द्यायची. आपल्यावरील जोखमीची कामगिरी एकदा पार पडली की, आपणही त्याच मार्गाचा अवलंब करावा असा विचार व्हॅलेन्टोकच्या मनात मूळ धरू लागला.

'इस्व्हानिया'च्या पूर्वेला चार मैल अंतरावर नॉर्डक्विस्ट त्याच्या 'डान्सिंग लेडी'चे खवळलेल्या सागरात चाललेले 'पर्जन्यनृत्य' पाहत होता. जहाजाचे चक्र त्याने त्याच्या बळकट हातात सांभाळले होते. लाटांबरोबर वर-खाली होणाऱ्या जहाजात स्वतःचा तोल राखून उभे राहायला तिघांनाही अतीव कष्ट पडत होते.

'छे, डोळ्यात बोट घातलं तरी काही दिसत नाही!' बेन जुन्यापुराण्या फुरुनो कंपनीच्या रडाराच्या पडद्यावर चेहरा जवळपास चिकटवूनच त्यांना हवे असलेले जहाज कुठे लुकलुकते आहे का, ते पाहण्याचा वृथा प्रयत्न करीत होता. ''कसं समजायचं, आपण कुठे आहोत आणि ते कुठे आहे?'' तो पार वैतागून गेला होता.

''पहा, पहा, दिसेल.'' नॉर्डक्विस्ट एका बाजूला जहाजाहूनही उंच लाटांचा सामना करीत मुलाला सूचना देत होता. वारा, पाऊस आणि समुद्र यांची अशी काही जबरदस्त युती झाली होती की, त्यात त्यांचे जहाज एखाद्या काडीसारखे भेलकांडत जात होते.

लाट आली की, रडारावर हिरव्या रंगाची रेघ वेगाने वर जायची आणि लाटेबरोबर खालीही यायची. ''या लाटा इतक्या उंच उंच व्हायला लागल्या आहेत की काही दिसेनासं झालं आहे. ते जहाज समोरून येऊन धडकल्यावरच कळेल आपल्याला!'' बेनने वडिलांबरोबर बऱ्याच सफरी केल्या होत्या, पण अशा भयंकर पावसाचा व लाटांचा सामना त्याने कधीच केला नव्हता.

जहाजाशी टक्कर होण्याची भीती नॉर्डक्विस्टच्या मनालाही शिवून गेली होती, पण तिचा उच्चार बेनच्याच तोंडून झाला, याचे त्याला बरे वाटले. पण

त्या क्षणी टकरीपेक्षा तो पाठोपाठ येणाऱ्या लाटांच्या आक्रमणापासून जहाजाचे रक्षण करायच्या काळजीत होता. एखाद्या जीवघेण्या लाटेने धडक दिल्यावर जहाज परत जागेवर न येण्याची खूपच शक्यता होती. समुद्रात मृत्यू हजार रूपांनी आणि मार्गांनी येऊ शकतो, हे त्याला चांगलेच ठाऊक होते.

''काही म्हणजे काही दिसत नाही,'' बेनने परत तक्रार केली. ''समजा, ते दिसलं, भेटलं तरी या अशा जीवघेण्या पावसाच्या, लाटांच्या थैमानात आपण तो 'माल' त्या जहाजावरून आपल्या जहाजावर कसा आणणार आहोत?''

'हे बघ, आपण एका वेळी एक अडचण सोडवू या!' नॉर्डक्विस्टने घड्याळाकडे नजर टाकीत खिशातून एक छोटी, साधारण खिशातल्या कॅलक्युलेटरएवढी एक वस्तू बाहेर काढली. चाकावर एका हाताची पकड कायम ठेवून, दातांनी त्याने त्या वस्तूतून तीनएक इंच लांबीची अँटेना खेचून बाहेर काढली आणि दोन बटणे दाबली. ती वस्तू म्हणजे कोणत्याही स्थानाचे अक्षांश-रेखांश दाखवणारे 'जीपीएस' (ग्लोबल पोझिशनिंग सॅटेलाइट) नावाचे उपकरण होते. ते अगदी अचूक- शंभर टक्के विश्वासार्ह नव्हते. इतर जहाजांवर त्यापेक्षा चांगली, संगणकांना जोडलेली उपकरणे असत; परंतु चूकही काही हजार फुटांपेक्षा जास्त झाली नसती. त्यावरील अक्षांश-रेखांशाप्रमाणे, त्यांना भेटायला येणारे रशियन जहाज ठरल्या वेळेला निघून, ठरल्या मार्गाने प्रवास करीत आले असेल, आणि या वादळात भरकटले, हरवले नसेल तर ते त्यांच्यापासून पाव-अर्ध्या मैलांपेक्षा फार दूर नसणार होते.

त्या जहाजाशी रेडिओसंपर्क साधणे शहाणपणाचे ठरले नसते. समुद्रातील इतर जहाजांना, विशेषतः किनारा संरक्षक दलाच्या जहाजांना, त्या दोन्ही जहाजांची उपस्थिती लक्षात येणे धोकादायक होते. किनारा संरक्षक दलाच्या जहाजांना किनाऱ्यापासून २०० मैलांपर्यंतच्या भागात गस्त घालायचे अधिकार होते. त्यांच्या जहाजांवर अत्याधुनिक साधने, उपकरणे तर होतीच, शिवाय मदतीला विमानेही तैनात होती. अमली पदार्थांची तस्करी आणि इतर देशांतील बिकट परिस्थितीला कंटाळून अमेरिकेत स्थायिक होण्याच्या इराद्याने घुसू पाहणाऱ्यांची चोरटी आयात, यांवर त्यांचे करडे लक्ष होते. ऐन समुद्रात एकमेकांना भेटू पाहणारी अशी दोन 'प्रेक्षणीय' जहाजे

त्यांचे लक्ष्य नक्कीच झाली असती. म्हणूनच 'माल' रशियन जहाजाने कुठे आणि कसा पाण्यात सोडायचा; नॉर्डक्विस्टने तो पाण्यातून त्याच्या जहाजावर कसा घ्यायचा याची पद्धत अगदी तपशीलवार, अत्यंत काटेकोरपणे ठरवून देण्यात आलेली होती. प्रश्न एवढाच होता की, असा निसर्गाचा कोप झालेल्या बिकट परिस्थितीत त्याची अंमलबजावणी कशी करायची? असे कित्येक वर्षांत न झालेले प्रचंड वादळ नेमके आजच होईल याची त्या ठरवणाऱ्यांनाच काय; कुणालाच कल्पना नव्हती.

त्याच्या आकडेमोडीप्रमाणे व्हॅलेन्टोक त्यांच्या गुप्त 'गळाभेटी'च्या ठरलेल्या जागेच्या आसपास पोचलेला होता. आपल्या जहाजावरील जोखमीचा 'माल' जितक्या लवकर आपल्यापासून दूर, लांब जाईल तितक्या लवकर त्याला ते हवे होते. जरुरीपेक्षा थोडाही अधिक वेळ तो जवळ बाळगण्याची त्याची तयारी नव्हती. तो घेऊन जाण्यासाठी त्याला स्वप्नातही कल्पना करता येणार नाही इतके पैसे देऊ केले गेले होते. म्हणूनच केवळ त्याने तो माल त्याच्या जहाजातून नेऊन अमेरिकनांच्या ताब्यात देण्याचे हे जोखमीचे, धाडसी काम स्वीकारले होते. आता तो माल जहाजावरून खाली सोडण्याचे त्याने ठरवले होते. तो कसा शोधायचा हा प्रश्न तो अमेरिकनांवर सोडणार होता. 'त्यांच्या प्रश्नाचे उत्तर तेच शोधतील, मी कशाला त्याची आणि त्या शहाण्या अमेरिकनांची काळजी करू?' असा विचार करून त्याने जहाजाचा वेग कमी करण्याची आज्ञा दिली.

त्याच्या लोकांनी जहाजाच्या पाठीमागच्या बाजूच्या तळातल्या सामान साठवण्याच्या जागेवरील आच्छादन दूर केले, माल उचलण्याची क्रेन जवळ आणून उभी केली. काम जरा अवघड, कौशल्याचे होते. व्हलेन्टोकने आपल्या एका हुशार खलाशाला देखरेखीसाठी उभे केले. त्याच्यावर त्या 'ऑपरेशन'ची जबाबदारी सोपवून, स्वतः उंचावरच्या केबिनमधून त्यांचे निरीक्षण करू लागला. क्रेनचा हूक खाली सोडला गेला. व्हॅलेन्टोकला कामगारांचे आवाज ऐकू येत नव्हते; पण त्यांची लगबग दिसत होती. मुख्य खलाशी खाली वाकून हातवारे करून सूचना देत होता. माल घेऊन हूक वर येईपर्यंत व्हॅलेन्टोकच्या जिवात जीव नव्हता. जरा जरी चूक झाली असती तरी ती फार महागात पडली असती. दोन-तीन मिनिटेच, पण त्याने श्वास रोखून धरला होता. हूक हळूहळू वर येऊ लागला. त्याला अडकलेले, मासेमारीच्या

जाळ्यात गुंडाळलेले एक गलेलठ्ठ गाठोडे दिसू लागले. ते न बुडता, पाण्यावर तरंगत राहावे यासाठी शंकूच्या आकाराच्या तीन भडक भगव्या रंगाच्या 'बॉइज्'ना ते बांधलेले होते. तीन ताणांनी एकत्र बांधलेले, ते जाळीतले 'पार्सल' शिंकाळ्यासारखे दिसत होते. ते वर वर येऊ लागले. जाळीच्या आत किंतानात– पाणी जाऊ न देणाऱ्या कापडात– गुंडाळलेली वस्तू दिसत होती. आकाराने प्रचंड मोठी नसली तरी ती जड होती हे दोरांना बसणाऱ्या ताणावरून स्पष्ट लक्षात येत होते. अर्थात याहून कितीतरी जड सामान उचलण्याची क्षमता असणाऱ्या क्रेनसाठी ते वजन काहीच नव्हते. गाठोडे पुरेसे वर आल्यावर क्रेन काळजीपूर्वक जहाजाच्या बाहेरच्या बाजूला वळवण्यात येऊ लागली. गाठोडे जहाज सोडून पाण्यावर पोचले तशी क्रेनने ते हळूहळू खाली सोडायला सुरुवात केली. काही क्षणांतच 'माल' पाण्यात शिरला. त्याला बांधलेला दोर जहाजाच्या कडेच्या हूकला बांधण्यात आला.

श्वास रोखून त्या सर्व कृतीकडे पाहणाऱ्या व्हॅलेन्टोकने सुटकेचा निःश्वास सोडला; तोच त्याला जहाजाच्या पुढील टोकाकडून, खलाशांच्या जिवाच्या आकांताने मारलेल्या आरोळ्या ऐकू येऊ लागल्या. तो गर्रकन वळला. त्याच क्षणी आकाशात विजेचा प्रचंड मोठा कडकडाट झाला, त्याच विजेच्या लखलखाटात त्याला मागच्या बाजूने चाल करून येणारी एक पर्वतप्राय लाट दिसली. त्या लाटेपलीकडे त्याच्याच जहाजासारखे, त्याच आकाराचे दुसरे एक जहाजही त्याच्या सराईत नजरेने टिपले. त्या जहाजाच्या वरच्या केबिनच्या काचा विजेच्या चमचमणाऱ्या प्रकाशात उजळून निघाल्या; त्यावरून ते जहाज अगदी जवळ येऊन पोचले आहे हे त्याला कळले. पण त्याच प्रकाशात चमकणाऱ्या हिरव्या-पांढऱ्या लाटेच्या रूपातला अजस्र शत्रू जास्त खतरनाक होता. त्यामुळेच ते जहाज नजरेआड करत, व्हॅलेन्टोकने जहाज नव्वद अंश कोनात वळवण्याची आज्ञा बेंबीच्या देठापासून ओरडत दिली. सुकाणू धरणाऱ्यानेही तत्परतेने आज्ञेचे पालन केले. पण जहाज पूर्ण नव्वद अंशातून फिरण्याआधीच लाटेने त्याला निमुळत्या तोंडापाशी गाठले. लाट जहाजाच्या सर्वांत वरील केबिनपर्यंत पोचली आणि इतक्या जोराने आपटली की, केबिनच्या काचा तडकून त्यांचा चक्काचूर झाला.

जहाजावरील सर्व लोक, साधनसामग्री, यंत्रे, उपकरणे लाटेच्या तडाख्यात सापडली. धबधबा कोसळावा तशी ती लाट जहाजावर कोसळली आणि सगळेच्या सगळे, जहाजाच्या तळाशी जमलेल्या त्या हजारो टन

५वी आवृत्ती

# वेचलेली फुले

खलिल जिब्रान

अनुवाद व विवेचक
वि.स. खांडेकर

किंमत - ८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




खलिल जिब्रानच्या ‘द फोअर् रनर्’ (अग्रदूत) या पुस्तकातल्या अठरा रूपक-कथांच्या श्री. वि. स. खांडेकरांनी केलेल्या अनुवादांचा हा क्रमाने दुसरा संग्रह आहे. ‘सुवर्णकण’ हा जिब्रानच्या अनुवादित रूपक-कथांचा या आधीचा संग्रह. जिब्रानमध्ये कवी, टीकाकार व तत्त्वज्ञ या तिघांचं मिश्रण झालं आहे. या त्रिवेणी संगमामुळं त्याच्या कथांची रम्यता वाढली आहे; पण त्या रम्यतेबरोबर गूढतेनंही तिथं प्रवेश केला आहे.

सामान्य वाचकाला मूळ कथेचं मर्म अधिक स्पष्ट व्हावं, तिचा रसास्वाद अधिक सुलभतेनं घेता यावा, बाह्यतः जी त्याला काळोखानं भरलेली गुहा भासत असेल, तिथं उज्ज्वल प्रकाशानं नटलेलं सुंदर भूमिगत मंदिर आहे, याची जाणीव त्याला व्हावी, या हेतूनंच जिब्रानच्या अत्यंत अर्थपूर्ण आणि गूढरम्य कथांखाली सुंदर विवेचन करण्याची प्रथा श्री. खांडेकरांनी सुरू केली. या छोट्या छोट्या कथा वाचताना, जीवनातल्या सर्व विसंगती पूर्णपणे ठाऊक असूनही, त्याच्यावर उत्कट प्रेम करणाऱ्या, आपल्या कल्पकतापूर्ण उपरोधानं, ढोंग, जुलूम, असत्य, अन्याय यांचं हिडीस स्वरूप स्पष्ट करून दाखवणाऱ्या आणि जगातलं मांगल्य वृद्धिंगत व्हावं, म्हणून तळमळणाऱ्या आत्म्याचं दर्शन वाचकांना घडेल; आणि त्या आत्म्याच्या सान्निध्यात, घटकाभर का होईना, ते अधिक उन्नत, अधिक मंगल आणि अधिक विशाल अशा जगात वावरू लागतील, अशी खात्री वाटते.

पाण्यात पडले.

व्हॅलेन्टोक दोन्ही हातांनी कठडा घट्ट पकडून, बोटे लाकडात रुतवून प्रयत्नपूर्वक जागेवर खिळून राहिल्याने फेकला गेला नाही. श्वास रोखून तो ती जीवघेणी लाट ओसरण्याची वाट पाहत राहिला. त्याला क्षण युगांसारखे भासले, फुप्फुसे जळत आहेत असे वाटले, पण... पण ती लाट ओसरलीच नाही. त्यालाच काय, सर्वच खलाश्यांना आणि त्याच्या जहाजाला जलसमाधी मिळाली.

नॉर्डक्विस्ट विस्फारलेल्या डोळ्यांनी समोर घडणारे थरारनाट्य, प्रत्यक्ष मृत्यूचे तांडव पाहत राहिला. त्याच्या नजरेदेखत काही क्षणांपूर्वी अचानक समोर अवतरलेले ते जहाज उलटले होते. एका क्षणापूर्वी विजेच्या लखलखाटामुळे दिसलेल्या केबिनऐवजी आता, जहाजाच्या तळातले दोन विराट पंखे पाण्यावर दिसू लागले होते. ज्याला गाठण्यासाठी तो जिवाचा आटापिटा करीत होता, त्या 'माल' घेऊन आलेल्या रशियन जहाजाला त्याच्या डोळ्यांदेखत समुद्र आपल्या कराल दाढेखाली चिरडून, गिळून टाकीत होता.

नॉर्डक्विस्टचे पाय लटपटत होते, पण तो जागेवरच खिळून राहिला होता. भिजलेल्या अवस्थेत, एवढ्या गारव्यात कुडकुडत असतानाही त्याच्या कपाळावर घामाचे थेंब जमले होते.

पण तो भानावर आला, त्याची 'डान्सिंग लेडी'ही लाटांबरोबर हिंदळत होती. डेकवर गोंधळ माजला होता. डेकवर ठेवलेला लाकडी फर्निचरचा गठ्ठा जहाजाच्या हेलकाव्याने पाण्यात पडला होता हे त्याच्या लक्षात आणून देण्यासाठी सगळे खलाशी आरडाओरडा करीत होते. त्याने तातडीने जहाज जागेवर उभे केले, खलाशी तो गठ्ठा वर घेण्याचे काम करू लागले. तो विचार करू लागला – 'आपले जहाज, आपला जीव आणि आपल्या मुलाचा जीव वाचवणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच आपले सर्व आर्थिक प्रश्न सोडवणारा या कामाचा प्रचंड मोबदला पदरात पाडून घेण्यासाठी रशियन जहाजावरील 'माल' मिळवणेही महत्त्वाचे आहे.' जहाजाचे चक्र धरलेली त्याची बोटे पांढरी पडली होती. रशियन जहाजाची फिकीर करायची गरज नसली तरी 'माल' मिळायलाच हवा होता. एका जागेवर उभ्या केलेल्या जहाजातून त्याची नजर आता तो 'माल' शोधू लागली.

उलटे झालेले रशियन जहाज लाटांबरोबर वर-खाली होत होते. त्याच्या जरा बाजूलाच भगव्या रंगाचे काहीतरी दिसत होते. नीट पाहिल्यावर नॉर्डक्विस्टचे डोळे चमकले. ते बॉइज् आहेत, हे त्याच्या चाणाक्ष नजरेने अचूक हेरले. क्षणात ते पाण्यावर यायचे, क्षणात खाली जाऊन दिसेनासे व्हायचे. नॉर्डक्विस्टने बेनला हाक मारली आणि त्याचे लक्ष त्या भगव्या बॉइज्कडे वेधले आणि विचारले, ''दिसलं तुला?''

बुडणारे जहाज बेननेही पाहिले होते. तो म्हणाला, ''होय. आपण त्यांच्या मदतीला जायला हवे?''

''का कशाला?'' नॉर्डक्विस्टच्या उलट प्रश्नाचे बेनला आश्चर्य वाटले.

''कोणी जिवंत असण्याची शक्यता असू शकेल.''

''अशक्य आहे ते!''

''तुम्ही इतक्या खातरीपूर्वक कसं सांगू शकता?''

''अरे, जरा विचार कर. अशा परिस्थितीत तू राहिला असतास का जिवंत?''

त्या प्रश्नाचे उत्तर बेनलाही माहीत होते, पण तरीही माणुसकी विसरायला तो तयार नव्हता.

''तरी जवळ जाऊन पाहायला काय हरकत आहे?''

''का? मनाचं समाधान म्हणून?''

''आपण जर त्यांच्या जागी असतो तर....''

''पण आपण नाही आहोत तिथे! त्या रशियनांनी नाहीतरी जिवाचा धोका पत्करलाच होता...'' रशियनांबद्दल नॉर्डक्विस्टच्या मनात चांगलाच राग होता. मागच्या वर्षी एकदा नव्हे; दोनदा रशियन ट्रॉलर्सनी त्याच्या जहाजाला पळवून लावून माशांचा भल्यामोठ्या साठ्यापासून त्याला वंचित केले होते. त्याला माघार घेणे भागच पडले होते; कारण त्यांच्या वाटेत येणाऱ्या जहाजाला खलास करायला ते जंगी ट्रॉलर्स मागेपुढे पाहत नसत.

''भलत्या भानगडीत पडू नकोस. तिकडे ठेवलेली ती पेटी उघड आणि त्यातले बटण दाब.'' त्याने बेनला बजावले.

ती एक जुनाट हिरव्या रंगाची पेटी होती. त्यात पूर्वी रशियन लष्कर वापरत असलेला एक सबसॉनिक ट्रान्सरिसीव्हर होता. त्याचे बटण दाबले की, त्याच्याशी जोडलेल्या ट्रान्समीटरमधील भोंगा शंभर मैलांहून अधिक अंतरावरूनही त्या रिसीव्हरद्वारे ऐकू येत असे आणि मग त्या आवाजाचा माग

काढीत त्या ट्रान्समीटरपर्यंत पोचता येत असे. जो माल रशियन जहाज 'डान्सिंग लेडी'वर पोचवणार होते त्यात त्या रिसीव्हरला जोडलेला ट्रान्समीटर ठेवलेला होता. जहाजे जर सहजगत्या भेटू शकली नाहीत तरी याच्या साहाय्याने मालाचे ठिकाण शोधण्याचा हा हमखास उपाय होता. त्याचे आणखी एक उपयुक्त वैशिष्ट्य हे होते की, त्यातील संदेश समुद्रावरील दळणवळणातल्या नेहमीच्या वापरातल्या ध्वनिलहरींना पकडता येत नसे. जहाज शोधायला चार दिवस लागले तरीही काळजी नव्हती, कारण मालाला बांधलेल्या बॉइज्‌ची रचना अशी करण्यात आली होती, जेणेकरून ते चार दिवसांपर्यंत तरंगत राहू शकतील.

बेनने पेटी उघडून बटण दाबले मात्र, भोंग्याचा कानठळ्या बसवणारा आवाज घुमला. बेनने दुसरे बटण दाबून तो थांबवला. बाप-लेकांनी एकमेकांकडे पाहिले. आवाज अगदी जवळून येत होता. माल जवळच होता; पाण्यात पडलेला होता. ते भगव्या रंगाचे पाण्यावर दिसणारे बॉइज्- तोच माल होता! दोघांनी त्या बॉइज्‌कडे आणि मग एकमेकांकडे पाहिले. त्या गंभीर परिस्थितीतही त्यांच्या चेहऱ्यावर हलकेसे स्मित पसरले.

नॉर्डक्विस्टने जहाज त्या भगव्या बॉइज्‌च्या दिशेने हाकारले. लाटांच्या माऱ्यात जहाज सांभाळून, ते बॉइज् जहाजाच्या खाली न येऊ देता त्यांच्यापर्यंत पोचणे हे अवघड आणि धोक्याचे काम होते. जरा जरी चूक झाली असती तर त्यांनाही रशियन जहाजाच्या भेटीला जावे लागले असते.

''बेन, क्रेनपाशी जा, लवकर...'' बेन केबिनचे दार उघडून त्वरेने खाली क्रेनकडे गेला, तसे नॉर्डक्विस्टने इंजिनांचा वेग अगदी कमी- अस्थिर समुद्रात जहाज स्थिर राहायला आवश्यक तेवढाच- केला. आता त्याला जहाजाची दिशा, जागा अगदी थोडीही बदलणे शक्य होणार होते. बॉइज्‌च्या बाजूला जहाज नेऊन क्रेनच्या साहाय्याने गाठोडे उचलायचे होते. संधी हुकली आणि ते दृष्टीच्या टप्प्याबाहेर गेले, तर परत शोधणे कठीण गेले असते. कदाचित परत ट्रान्सरिसीव्हर सुरू करावा लागला असता. ते त्याला शक्यतोवर टाळायचे होते. कारण त्यांना बजावण्यात आले होते की, किनारासंरक्षक दलाच्या जहाजांची नाही, तरी 'किलर सब्ज' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकन पाणबुड्यांची संदेशयंत्रणा तो आवाज ऐकू शकते. त्या पाणबुड्या रशियन जहाजांची तस्करी रोखण्यासाठीच मुख्यत्वे तैनात करण्यात आल्या होत्या. त्यांना संशय येऊ देणे फारच घातक होते.

भगव्या बॉइज् दृष्टिपथात ठेवत नॉर्डक्विस्ट जहाज हाकारत होता. त्यांच्या खाली दहा-पंधरा फुटांवर जाळ्यात बांधलेला ‘माल’ असणार, याची त्याला कल्पना होती; पण त्याचा आकार, वजन यांबद्दल त्याला काहीच माहिती नव्हती. त्याची क्रेन खूपच लहान, कमी क्षमतेची होती. त्याला क्रेन त्या बॉइज्च्या जास्तीत जास्त जवळ न्यायची होती. बेन पाण्यात दिसणाऱ्या बॉइज्च्या खाली काही दिसते का, ते पाहण्यासाठी क्रेनजवळ ओणवा झाला होता. तो उठला. त्याने जहाजाच्या वेगाचा अंदाज घेऊन क्रेनचा हूक त्या बॉइज्च्या दिशेने, त्यात अडकावा या बेताने फेकला. तो अडकला की नाही, हे त्याने क्रेनची चेन वर ओढून पाहिले. दोन-तीन प्रयत्न फसले. चौथ्या वेळी चेन जड लागली आणि जहाज चक्क त्या बाजूला जरासे कललेही. ‘वजन चांगलेच जास्त असावे’ नॉर्डक्विस्टने मनाशी अंदाज बांधला. त्याच वेळी जहाज जरासे वळले आणि त्याबरोबर चेनला अडकलेले गाठोडेही पाण्यात हेलकावले. निम्मे काम झाले होते. ‘माल’ अडकला होता. बेन आणि जहाजावरील सहकारी कार्लोस क्रेनचे हँडल फिरवीत तो वर ओढू लागल्याबरोबर चेनमधून जोराचा आवाज येऊ लागला. चेन ज्या ड्रमभोवती गुंडाळली जात होती त्या ड्रममधून धूरही येऊ लागला. क्रेनला वजन पेलत नव्हते. बेन आणि कार्लोस दोघे पूर्ण जोर लावून हँडल फिरवीत राहिले.

नॉर्डक्विस्ट वरून पाहत होता. लाटेने जहाज हलले तर गाठोडेही जोराने हलत-हलत वर येत होते. क्रेनने तग धरावा, अशी मनोमन प्रार्थना करीत तो जहाजाची स्थिती सांभाळत होता. सुदैवाने लाटांच्या जोराची दिशा अनुकूल होती. त्यामुळे एका बाजूला वाढलेले वजन जहाज स्थिर राखायला मदतच करीत होते. जाळ्यातून आतले किंतान दिसू लागले. गाठोडे पाण्याच्या वर आले.

तेवढ्यात जहाज जोरात हालले. गाठोडे दूर जाते आहे असे पाहिल्यावर बेन धास्तावला. त्याने विचार न करता दोन्ही हातांची कव घालून ते पकडले आणि डेकवर ओढून घेतले. कार्लोसने चेन सोडली आणि गाठोडे धाडकन डेकवर कोसळले. तिथल्या लाकडाच्या फळ्या तुटल्या, पाणी डेकवर वाहू लागले.

किंतान फाटले होते. तशाच स्थितीत ते गाठोडे जहाजाच्या हेलकाव्यांबरोबर डेकच्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत घरंगळू लागले. फाटलेल्या आवरणामधून साधारण संत्र्याच्या आकाराचा एक धातूचा

गोल बाहेर पडला. तो जास्तच वेगाने जहाजाच्या दोन टोकांवर आदळू लागला. त्या आदळण्याचा आवाज नॉर्डक्विस्टच्या कानात पोचत होता. त्यावरून तो खूप जड असावा हे कळत होते. तो गोल काय आहे, कसला आहे हे कुणालाच माहीत नव्हते, पण नॉर्डक्विस्ट अंदाज लढवू शकत होता. हे काम देणाऱ्यांनी त्याला ज्या अनेक गोष्टी सांगितल्या होत्या त्यावरून त्या गोलापासून लांब आणि सावध राहणेच योग्य, असे त्याला वाटले. म्हणूनच बेनने तो हातांनी थांबवण्याचा प्रयत्न सुरू केल्यावर तो ओरडून त्याला त्यापासून दूर राहायला सांगू लागला.

''बेन, त्याच्यापासून लांब राहा, हात लावू नकोस त्याला,'' हे सांगण्यासाठी त्याने केबिनमधल्या कर्ण्याचाही उपयोग केला.

बेनने वडिलांचा इशारा ऐकून त्यांच्याकडे मान वर करून पाहिले. ज्यासाठी एवढा अट्टाहास केला, वादळवारा, लाटा यांचा सामना केला, ते रशियन जहाज सुदैवाने दिसले. ते बुडले; पण त्यातला 'माल' सुखरूप हाती लागला. आता तो हातातून सुटला, तर ते त्याला सहन होणार नव्हते. त्याने हिरिरीने झडप घातली आणि तो गोल हातात कवटाळला; त्याच वेळी त्याच्यामागे धावणाऱ्या कार्लोसचेही हात त्यावर पडले. दोघे तो हातात सांभाळीत होते आणि वरून नॉर्डक्विस्ट ''नको, सोड,'' असे जिवाच्या आकांताने ओरडत होता.

तो गोल बेनने हातात घेतल्यावर कार्लोसने आपले हात बाजूला घेतले. त्याच्या हाताला चमकणारा, चांदीसारखा रंग लागला होता. ते पाहून बेनने स्वत:चे हात पाहिले तर त्यावरही चांदीचा वर्ख लागला होता. त्यांच्या आजूबाजूलाही पावडरसारखे काहीतरी उडत असलेले त्यांना दिसले. ते वाऱ्यावर उडत, पसरत पसरत दूरवर पोचत होते. एवढा जड, वर्ख लावलेला, हवेत काहीतरी उत्सर्जित करणारा, अजब, जादूचा वाटावा असा गोल पदार्थ त्यांनी कोणीच यापूर्वी कधीच पाहिला नव्हता.

नॉर्डक्विस्ट वरून बेनचे ते अघोरी साहस पाहत होता, त्याचा वासलेला जबडा मिटत नव्हता... त्यात आश्चर्य नव्हते, तर आत्यंतिक भीती होती. जे घडायला नको ते घडले होते. का कोण जाणे, त्याचे मन त्याला सांगत होते की, त्याचा मुलगा त्याला परत कधीच भेटणार नाही!

७वी आवृत्ती

# पितृऋण

मूळ लेखिका
सुधा मूर्ती

अनुवाद
मंदाकिनी कट्टी

किंमत - ९०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




माणसाचं आयुष्य ही एक अजब गुंतागुंत!
नात्यांची, भावनांची आणि अतर्क्य घटनांची!
काही नाती कोणतेही भावबंध निर्माण न करणारी,
तर काही नकळत नात्यांचे बंध उरात जपणारी!
काळाचा दीर्घ पडदा सरून गेल्यानंतरही
एका अनोख्या नात्याची ओळख होते.
मग...
नियतीचा बळी ठरलेल्या पित्याची जबाबदारी स्वत:चं
अर्घ्य देऊन पूर्ण करणाऱ्या कर्तव्यशील पुत्राचं अस्वस्थपण...
आणि त्या पूर्ततेसाठी खंबीर उभी राहिलेली कन्या,
यांचं अतूट नातं जपणारी ‘पितृऋण’!
सुधा मूर्ती यांच्या वैचारिक, भावनाप्रधान लेखणीचा नवा आविष्कार!




# अ नोट फ्रॉम इचियो



**रेई किमुरा** या व्यवसायाने वकील आहेत, त्याचबरोबर ऑस्ट्रेलियन न्यूज सिंडिकेटच्या अधिकृत फ्री लान्सर जर्नलिस्टही आहेत. परंतु वैशिष्ट्यपूर्ण घटना आणि व्यक्तिमत्त्वांच्या रेखाटनाची एक नैसर्गिक ओढ त्यांना असल्याने त्यांचे लेखनही वैशिष्ट्यपूर्ण ठरते. सत्यावर आधारित घटनांना आपल्या कल्पनाशक्तीने त्या सहजपणे कथारूप देतात.

आजपर्यंत त्यांच्या 'बटरफ्लाय इन द विंड', 'जॅपनीज रोझ', 'जॅपनीज ऑर्किड', 'आवा मारू– टायटॅनिक ऑफ जपान', 'माय नेम इज एरिक' अशा अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. तसेच यांतील अनेक कादंबऱ्यांचे आतापर्यंत अनेक आशियाई आणि युरोपीय भाषांमध्ये अनुवादही झाले आहेत. त्यांचे बरेचसे लेखन ऐतिहासिक घटनांवर आधारित आहे. ऐतिहासिक काळातल्या अनेक वास्तव घटना, प्रसंग आणि व्यक्तिमत्त्वांना त्या आपल्या लेखणीतून जिवंत करतात. परंतु तरीही त्यांचे लेखन केवळ ऐतिहासिक घटना-प्रसंगांपर्यंतच मर्यादित नाही; त्यांनी आपल्या 'Aum Shinrikyo-Japan's Unholy Sect' या कादंबरीत १९९५ मध्ये टोकियो सब-वेवर झालेला दहशतवाद्यांचा हल्ला आणि त्यातील विदारकता यांचे हृदयद्रावक चित्रण केले आहे. तसेच आपल्या खेळकर शैलीत 'माय नेम इज एरिक' या कादंबरीमधून खट्याळ आणि धमाल उडवणाऱ्या कुत्र्याबद्दलही लिहिलेले आहे.

अशा प्रकारे आपल्या लेखनातून त्यांनी विविध प्रकारचे विषय हाताळलेले दिसतात. सामाजिक दृष्टीने संवेदनशील विषयही त्या समर्थपणे पेलताना दिसतात. सातत्याने सत्याचा शोध घेणारे, आव्हानांना सामोरे जाणारे आणि पूर्णत्वासाठी प्रयत्नशील असणारे लेखन असावे, यावर किमुरा यांची श्रद्धा आहे.

# जपानमधील सौंदर्याचा मादक बाजार




**लेखिका : रेई किमुरा**
**अनुवाद : सुनीता कट्टी**

या पुस्तकातील काही भाग वाचकांसाठी येथे देत आहोत

१८९३च्या उन्हाळ्यापर्यंत इचियोनं बऱ्याच लघुकथा व कादंबऱ्या लिहिल्या होत्या; पण त्यानं हिगुची कुटुंबाचा आर्थिक भार फारसा कमी झाला नव्हता. त्यांचं आर्थिक संकट एव्हाना इतकं मोठं झालं होतं की, कितीही मनात नसलं तरी त्यांना त्याची भीषणता मान्य करावीच लागली. सभ्य, सन्मान्य समाज राहत असलेल्या शहराच्या उच्च वस्तीत राहायला मिळावं म्हणून नोरीयोशींनी जिवाचं रान केलं होतं. ते तिथं कसेबसे पोहोचलेही होते; पण त्यांच्या कुटुंबाची तिच्यावरची पकड आता पार सुटत चालली होती.

त्या बिकट परिस्थितीत कसा तग धरून राहावं, याचा विचार करकरून फुरुयाचं डोकं थकून गेलं. शेवटी तिनं आपल्या दोन्ही मुलींना बोलावलं आणि घरातील काय काय वस्तू विकून टाकता येतील याचा अंदाज घेतला. आपल्या आई-वडलांनी मोठ्या हौसेनं खरेदी केलेलं फर्निचर लादलेली गाडी घराच्या आवारातून बाहेर पडताना पाहून इचियोच्या मनाची खूप तगमग

झाली. अतिशय त्रासदायक, दुःखद दिवस होते ते. घरातील एकेक किमती सामान बाजारात विकलं जात होतं. त्यांचे ठेवणीतील सुंदर किमोनो व सॅटिनच्या कंबरपट्ट्यांचे तर फक्त पंधरा येनच आले. कुनिको तशी खूपच हळवी होती. त्यांच्याकडच्या सगळ्या छान छान वस्तू, कपडे कपाटातून काढले जाऊन, वापरलेल्या पण अजून चांगल्या स्थितीत असलेल्या वस्तू विकणाऱ्या दुकानात नेल्या जाऊ लागल्या, तेव्हा तिचे डोळे रडून रडून सुजून गेले. इचियोनं मात्र ही गोष्ट फारशी मनाला लावून घेण्यासारखी नाहीये, अशा भावनेनं खांदे उडवले, ''कोणाला पाहिजेत नाहीतरी हे रेशमी किमोनो आणि सॅटिनचे कंबरपट्टे? ते सगळे श्रीमंत आणि लाडावलेल्या लोकांचे चोचले आहेत. आपल्यासारख्या कामकरी लोकांना पाहिजेत कशाला ते? निदान आता ते कोणाच्या अंगाला तरी लागतील,'' ती म्हणाली.

पण तरीही त्यांच्या वडलांनी हौसेनं शिवून घेतलेले ते कपडे विकावे लागले या गोष्टीचं दुःख इचियोला झालंच. शहरातील उच्चभ्रू वस्तीत राहता येणं, हा नोरीयोशींच्या दृष्टीनं एक अभिमानाचा विषय होता. कित्येक वर्षांपूर्वी आपल्या उच्च दर्जाचं प्रतीक म्हणून त्यांनी आपल्या मुलींसाठी ते महागडे कपडे शिवून घेतले होते.

शेवटचा चांगला किमोनो विकून झाल्यावर फुरुयानं जमलेले सगळे पैसे मोजले अन् ती अत्यंत निराशेनं म्हणाली, ''अजूनही इथून निघून जाण्याएवढा पैसा आपल्याकडे जमा झालेला नाही.'' विकण्यासारखी आणखी एखादी चांगली वस्तू उरली आहे का, या शोधात तिची नजर भिरभिरत असताना ती एका लाकडी पेटीवर स्थिरावली. त्या लाकडी पेटीत नोरीयोशीला जीव की प्राण असलेली वेगवेगळी सुंदर निसर्गचित्रे आणि लिखाणकामाचे सुंदर नमुने ठेवलेले होते. फुरुयाची नजर पाहून इचियो घाबरून जाऊन ओरडली, ''आई, बाबांचा निसर्गचित्रांचा संग्रह तर तू विकणार नाहीस ना?''

नाइलाज झाल्याप्रमाणे मुलीच्या विरोधाला न जुमानता फुरुयानं मान हलवली आणि ती एवढंच म्हणाली, ''मग तूच सांग मला, इथून निघून जाऊन, दुसरीकडं कुठंतरी एखादा छोटासा व्यवसाय सुरू करायला कुठून पैसा उभारणार आहोत आपण?''

आपल्या मनातील दुःख डायरीत प्रकट करताना इचियोनं लिहिलं होतं, 'आज आमच्या घरातील जवळजवळ सर्व गोष्टी विकल्या गेल्या. फारफार

असहाय, हतबुद्ध वाटत होतं. ज्या गोष्टींमध्ये आमच्या भावना गुंतलेल्या होत्या, त्यांचं रक्षण आम्ही करू शकलो नाही... हल्ली माझ्या प्रतिभेचं सगळीकडं कौतुक होतंय. मी पुढे एक फार थोर अन् प्रसिद्ध लेखिका म्हणून नावाजली जाणार आहे, असं लोक म्हणतात. आई आणि कुनिकोलाही असंच वाटतं; पण माझ्या या तथाकथित प्रतिभेमुळे आजवर काय भलं झालंय आमचं? काहीनाही! हिगुची कुटुंबात ठाण मांडून बसलेली गरिबी जराही इकडची तिकडे झालेली नाही. माझ्या प्रतिभेला ती जराही जुमानत नाही.'

काही दिवसांनी हिगुची स्त्रियांनी त्यांचं उरलेलं जुजबी सामान एका गाडीवर लादलं आणि रात्रीच्या अंधारात त्या गुपचूप शहराच्या वेशीजवळच्या बकाल वस्तीत राहायला गेल्या. त्याचबरोबर इचियो हळूहळू नकजिमाबाईसाहेबांच्या संस्थेतील काव्यवाचन करणाऱ्या श्रीमंत व कुलीन बायकांच्या गर्दीपासूनही दूर-दूर होत गेली. इचियोला या गोष्टीनं मनातल्या मनात बरंही वाटलं. त्या संस्थेशी आपला काही संबंध आहे, असं हल्ली तिला अजिबातच वाटत नव्हतं. तसंही त्यांचे ते उगाचच स्तोम माजवलेले काव्यवाचन समारंभ आणि चेरी ब्लॉसमच्या बहारीचा आनंद लुटण्यासाठी आयोजित केलेली प्रीतिभोजनं वगैरे सर्व तिला फार थिल्लर आणि व्यर्थ वाटू लागली होती. खाद्य वस्तूंची रेलचेल असलेल्या टेबलांपाशी त्या सुकुमार स्त्रियांना एवढंसं तेवढंसं कुरतडताना पाहून तिला कितीदा तरी आपल्या घरच्या जेवणाच्या ओक्याबोक्या टेबलाची आठवण येत होती. तिच्या आईला आणि कुनिकोला जाड्या भरड्या तांदळाचा भात आणि पातळ मिसो शिरो सूप मिळालं तरी धन्य वाटायचं आणि एखाद्या दिवशी माशाचं कालवण मिळालं म्हणजे तर त्यांना सणासुदीचा आनंद मिळायचा.

काव्यवाचन समारंभाच्या दिवशी ते चारी ठाव जेवण जेवताना आपल्या आईच्या आणि कुनिकोच्या आठवणीनं इचियोचा घास घशाशी अडकायचा. असं सुग्रास अन्न तिच्या कुटुंबीयांना स्वप्नातही पाहायला मिळत नसे, पण इचियो तशी व्यवहारी होती. 'मी इथं भरपूर खाऊन घेतलं तर माझं घरचं अन्न वाचेल,' असा विचार ती करत असे. आईला आणि कुनिकोला तेवढंच जास्त खायला मिळेल, असा विचार करून ती पोटभर खाऊन घेई.

उदरनिर्वाहाचं दुसरं कोणतंच साधन हाताशी नसल्यानं फुरुयानं स्वस्त आणि मस्त व्यापाराबद्दल आपल्या मनात असलेली नावड मनातच ठेवली.

मनातील चीड दाबत, आपली योजना सफल व्हावी यासाठी देवाची करुणा भाकली आणि शेवटी गावाच्या खालच्या अंगाच्या गरीब वस्तीत तिनं 'एक येन दुकान' उघडलं. ओळखीच्या लोकांनी हिगुची बायकांना दुकानदारीचं, खालच्या प्रतीचं काम करताना चुकूनही पाहू नये, अशी तिची मनापासूनची इच्छा होती. त्या खालच्या पातळीला जाताना तिला मनोमन फार यातना झाल्या होत्या, कारण मेजी जपानमध्ये दुकानदारांचा दर्जा शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांहूनही हीन मानला जात असे. आपल्या कुटुंबाला इतक्या खालच्या पातळीला आणून आपण नोरीयोशीच्या आठवणींशी प्रतारणा केली आहे असंच फुरुयाला वाटायचं. आपल्या कुटुंबाला शेतकरी वर्गातून बाहेर काढून सामुराई लोकांच्या थोडंफार जवळ नेण्यासाठी त्यानं जन्मभर केवढे कष्ट उपसले होते, हे तिच्यापेक्षा जास्त कोणाला माहीत होतं? आपण नोरीयोशीबरोबर किंवा त्याच्या आधीच मरून गेलो असतो तर किती बरं झालं असतं, असं कितीदा तरी फुरुयाच्या मनात येत असे. मग तिला शहरातील उच्चभ्रू लोकांच्या टेकड्यांच्या प्रदेशात राहण्यासाठी घोर संघर्ष तरी करावा लागला नसता. आणि एवढा आटापिटा करूनही त्या संघर्षात त्या शेवटी हरल्याच होत्या.

"आपला व्यापार करायचा निर्णय बरोबर आहे की चूक, काही कळत नाही मला." त्यांचं 'एक येन दुकान' सुरू करायच्या आदल्या दिवशी फुरुयानं आपल्या मुलींसमोर मनातील शंका आणि दुःख बोलून दाखवलंच, "व्यापाराबद्दल आपल्याला काय माहीत आहे असं? घरातील सगळ्या किमती वस्तू विकून टाकून आलेला पैसा, आपल्याला ज्याबद्दल काही माहीत नाही, अशा व्यवसायात गुंतवणं कितपत बरोबर आहे?"

"आई, खरंय तुझं म्हणणं. त्याबद्दल विचार केला तरी घाबरायला होतंय; पण उदरनिर्वाहासाठी आणखी काही साधन आहे का आपल्याकडे?" इचियोनं भांबावून जाऊन विचारलं, "आपण जवळ-जवळ सगळ्या मित्रांकडे, नातेवाइकांकडे उधारी-उसनवारी केलेली आहे. आता आणखी कोणाकडे म्हणून पैसे मागायचे?"

आपल्या बहिणीची नजर टाळत कुनिको म्हणाली, "मी परवा कांडा भागात गेले होते. तिथं मी कोणाला बघितलं माहीत आहे? अगं नकाराई तोसुईंना. ते चक्क एक चहाची लहानशी टपरी चालवत होते. इतका धक्का बसला मला त्यांना तसं पाहून!"

**४थी आवृत्ती**

# आजीच्या पोतडीतल्या गोष्टी




मूळ लेखिका - सुधा मूर्ती

अनुवाद - लीना सोहोनी

किंमत - १४०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

सुरस आणि चमत्कारिक गोष्टी ऐकायला कुणाला आवडत नाहीत! उन्हाळ्याच्या सुट्टीत कधी दिवसा, तर कधी रात्री आजी आपल्या नातवंडांना गोष्टी सांगायला घेऊन बसते.
ही नातवंडं आपल्या आजीकडे खेड्यात सुट्टी घालवायला आलेली असतात. आजीने आपल्या गोष्टींची पोतडी उघडल्यावर सगळे जण तिच्याभोवती गोळा होतात. आजीच्या पोतडीतून राजाच्या आणि भामट्यांच्या, माकडांच्या आणि उंदरांच्या, अस्वलाच्या आणि देवाच्या अशा असंख्य गोष्टी निघतात.
त्यात एक अस्वल खूप वाईट खीर खाऊन चिडतं, तर कधी गोष्टीतला माणूस इतका आळशी असतो की, समोर आग लागलेली दिसत असूनसुद्धा ती विझवण्याचे कष्ट घेत नाही आणि अखेर स्वतःची दाढी पेटल्यावर घाबरतो! कधी एका राजकन्येचं कांद्यात रूपांतर होतं, तर कधी एक राणी रेशमी वस्त्र बनवण्याच्या कलेचा शोध लावते.
प्राण्यांचे आणि माणसांचे विविध नमुने या गोष्टींमधून आपल्याला भेटतात. आजीच्या या गोष्टी मनोरंजक तर आहेतच; पण त्या मुलांना खूप काही ज्ञान देऊन जातात.
चला तर, या गोष्टींचा आनंद लुटू या!

इचियो मान हलवत शांतपणे म्हणाली, ''घाबरू नकोस. तोसुईंचं चहाचं दुकान आहे हे मला माहीत आहे. मुसाशिनो बंद पडलं आणि वर्तमानपत्रापासून त्यांना मिळणारा पैसा पुरेनासा झाला तेव्हा त्यांनी ते दुकान उघडलं, असं म्हणतात. अगं, आपण असा विचार करू या ना की, जर सुखासीन व उच्चभ्रू तोसुई चहाचं दुकान चालवू शकतात; तर हिगुची परिवार का व्यापारउदीम नाही करू शकत?''

इचियोनं आई व बहिणीसमोर धीटपणाचा कितीही आव आणला असला, तरी ज्यांच्याबद्दल तिला अपार आदर होता त्या तोसुईंवर चहाचं दुकान चालवण्याइतकी वाईट परिस्थिती आलेली पाहून, त्यांना गिऱ्हाइकांसमोर वाकून अभिवादन करताना, काम करताना पाहून इचियोच्या पोटात तुटायचं. सर्व काही संपवूनही आपल्याला त्यांच्याबद्दल इतकं वाटतं, या गोष्टीचा इचियोला धक्काच बसला होता.

तसं पाहिलं तर इचियो फार संकोची स्वभावाची होती. आपण बरं आणि आपलं काम बरं, अशी वृत्ती असल्यानं ती कोणाशीही जरुरीपेक्षा जास्त संबंध ठेवत नसे. सार्वजनिक स्नानघरात स्त्रियांचे घोळके एकत्र येऊन गप्पाटप्पा करत, भांडत-झगडत, समोर नसणारींचे दोष काढत; पण इचियो त्या बाजूला कधी फिरकतही नसे. घरी असतानाही ती शेजारपाजाऱ्यांशी ओळख करून घेण्याच्या किंवा त्यांच्याशी दोन शब्द बोलण्याच्या भानगडीत पडत नसे. बऱ्याच जणांना ती शिष्ट, गर्विष्ठ वाटे. काहींना ती विचित्र वाटे; पण सगळ्यांना मनातल्या मनात तिचं कौतुक वाटे. खरं तर स्त्रियांच्या दृष्टीनं तो काळ लिखाणासाठी फार प्रतिकूल होता. अशा खडतर परिस्थितीत प्रतिष्ठित कुटुंबाची पार्श्वभूमी नसणारी एक अत्यंत गरीब घरची स्त्री असूनही ती ज्या चिकाटीनं, धडाडीनं लेखन क्षेत्रात पाय रोवून उभी होती, त्यामुळे लोक थक्कच होत होते. काहींना तिचा हेवाही वाटे. सगळ्यांपेक्षा वेगळं होण्याचं, मळलेल्या वाटेनं न जाता, स्वतःचीच वेगळी वाट चोखाळण्याचं धाडस दाखवणाऱ्या या हिगुची मुलीबद्दल काहींना आदर वाटायचा. आपल्या जीवनात त्यांनी असं धाडस कधीच केलं नसतं.

खरं तर इचियोबद्दल वाटणाऱ्या या कौतुकाच्या, आदराच्या भावनेपोटीच नोरीयोशींच्या कित्येक नातेवाइकांना, मित्रांना व परिचितांनाही हिगुची परिवाराला त्यांच्या कष्टांच्या दिवसांत त्यांना भरभरून मदत करावी, असं वाटलं होतं. घेतलेले पैसे परत करण्यासारखी त्यांची परिस्थिती नव्हती,

हे माहीत असल्यामुळे बऱ्याच जणांनी ते परतही मागितले नव्हते.

‘एक येन दुकान’ सुरू करण्याचा विचार पक्का झाल्यावरही इचियोच्या मनात त्याबद्दल वेगवेगळे विचार येत होते.

‘गिऱ्हाइकांना खूश ठेवण्यासाठी मला वरवरचं हसू हसून इकडचं-तिकडचं बोलायलाच पाहिजे का? आतापर्यंत मी कोणाला खूश करण्यासाठी मनाविरुद्ध काहीही केलेलं नाही; पण तसं केलं नाहीतर गिऱ्हाइकांची मर्जी कशी राखता येईल?... दुकानाला वस्तू पुरवणाऱ्या ठोक दुकानदारांना मी तुसडी, शिष्ट वाटले तर?... माझ्या चुकीमुळे आमचं दुकान बंद पडलं तर?’

एकीकडं तिच्या मनात नव्या दुकानाबद्दल नाही नाही त्या शंका येत होत्या; तर दुसरीकडे या कामामुळे आपल्या लेखिका या स्थानाला कमीपणा तर येणार नाही ना, अशी भीतीही वाटत होती.

‘माझी पुस्तकं प्रकाशित झालेली आहेत. एक चांगली लेखिका असलेली मी या नको त्या उपद्व्यापात का पडतेय! हे लोकांपुढे झुकणं, गिऱ्हाइकांच्या पुढे-पुढे करणं! छे!’ इचियोच्या मनातील द्वंद्व संपता संपत नव्हतं.

हिगुची परिवाराच्या जीवनातील तो अत्यंत बिकट काळ होता. आपल्या आईचा आणि बहिणीचा उत्साह टिकून राहावा म्हणून इचियो वरवर आपण खूप शांत आहोत असं भासवत होती; पण आपल्या मनातील सर्व शंका, काळज्या, आपल्या कुटुंबाचा खालावलेला सामाजिक स्तर, त्याबद्दल वाटणारी खंत आणि लाज या सगळ्या गोष्टी इचियो आपल्या डायरीत प्रकट करत होती.

काही दिवसांपूर्वी घर व दुकानाची जागा शोधण्यासाठी त्यांना किती कष्ट पडले होते, हे तिच्या मनात ताजं होतं. बजेट कमी असल्यामुळे दिवसभर वणवण फिरूनही त्यांना पाहिजे तशी जागा मिळाली नव्हती. तिची बहीण चालून चालून अगदी दमून गेली होती. कष्टानं एकेक पाऊल उचलत तिच्या मागे मागे येत होती. तिच्या दुःखी-कष्टी, सुकलेल्या चेहऱ्यावरून, मानेवरून, पाठीवरून वाहणाऱ्या घामाच्या धारांनी तिचा जाडाभरडा युकता-शर्ट चिंब भिजलेला होता. तिची ती दयनीय अवस्था पाहून इचियोच्या काळजात कालवाकालव झाली होती.

अशा अवस्थेतच त्या एका बागेजवळ पोहोचल्या होत्या. बागेत वसंतोत्सव चाललेला होता. मुलं, तरुण मुली रंगीबेरंगी छान छान कपडे घालून हातातल्या सुमोमो पीच कांड्या चाटत होत्या. मिठाई विकणाऱ्या

हातगाडीवाल्याला गराडा घालून उत्साहानं काही ना काही विकत घेत होत्या. इचियोला जाणवलं की, या गंमतजंमत करणाऱ्या मुलींपेक्षा कुनिको काहीच वर्षांनी मोठी होती; पण तिला असं बेफिकीर, हौसे-मौजेचं बालपण मिळालंच नव्हतं. पोटाची खळगी भरण्यासाठी कोवळ्या वयातच आईबरोबर काबाडकष्ट करावे लागले होते. इचियोचं स्वतःचं बालपणही काही फार सुखात गेलं नव्हतं; पण त्याचं तिला फारसं दुःख नव्हतं, कारण तिला त्याची फारशी असोशी नव्हती. तिची आई म्हणायची त्याप्रमाणे ती जन्मापासूनच भलतीच समजूतदार, पोक्त होती. लहान होती तेव्हापासूनच तिचा चेहरा एखाद्या शहाण्या, म्हाताऱ्या माकडाप्रमाणे सुरकुतलेला होता. बाकीची लहान मुलं हसतात त्याप्रमाणे ती कधी खळखळून हसलीच नव्हती. तिनं कधी बालिश बडबडही केली नव्हती; पण कुनिकोचं तसं नव्हतं. ती लहानपणी बाकीच्या लहान मुलांसारखीच गोंडस, गुटगुटीत, हसरी होती. नोरीयोशी होते, तोपर्यंत ती आपल्या बाललीलांनी सगळ्यांवर वर्चस्व गाजवत होती; पण वडील गेले आणि ती अचानक मोठी झाली. कुटुंबाला आधार देण्याची जबाबदारी अंगावर पडल्यावर तिचे छोटेसे खांदे ओघळल्यासारखे दिसू लागले. खळी पडणाऱ्या तिच्या गालांवरचं हास्य कुठंतरी नाहीसं झालं. आधीची कुनिको खूप वेगळी होती. तिच्या मनासारखं सर्वसामान्य, छान बालपण तिला मिळायला पाहिजे होतं. तिच्या वयाच्या मुलींप्रमाणे तिला चांगलेचुंगले कपडे, खायला-प्यायला मिळायला पाहिजे होतं. इचियोला माहीत होतं की, कुनिको उघडपणे मान्य करत नसली तरी हरवलेल्या बालपणाची आणि तारुण्याच्या नव्हाळीची तिला खूप खंत होती.

एक खोलवर श्वास घेऊन इचियोनं आपल्या दमल्याभागल्या बहिणीचा हात पकडला आणि तिला घाईघाईनं ती तिथून दूर घेऊन गेली. तिथं जास्त वेळ रेंगाळल्यानं त्यांच्या हृदयातील जखम आणखी भळभळली असती, कारण त्यांना जे कधीच मिळणार नव्हतं, ते पाहून हळहळण्यात काय अर्थ होता! जितक्या लवकर त्यांना पाहिजे तसं घर मिळालं असतं आणि त्या जितक्या लवकर त्या घरात स्थिरावल्या असत्या, तितक्याच लवकर त्यांचं अनिश्चिततेचं व अस्थिरतेचं आयुष्य मार्गी लागलं असतं.

हिगुची बायकांची घर शोधण्याची मोहीम तीन दिवसांपासून चालू होती. त्या सकाळ-संध्याकाळ पायपीट करत होत्या. स्वस्तातील, घाणेरडी घरं पाहत होत्या. अखेर कंटाळून जाऊन त्या तो प्रयत्न सोडूनच देणार होत्या;

पण योगायोगानं त्या ऱ्युसेनजी नावाच्या एका वस्तीत आल्या आणि इचियोची नजर एका घराकडे गेली.

''आई, बघ ना! ते घर बरं दिसतंय. मागच्या बाजूला घराला छोटंसं अंगणही आहे. आतापर्यंत पाहिलेल्या एकाही घराला असं अंगण नव्हतं,'' इचियो आईच्या कानाशी कुजबुजली.

''खरंच की गं! तसं जुनंच दिसतंय घर. त्यामुळे आपल्या बजेटमध्ये बसेलसं वाटतंय; पण नत्सु, शेजारीपाजारी जरा...'' फुरुया आजूबाजूंच्या घरांकडे नजर टाकत म्हणाली.

आईच्या नजरेच्या दिशेस पाहिल्यावर आपण इथं राहिल्यास आपल्याला कोणत्या प्रकारचे शेजारी मिळतील याची इचियोला कल्पना आली.

''बाप रे आई!'' ती कुजबुजली; पण तिच्या आवाजात तिटकाऱ्यापेक्षा आश्चर्यच जास्त होतं. ''आपण शहरातील वेश्यांच्या वस्तीत आहोत अगदी!''

फुरुया मान हलवत म्हणाली, ''तेच तर म्हणायचं होतं मला. असला शेजार असलेलं घर पाहण्यात काहीच अर्थ नाही. ही जागा दोन तरुण मुलींना घेऊन राहण्यासारखी नाही.''

पण का कोण जाणे, इचियो त्या घराकडे खेचली जात होती. जवळपासच्या रंगीत, पण गुंतागुंतीच्या वातावरणातून तिचं मन हलता हलत नव्हतं. तिचा पाय तिथून निघतच नव्हता. ओळीनं उभ्या असलेल्या जुनाट लाकडी घरांच्या रांगेत ते घर उभं होतं. त्याला लागून असलेली बाग त्यांचं मन मोहवून टाकत होती. तिच्याकडे बोट दाखवत ती उद्गारली, ''आई, बाग असलेलं हे एकुलतं एक घर आहे गं!''

पण इचियोच्या दृष्टीनं घर, बाग, खिशाला परवडणारं भाडं या सर्व गोष्टींपेक्षा दुसरीच एक गोष्ट महत्त्वाची होती. बदनाम, बदफैली नकाराई तोसुई आणि त्यांच्या कलंकित जीवनाबद्दलचं तिचं विलक्षण आकर्षण तसंच वेश्यावस्तीतील ते घर आणि त्याच्या आसपासच्या बदनाम परिसराबद्दलचं तिचं आकर्षण म्हणजे तत्कालीन समाजाच्या तिच्याबद्दलच्या अपेक्षांविरुद्ध तिनं केलेलं बंड होतं. तोसुईंची अपकीर्ती जसजशी वाढत गेली होती तसतशी त्यांची तिच्या मनावरील पकडही वाढत गेली होती. आतासुद्धा भोगविलासांना उत्तेजित करणाऱ्या त्या वस्तीच्या मधोमध उभ्या असलेल्या त्या विचित्र घरानं तिच्यावर विलक्षण भुरळ घातली होती. इचियोमधील

लेखिकेवर त्या घरानं जणू गारुड केलं. खऱ्याखुऱ्या जीवनाबद्दल व लोकांबद्दल ती पुढे लिहिणार असलेल्या साहित्याला त्या वातावरणाची जिवंत पार्श्वभूमी लाभणार होती.

''नाही आई, घर न बघताच नाही म्हणू नकोस. ते कसं आहे ते आत जाऊन बघून तर येऊ या.'' घर पाहायला फुरुयाचं मन धजावत नव्हतं; पण इचियोनं तिला गळच घातली, ''हे बघ आई, तीन दिवसांपासून पायपीट चाललीये; पण आपल्याला आवडणारं आणि परवडणारं एकही घर अजून मिळालेलं नाही. एकदा पाहून तर घेऊ हे घर. नाही आवडलं तर सोडून देऊ. आपल्यावर कोणाची बळजबरी थोडीच आहे!''

दुसरं कोणतंच घर नजरेत नसल्यानं शेवटी फुरुया ते घर नजरेखालून घालायला तयार झाली. नंतर दोन वर्षं हिगुची कुटुंब त्या घरात राहिलं. इचियोमधील लेखिका जरी त्या वातावरणात रमली असली, तरी फुरुयाचा तेथील प्रत्येक क्षण त्या घराला शिव्याशाप देण्यातच गेला होता.


त्या घरात प्रवेश करताच आपल्याला नवीन घर मिळाल्याची इचियोची खातरी पटली. तिच्या आईला ते फारसं आवडलं नसलं तरी कुरकुरत का होईना तिला आपल्या मुलीच्या इच्छेपुढे मान तुकवावीच लागली. तीन खोल्यांच्या त्या घरातील दोन खोल्या राहतं घर म्हणून त्या वापरू शकत होत्या आणि तिसऱ्या खोलीत त्या दुकान थाटू शकल्या असत्या. अशी व्यवस्था दुसऱ्या कोणत्याच घरात नव्हती.

तीन दिवसांत हिगुचींनी त्या घराच्या डिपॉझिटची रक्कम भरली. घरातलं थोडं बहुत उरलेलं सामान एका गाडीत घालून त्या आणखी एका नव्या घरात राहायला जायला सज्ज झाल्या.

मनावरील भार उतरल्याप्रमाणे इचियोनं आपल्या डायरीत लिहिलं होतं की, त्यांचं हे घर खरंच वेश्यांनी आणि गेश्यांनी घेरलेलं होतं. 'शहराच्या टेकड्यांच्या उच्चभ्रू परिसरातील आमचे आधीचे शेजारीपाजारी किंवा ओळखीचे लोक कधी काळी इथं येतील आणि उदरनिर्वाहासाठी ते आम्हाला दुकान चालवताना पाहतील ही शक्यता आता अगदी शून्यावर आलेली आहे.'

'नकजिमाबाईसाहेब आणि हागिनोयातील उच्चभ्रू बायका फिरत फिरत इथं येतील आणि इथल्या वेश्यांशी किंवा त्यांच्या चाहत्यांशी गप्पागोष्टी करतील, ही अगदी अशक्य कोटीतील गोष्ट आहे.' धीटपणाचा आव आणत

**८वी आवृत्ती**




आधुनिक भारताचे प्रेषित

# स्वामी विवेकानंद

मूळ लेखक
गौतम घोष

अनुवाद
माधव मोर्डेकर

किंमत - २५०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

स्वामी विवेकानंद या नावाचा केवळ उच्चारच आपल्याला एका उदात्त, उत्तुंग आणि उन्मनी अवस्थेत घेऊन जातो. त्यांच्या जीवनाचा वेध घेणे म्हणजे भारतीय संस्कृती, तिचे नैतिक अधिष्ठान, तिची जीवनमूल्यपद्धती यांचा अभ्यासच आहे. त्यांनी दिलेला सहिष्णुतेचा संदेश खऱ्याखुऱ्या मानाचा आविष्कारच आहे. त्यामुळे स्वामीजी या देशाचे एक आदर्श, अनुकरणीय प्रवक्तेच ठरतात.

त्याशिवाय, आपल्या सभोवतालच्या तळागाळातील जनसामान्यांच्या कल्याणासाठी संन्याशांचा संप्रदाय निर्माण करण्याचे जे व्रत त्यांनी घेतल, त्यामुळे स्वामी विवेकानंद एक महान प्रेषित व असाधारण लोकाग्रणी ठरतात. आजघडीला तर त्यांच्या शिकवणुकीतील यथार्थता बावनकशी सोन्यासारखी वाटते.

आज भारतातील राजकीय, सामाजिक व आर्थिक वातावरण इतके गलिच्छ व गढूळ झालेले आहे, धार्मिक असहिष्णुता आणि माथेफिरूपणा इतक्या टोकाला गेलेला आहे की 'यदा यदा हि धर्मस्य...' या भगवद्‌गीतेतील वचनाप्रमाणे स्वामी विवेकानंदांसारख्या महापुरुषाने पुन्हा एकदा भारतात अवतार घेऊन आपल्या देशाला- नव्हे संपूर्ण जगाला या वाढत्या प्रक्षोभातून सुखरूप बाहेर आणावे, असे उगीचच वाटत राहते.

इचियोनं हसायचा प्रयत्न करत लिहिलं होतं.

त्या घरात राहायला गेल्यावर काही दिवसांनी इचियोनं डायरीत लिहिलं होतं- ‘या गंमतशीर नव्या घरात का कोण जाणे; पण मला बरं वाटतंय. मला वाटतं, या नव्या घरात आम्ही आमच्याप्रमाणेच जगण्यास अयोग्य ठरलेल्या व तडजोडी करत जगणाऱ्या लोकांमध्ये राहत आहोत, या गोष्टीनंच मला बरं वाटतंय. मला माहीत आहे की सार्वजनिक स्नानगृहात बायका मला विचित्र, लहरी व थोडीशी वेडपटही समजत असतील, कारण ज्या गोष्टींमध्ये सर्वसामान्य बायकांना रस असतो, त्यांचं मला वावडं आहे. माझे किमोनो अगदी साधेसुधे व करड्या वा निळ्या अशा पुरुषी रंगाचे असतात. मी पुस्तकांच्या व संशोधनाच्या जगात जगते. तसेच माझ्या वयाच्या तरुण पुरुषांबरोबर वेळ घालवण्याऐवजी मला म्हाताऱ्या, टकल्या लेखकांबरोबर, कवी, प्रकाशकांबरोबर वेळ घालवायला आवडतो.’

‘रिक्षावाले आणि अश्लील कामचेष्टा चालणाऱ्या योशिवारामधील चहागृहाच्या वा दारूच्या गुत्त्यांची राखण करणारे धिप्पाड पहिलवान व आत काम करणाऱ्या वेट्रेसिस आमचे शेजारी आहेत. या दोन्ही गोष्टींशी संबंध नसणारा एकही माणूस आसपास नाही. आम्हीही अशाच लोकांच्या, सामानाच्या गरजा पूर्ण करणार आहोत.’

ऱ्युसेनजीमधील रात्री कधीही शांत नसायच्या. हिगुची कुटुंब तिथं जितके दिवस राहिलं तितके दिवस त्याला रात्री खूप उशिरापर्यंत रिक्षांच्या खडखडाटाचा, खाद्य पदार्थ विकणाऱ्या फेरीवाल्यांच्या आरोळ्यांचा, निर्लज्ज स्त्री-पुरुषांच्या खिदळण्याचा आवाज ऐकू येत राहायचा. चहागृह व गुत्त्यातील शेवटचं गिऱ्हाईक झोकांड्या देत बाहेर पडेपर्यंत रात्रीचे जवळजवळ तीन वाजलेले असत. तोपर्यंत हा गोंधळ, आरडाओरडा चालूच असे. त्या गिऱ्हाइकाच्या मागे मागेही एखादी मुलगी जातच असे. रात्रीच्या अंधारात सगळे विलीन झाल्यानंतरही गादीवर पडलेल्या इचियोच्या कानात त्यांचं बरळणं, हसणं-खिदळणं, आनंदाचा जल्लोष घुमतच असे.


सर्वांत जवळचा कुंटणखाना त्यांच्या घरापासून काहीच फुटांच्या अंतरावर होता. इचियोनं डायरीत लिहिलं होतं की, तिनं जरासा हात लांबवला असता तरी तिच्या हाताला जवळच्या, ओळीत उभ्या असलेल्या, कामसुख पुरवणाऱ्या एखाद्या दुकानाची भिंत लागली असती. लाकडाच्या पातळ भिंतीच्या पलीकडून, त्यांच्या शेजारच्या घरांमध्ये चालणाऱ्या

७वी आवृत्ती

# मधुमेह
## एक आव्हान

डॉ. अरुणा जैन
डॉ. अशोक जैन

किंमत - १८०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




आधुनिक युगातील जीवनशैलीमुळे माणसासमोर जी आव्हाने उभी राहिली आहेत, त्यामध्ये मधुमेहाचे आव्हान गंभीर आहे; एवढेच नव्हे तर जगात मधुमेहाचे प्रमाण वाढत आहे.

'मधुमेह : एक आव्हान' यामध्ये मधुमेहाचा परिचय करून देत असता या आजाराला जबाबदार घातघटक आणि आजाराची लक्षणे याचे विवेचन केले आहे. मधुमेहावर अद्याप परिणामकारक उपाय सापडला नसल्याने, त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी योग्य आहार, औषधोपचार आणि व्यायाम यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या पुस्तकात त्याबद्दल सविस्तर माहिती दिली आहे. आजार उग्र न होण्यासाठी प्रतिबंधक उपाय सुचवले आहेत, त्याचबरोबर मधुमेहाचे दुष्परिणाम यावर विवरण आहे. यातील परिशिष्टे आजार नियंत्रण प्रभावीपणे कसे करायचे, याकरता उपयुक्त आहेत.

डॉ. अरुणा जैन आणि डॉ. अशोक बिरबल-जैन हे वर्धा येथील मधुमेह, हृदयरोग व अस्थमा निवारण केंद्र यांचे संचालक आहेत.

शृंगाराचे पडसाद त्यांना रात्री-बेरात्री ऐकू येत, हे सांगण्याची गरजच नाही.

''या लोकांना एकही दिवस सुट्टी नसते का? सारखं आपलं तेच न तेच चाललेलं असतं!'' सुरुवाती-सुरुवातीला झोप आणण्याच्या प्रयत्नांत उशीवर तळमळणारी कुनिको, समोरच्या व शेजारच्या कुंटणखान्यातील आवाज कानांआड करण्याचा प्रयत्न करत कुरकुरायची.

पण कुटुंबातील इतर लोकांप्रमाणे तिलाही लवकरच या सगळ्या आवाजांची सवय झाली आणि रिक्षांच्या कर्कश खडखडाटातही तिला झोप लागू लागली.

'शहरातील हा भाग दिवसा ढाराढूर झोपलेला आणि रात्री टळटळीत जागा असतो,' इचियोनं तिच्या डायरीला माहिती पुरवली होती. चहागृहातील व कुंटणखान्यातील मुली रात्रीच्या, झिंगून केलेल्या आरड्याओरड्यानंतर शांत होऊन दिवसा एकेकट्या किंवा आपल्या गिऱ्हाइकांबरोबर आळसटून झोपत. सूर्य बुडाल्यानंतर सुरू होणाऱ्या विषयवासनांच्या जल्लोषात परत दुप्पट उत्साहानं सामील होण्यासाठी त्या जणू स्वतःला तयार करत असत. काळोख पसरू लागताच, तिथल्या गल्ल्या सगळा आळस झटकून जाग्या होत. रिक्षा भरभरून येत असलेल्या पुरुष गिऱ्हाइकांचं तेथील भडक संगीत आणि उच्छृंखल खिदळणं स्वागत करत असे. लाडिक विभ्रम करणाऱ्या वेश्या त्यांना आपल्या मिठीत विरघळवत. तेथील आरड्याओरड्याला, हसण्या-खिदळण्याला, त्यांना खाद्य वस्तूंचा पुरवठा करणाऱ्या फेरीवाल्यांच्या खणखणीत आवाजाची – ''ओइशी जगाइ इमो'' 'चविष्ट गोड रताळी!' – साथ असे. उन्हाळ्यात, पावसाळ्यात, हिवाळ्यात ते फेरीवाले न चुकता तिथं हजर असत.

रिक्षांच्या व रस्त्यावरील फेरीवाल्यांच्या ठेल्यांवरील दिव्यांमुळे योशिवाऱ्याच्या रस्त्यांवर एक प्रकारचा गुलाबी उजेड पसरलेला असे; पण चहागृहांच्या प्रवेशद्वारांवर टांगलेल्या मोठमोठ्या आकाशदिव्यांचा भडक उजेड हिगुचींच्या घरात भसकन शिरत असे. तो त्यांना खुपत राहत असे. झोपू देत नसे; पण शेवटी त्यांना त्याचीही सवय झाली म्हणा किंवा त्यांनी त्याच्याकडे दुर्लक्ष करायचं ठरवलं म्हणा; पण त्यांची थकली गात्रं आपोआप झोपेच्या अधीन होऊ लागली.

योशिवारा ही इडो शहरातील बदनाम वेश्या वस्ती होती. इचियो आणि तिच्या कुटुंबाला पुढील नऊ महिने शरीरसुखाच्या या स्वर्गात (का

दलदलीत) राहायचं होतं.

आणखी थोडा फार विचार केल्यावर, हिगुची महिलांनी आधी ठरवल्याप्रमाणे स्वस्त वस्तू विकणारं 'एक येन दुकान' सुरू केलं. त्यांच्या या निर्णयानं पुढे त्यांचं नुकसान होणार होतं; पण त्या वेळी मात्र त्यांना तो निर्णय सर्वथैव योग्य वाटला होता. ते दुकान चालू राहावं यासाठी इचियोला रात्रंदिवस काबाडकष्ट करावे लागत. सामान पुरवठा करणाऱ्या धूर्त धटिंगणांशी रोज भाव-ताव करायला लागे. त्यांच्या कोरड्या आवाजानं आणि रांगड्या भाषेनं तिला ते सगळं नकोसं होऊन जायचं; पण तरीही तिला पाहिजे त्या किमतीत त्यांनी सामान देईपर्यंत ती आपला हेका सोडत नसे. सामान खरेदी केल्यावर तिला घाईघाईनं दुकानात परतावं लागायचं. तिथं परत गिऱ्हाइकांशी हुज्जत घालावी लागायची.

हिगुचींच्या दुकानाची गिऱ्हाइकं होती आजूबाजूचे रिक्षावाले, पहिलवान किंवा कुंटणखान्यातील वा चहागृहातील वेश्या. तिथं आल्यावर तिला नकजिमाबाईसाहेबांच्या संस्थेतील काव्यगायन समारंभातील अभिजात लोक आणि न्युसेनजीमधील वातावरणातील जमीन-अस्मानाचा फरक सतत जाणवत राहत होता; पण या बाबतीतील सगळा दोष तिचाच होता; कारण योशिवारामध्ये घर भाड्यानं घेण्याचा आग्रह तिनंच धरला होता.

गंमत म्हणजे दुकान सुरू करताना ते फुरुया आणि कुनिको चालवतील म्हणजे इचियोला लिहिण्यासाठी मोकळा वेळ मिळेल असा त्यांचा अंदाज होता; पण झालं उलटंच. हळूहळू इचियोच दुकान चालवण्याच्या व्यापात जास्तीत जास्त गुंतत गेली. नऊ महिन्यांच्या त्या दीर्घ काळात इचियोच्या हातून फक्त दोन कथा लिहून झाल्या. त्या काळात तिनं डायरीतही फारसं काही लिहिलेलं दिसत नाही. कुनिको दुकानात बसून गिऱ्हाइकांना माल बांधून देत असे, पण त्यांना पाहिजे त्या वस्तूंचा योग्य वेळी योग्य भावानं पुरवठा होतोय की नाही हे पाहण्याचं काम इचियोचं होतं. त्यासाठी आडदांड, शिवराळ व्यापाऱ्यांशी तिचा सारखा संबंध येत असे. हळूहळू त्या व्यापाऱ्यांच्या लक्षात आलं की दिसायला लहानखुरी असली, व्यवहारातील फारसं काही माहीत नसलं तरी ही बाई तशी पक्की होती. तिला ते सहजासहजी फसवू शकत नव्हते. सुरुवातीला त्यांनी तिला घाबरवण्याचा खूप प्रयत्न केला; पण शेवटी तिच्या व्यक्तिमत्त्वानं ते एवढे प्रभावित झाले की मंत्रमुग्ध होऊन तिच्या कविता व गोष्टी ऐकत राहू लागले.

‘जीवनाची वळणं आणि आडवळणं किती विचित्र असतात. आधी मी प्रबुद्ध लेखकांसमोर, कवी, विद्वानांसमोर काव्यवाचन करत असे. आता माझे श्रोते असतात शिवराळ, अशिक्षित, आडदांड व्यापारी.’ इचियोनं क्वचितच केलेल्या डायरीलेखनात लिहिलं होतं, ‘पण मला ही मोठी आडदांड मुलं आवडू लागली आहेत. हे लोक इतक्या आवडीनं माझं वाचन ऐकत असतात की, ते पाहून मला मी अजूनही आपल्या गोष्टी सांगून, लेखन ऐकवून ऐकणाऱ्याला मंत्रमुग्ध करू शकते हे प्रत्ययास येऊन खूप बरं वाटतं.’

फुरुया शेजारपाजारच्या रिक्षावाल्यांच्या, वेश्यांच्या घरी जाऊन त्यांना त्यांचं शिवणकाम आपल्याला देण्यास सांगत असे. असं करताना तिला आपला सर्व आत्मसन्मान, अभिमान गुंडाळून ठेवावा लागे. एके काळी जिनं जपानमधील सर्वांत प्रतिष्ठित सामुराई कुटुंबातील मुलीला आपलं दूध पाजलं होतं ती फुरुया आता किरकोळ कामासाठी दारोदार भटकत होती. आपल्या आईला याप्रकारे पैशांसाठी, व्यक्तिगत मानसन्मान बाजूला ठेवून, घरोघर काम मागत फिरताना पाहून इचियोच्या काळजात कालवाकालव होत असे; पण नोरीयोशी गेल्यानंतर हिगुची परिवाराचा दर्जा फार झपाट्यानं घसरला होता. नोरीयोशीनं आपल्या परिवाराला समाजात वरचं स्थान मिळवून देण्यासाठी अहोरात्र खटपट केली होती; पण दैवदुर्विलासानं त्याच्या त्या सर्व खटपटीवर पाणी पडलं होतं.

हिगुची कुटुंबाला ऱ्युसेनजीमध्ये येऊन तेव्हा चार महिने झाले होते. एव्हाना इचियोला अभिजात व सुसंस्कृत साहित्यिक मित्रमंडळींना न भेटल्याची उणीव जाणवू लागली होती. नकजिमांच्या हागिनोया संस्थेतील काव्यवाचनाचे प्रसंगही तिला राहून राहून आठवत होते. कधी कधी ऱ्युसेनजीतील संशयास्पद लोकांच्या समाजविघातक चक्रात अडकून आपण फरफटत चाललो आहोत, आपली लेखनप्रतिभा व लिहिण्याची तीव्र इच्छा गमावत चाललो आहोत, अशा भीतिदायक स्वप्नांनी पछाडून जाऊन ती रात्री मध्येच घामेघूम होऊन उठून बसत असे. तिला वाटे की तीही वय झाल्यानं वस्तीतील तरुण वेश्यांची आणि त्यांच्या रात्रीच्या पाहुण्यांची हांजी हांजी करत, त्यांचे नाही नाही ते चाळे व चिडखोरपणा सहन करत एक दिवस मरून जाईल; पण पोटाची टिचभर खळगी भरायला त्या येन दुकानाशिवाय हिगुची कुटुंबापुढे दुसरा कोणता पर्यायही नव्हता.

ऱ्युसेनजीमधील साहित्यिक उन्हाळ्याच्या त्या दिवसांमध्ये इचियोला

आपलं हे ते टोपणनाव सोडून देऊन आपलं जन्मनाव नत्सुकोच वापरावंसं वाटू लागलं, कारण त्या नावानं वावरताना आपण आपली लेखनप्रेरणा व लेखनऊर्मी गमावत चाललो आहोत ही अपराधीभावना तरी सतावत नसे; पण हळूहळू न्युसेनजीमधल्या वातावरणाशी तिची नाळ जुळू लागली. तेथील जीवनानं रसरसलेल्या अनुभवांच्या समृद्ध घटका तिला भुलवू लागल्या. तेथील रंगेल गल्लीबोळांमध्ये उलगडत जाणाऱ्या जीवननाट्याचे, तेथील लोकांच्या जीवनाचे, वृत्तीचे पडसाद तिनं डायरीत नमूद केलेल्या छोट्या-छोट्या टिपणांमध्ये पडू लागले. मनाला भावलेल्या प्रसंगाचं, व्यक्तिरेखांचं थोडक्यात टिपण करून ठेवण्याच्या तिच्या या सवयीचा पुढे कादंबऱ्या लिहिताना तिला फार उपयोग झाला.

पण न्युसेनजीमध्ये तासन्तास कराव्या लागत असलेल्या काबाडकष्टांचा तिच्या शरीरावर अनिष्ट परिणाम झालाच. त्यांचे दिवस चांगले असतानाही तिची तब्येत तशी नाजूकच होती. आता काळजी आणि काबाडकष्टांच्या काळात ती आणखी बिघडू लागली. आठवड्यातून किमान दोनदा तरी तिच्या डोक्याला भयंकर ठणका लागे. शिवाय त्यांच्या धंद्यातही त्यांना फारसा पैसा सुटत नसे. त्यामुळे इचियोनं आपलं लेखन बाजूला ठेवून दुकानदारीत लक्ष घालण्यात फारसा अर्थ नव्हता, असं त्यांना जाणवायला लागलं होतं. हे कमी होतं म्हणूनच की काय, एका रात्रीत थोड्याच अंतरावर त्यांच्यासारखंच आणखी एक दुकान सुरू झालं. बऱ्याच दिवसांपासून आपलं दुकान बंद करण्याचा विचार त्यांच्या मनात घोळत होताच; पण या एकाएकी उभ्या राहिलेल्या संकटानं त्यांचा तो निश्चय आणखी पक्का झाला.

हिगुची बायका सुरुवातीला आपली ही लढाई फार शर्थीनं लढल्या; पण नऊ महिन्यांच्या अविश्रांत धडपडीनंतर, त्यांच्या लक्षात आलं की कोणत्याही प्रकारचा अनुभव गाठीस नसताना, अशा प्रकारचं दुकान न्युसेनजीमध्ये घालून, त्यांनी एक घोडचूक केली होती. मुख्य म्हणजे रास्त किमतीत वेगवेगळ्या प्रकारचं सामान दुकानात भरायला त्यांच्याकडे पाहिजे तेवढं भांडवल शिल्लक नव्हतं. भांडवल कमी असल्यानं त्यांना हलक्या प्रतीच्या निवडक वस्तू दुकानात ठेवाव्या लागत होत्या. जवळपासच्या लोकांचा तिथं नियमित राबता होता; पण धंद्यात त्यांना इतका कमी फायदा मिळे की त्यासाठी दुकान चालवण्याचे अपार कष्ट करण्यात काहीच अर्थ नव्हता. त्या काबाडकष्टांतून इचियोही सुटलेली नव्हती. तिचा सगळा वेळ सामानपुरवठा

करणाऱ्या व्यापाऱ्यांशी घासाघीस करण्यात किंवा उधारी वसूल करण्यात गेल्यानं तिला लेखनासाठी अजिबात वेळ मिळत नव्हता. कुनिको व फुरुयामध्ये दुकान चालवायला लागणारा चाणाक्षपणा नव्हता. इचियोला सौम्य, सुसंस्कृत वातावरणात राहायची सवय असल्यानं व्यापाऱ्यांचा ओबडधोबडपणा तिला फारच बोचत असे.

लिहिण्याच्या दृष्टीनं इचियोच्या आयुष्यातील हा फार वाईट काळ होता. ऱ्युसेनजीमधील नऊ महिन्यांच्या वास्तव्यात तिनं फक्त दोन लघुकथा लिहिल्या. दर रात्री ती फार थकून दुलईत शिरत असे. दुकान चालवण्याच्या श्रमानं तिची सर्व शारीरिक व मानसिक शक्ती शोषून घेतलेली असे. डायरीत एखादी नोंद करण्यासाठी टाक उचलण्याचं बळही तिच्यात उरलेलं नसे.

इचियोचं लिहिण्याचं ओकंबोकं डेस्क, धूळ खात पडलेली काळ्या शाईची दौत आणि पेंगत पडलेल्या पिसांच्या लेखण्या पाहून पुरेसा फायदाही मिळवून न देणारं दुकान चालवण्यासाठी त्या तिघी किती आणि कोणकोणत्या गोष्टींचा बळी देत होत्या, हे अखेर कुनिकोच्या लक्षात आलं.

एके दिवशी दुकानातील रटाळ कामापासून, विषयसुखाच्या शोधात भटकणाऱ्या लोकांना घेऊन जाणाऱ्या रिक्षांच्या कर्कश्श खडखडाटापासून तसेच वेश्या व त्यांच्या आश्रयदात्यांच्या थिल्लर बोलण्यापासून व कामुक खिदळण्यापासून सुटका करून घेण्यासाठी इचियोनं नकजिमाबाईसाहेबांकडं जायचं ठरवलं. तिथं आपल्या साहित्यजीवनासाठी आवश्यक असं पोषण तरी तिला मिळालं असतं. तिथं जाण्यापूर्वी तिनं नकजिमाबाईसाहेबांची तशी परवानगी घेतली.

पाईन वृक्ष व गुलाबांच्या मंद सुगंधानं वेढलेल्या हागिनोयाच्या त्या भव्य वास्तूत पाय ठेवताच इचियोच्या मनातील कित्येक महिन्यांची काळजी व काबाडकष्टांचा आपोआप निचरा झाला. तेथील सुसंस्कृत कवी व लेखकांच्या छोट्याशा समूहापासून आपण कधीच दूर गेलो नव्हतो असं तिला वाटलं. फक्त काबाडकष्टांमुळे खरखरीत झालेले तिचे हात पाय ते ती कुठून आलीये हे सांगत होते. म्हणूनच त्यांना लपवून ठेवण्याचा ती खूप प्रयत्न करत होती. त्या हातांकडे कोणाचं लक्ष गेलं तरी ते तसं दाखवत नव्हते.

हागिनोयातील हळुवार वातावरणानं व जपानी लोकांच्या मनात विशेष स्थान असलेल्या त्या कविसमूहाच्या बुद्धिचातुर्यानं इचियोच्या शरीरात व मनात एका वेगळ्याच शक्तीचा संचार झाला. आपण एक लेखिका आहोत हे

तिला कित्येक महिन्यांनंतर प्रकर्षानं जाणवलं.

“देवा, इथं परत येऊन किती छान वाटतंय.” हागिनोयाच्या इमारतींभोवती दरवळणारा फुलांचा सुगंध व अत्तराचा मंद सुवास नाकपुड्यांत भरून घेत ती उद्गारली.

तिच्या त्या दीर्घ अनुपस्थितीच्या दिवसांत ती काय करत होती, हिगुची कुटुंब कुठं राहत होतं, हे जाणून घेण्याची सगळ्यांनाच उत्सुकता होती; पण त्यांच्या त्या प्रश्नांची उत्तरं द्यायला इचियो अजिबात तयार नव्हती. वेश्या व रिक्षावाल्यांच्या सोबतीनं जात असलेलं आपलं आयुष्य किंवा तोंडाळ, असभ्य व्यापारी आणि कुंटणखान्यातील गिऱ्हाइकांबरोबरची आपली घासाघीस याबद्दल त्यांना कळलं तर त्यावर त्यांची काय प्रतिक्रिया होईल या कल्पनेनंच तिच्या अंगावर सरसरून काटा येत होता. त्यामुळे तशा प्रकारचे प्रश्न तिनं खूप चलाखीनं टाळले.

त्या रात्री तिनं आपल्या डायरीत नमूद करून ठेवलं होतं, ‘पोटाची खळगी भरण्यासाठी आम्ही समाजाच्या अगदी खालच्या थराच्या लोकांची अजिजी करत आहोत. पुस्तकं प्रकाशित झालेल्या लेखिकेचं आयुष्य असं थोडंच असतं? आमची अवस्था फारच दयनीय झाली आहे. यातून बाहेर पडायचा मार्ग मला शोधायलाच पाहिजे.

रात्री शेजारच्याच खोलीत इचियोची आई व बहीण त्यांना दिवसभर मिळालेली नाणी मोजून ठेवत होत्या. त्यांचा खणखण आवाज इचियोच्या कानाला बोचत होता. आईच्या जड सुस्काऱ्यांवरून तिच्या लक्षात आलं की पैशांच्या दृष्टीनं तो दिवसही वाईट गेलेला होता. त्या दोघी नेहमीच्या अडचणींना तोंड देत असताना आपण तो दिवस नकजिमाबाईसाहेबांच्या शाळेत आरामात घालवला; चविष्ट जेवणावर ताव मारला या विचारानं इचियोला आपल्या हातून मोठाच अपराध झालाय असं वाटलं.

इचियोला अर्ध्या तासानंतर शेजारच्या गादीवर हालचाल झाल्याचं जाणवलं. आपल्या लाडक्या बहिणीला त्रास होऊ नये म्हणून कुनिको फार जपून अंथरुणात शिरत होती. विचार करता करता इचियोला आपले कष्ट संपवण्याचा आणि शहराच्या चांगल्या भागात परत जाण्याचा मार्ग अचानक सुचला.

तटकन उठून बसत तिनं कुनिकोला गदागदा हलवलं तशी कुनिको ओशाळून म्हणाली, “बघ उठवलंच ना मी तुला नत्सु! एक नंबरची मूर्ख

आहे बघ मी.''

''असं नको म्हणूस गं कुनिको. अगं मी झोपलेच नव्हते. खरं तर मी आपल्या परिस्थितीबद्दल विचार करत होते. आता मी ठरवून टाकलंय की हे दुकान बंद करून टाकायचं आणि आपण इथून लांब राहायला जायचं. इथं राहून आपलं काही भलं होणार नाही. फार दिवस नाही राहू शकणार आपण इथं. माझंच पाहा ना, कशाबशा दोन-तीन कथा लिहिल्यात मी इथं आल्यावर. शहराच्या पहाडी भागाजवळ जायचा प्रयत्न करायला पाहिजे आपण.''

''खरंय तुझं म्हणणं!'' दमल्याभागल्या कुनिकोनं कसंबसं म्हटलं. दमणुकीमुळे तिला डोळे उघडे ठेवणं फार जड जात होतं. गेल्या काही महिन्यांत या विषयावर आपण वारंवार चर्चा केल्या आहेत आणि आर्थिक अडचणींवर मात करण्याचा एकही उपाय आपल्याला सापडलेला नाही हे इचियोला सांगणं तिच्या जिवावर आलं होतं. पण तिला बोलावंच लागलं, ''तुझा विचार खूप चांगला आहे; पण कसं होणार आहे हे? होतं नव्हतं ते सगळं विकून आपण हे दुकान सुरू केलंय हे विसरू नकोस. इथंसुद्धा आपली फक्त हाता-तोंडाची गाठ पडत्येय. शिल्लक अशी काही पडत नाहीये. दुसऱ्या कोणाकडून आपल्याला पैसे मिळण्याचीही काही शक्यता नाहीये. माहीतच आहे तुला.''

इचियोनं मान हलवून तो विषय बंद केला. कुनिको किती दमलीये हे तिला दिसत होतं. अशा प्रकारच्या गंभीर विषयावर चर्चा करण्याची तिच्यात शक्तीच नव्हती. आपल्या मनावरील ओझं डायरीत झोकून टाकावंसं वाटलं; पण तीही दिवसभराच्या श्रमानं दमली होती. झोपेचं सुख कधी एकदा मिळतंयसं झालं होतं तिला. मग एकही शब्द न बोलता दोघी बहिणी झोपेच्या अधीन झाल्या. सभोवतालच्या गडबड गोंधळात, सतत येणाऱ्या-जाणाऱ्या रिक्षांच्या खडखडाटातही त्या गाढ झोपी गेल्या. तो सर्व तर त्यांच्या नित्यक्रमाचाच भाग झाला होता.

विषयसुखांचं आगर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इडोच्या त्या भागात इचियो कुटुंब महिनोन्महिने रखडत राहिलं. कधी काळी आपली तिथून सुटका होईल ही त्यांची आशा मावळत चालली होती. इचियोनं मात्र आपल्याला लिहिण्यासाठी प्रेरणा मिळावी म्हणून हागिनोयाच्या सुसंस्कृत, सुशिक्षित वातावरणात जायचा, तेथील कवयित्री मैत्रिणींना भेटायचा आपला

परिपाठ चालू ठेवला होता. च्युसेनजीला गेल्यावर सुरुवातीच्या काळात तिनं हागिनोयाकडं पाठ फिरवली होती; पण नंतर तिच्या लक्षात आलं होतं की जगण्यासाठी शुद्ध, ताजी हवा मिळणं जितकं आवश्यक होतं तितकंच हागिनोया काव्यविद्यालयात तिचं जाणंही आवश्यक होतं.

ती परत हागिनोयाला जायला लागली त्यानंतर काहीच दिवसांत केसाला लावायच्या पिनांच्या डब्यात उचकाउचक करताना तिला डब्याच्या तळाशी आपल्या वडलांच्या हस्ताक्षरातील नीट घडी करून ठेवलेला एक कागद मिळाला. तो उघडून तिनं त्या कागदावरील मजकूर वाचला आणि अत्यानंदानं उडीच मारली. तिच्या वडलांच्या वाकयमा नावाच्या एका मित्रानं तिच्या वडलांच्या नावानं लिहिलेला तो एक कर्जरोखा होता. त्यात तिच्या वडलांनी त्यांना मैत्रीखातर काही रकमेचं कर्ज दिल्याचं आणि शक्य होताच ते फेडण्याचं वचन त्यांनी दिलेलं होतं.

डब्यातील पिना सगळीकडं उधळत इचियो झटकन उठली आणि कुनिकोकडं धावली. तिथं कुनिको नेहमीप्रमाणे शांतपणे झोपायची तयारी करून अंथरुणाला पाठ टेकवत होती.

''बघ, कुनी, मला काय मिळालंय!'' अंथरुणावर पडलेल्या बहिणीच्या डोळ्यांसमोर तो कागद नाचवत इचियो ओरडली, ''ते वाकयमा आठवतात का तुला? बाबांनी त्यांना खूप मोठी रक्कम कर्जाऊ दिली होती. आणि माहीत आहे, हा त्याचा कर्जरोखा आहे. या पिनांच्या डब्यात मिळाला मला तो. त्यांनी रेशमाच्या धंद्यात खूप पैसा मिळवलाय असं माझ्या ऐकिवात आहे. हा कर्जरोखा घेऊन त्यांना भेटल्यास आपली आर्थिक अडचण बऱ्याच मोठ्या प्रमाणात दूर होईल. बाबांनी दिलेलं कर्ज त्यांनी फेडलं तर आपल्याला इथून बाहेर पडता येईल. शहरातील यापेक्षा चांगल्या भागात राहायला जाता येईल, कळलं?''


''खरं सांगतेयस की गंमत करतेयस माझी?'' अशा प्रकारची गंमत इचियो कधीही करणार नाही हे माहीत असूनही डोळ्यांची उघडझाप करत कुनिकोनं विचारलंच. आता जाग येऊन ती व्यवस्थित उठून बसली होती. कुंटणखान्याच्या पाठीला पाठ लावून उभ्या असलेल्या, जरासा हात पुढे केला की हाताला लागेल अशा अंतरावर असलेल्या त्या घराचा तिला अतिशय तिटकारा आलेला होता. तिथून बाहेर पडायची संधी नजरेच्या टप्प्यात आहे हे जाणवताच तिची दिवसभराची सगळी मरगळ निघून गेली.

संस्कारक्षम कोवळ्या वयाच्या कुनिकोच्या दृष्टीनं ते घर आणि शेजारपाजारचा परिसर फारच घाणेरडा होता. रोज सकाळी उठलं की आता काय पाहायला आणि ऐकायला मिळेल या धास्तीनं तिच्या अंगावर शहारा येत असे. तिथून केव्हा एकदा बाहेर पडेनसं झालं होतं तिला.

सख्खे आई-वडील आपल्या कोवळ्या मुलींना कुंटणखान्यातील मावशीबाईंना विकताहेत हे पाहून कुनिकोच्या मनात आगीचा डोंब उसळे. पुरुषांना हर प्रकारे रिझवणाऱ्या त्या वेश्यांची म्हातारपणी काय अवस्था होत असेल; या विचाराने तिच्या मनाचा थरकाप उडत असे. कित्येकदा शहरातील त्या बदनाम गल्ल्यांमध्ये सकाळी सकाळी हृदयाला भिडणारे कोटो संगीताचे करुण स्वर येत. त्या वेळी सुरकुतलेल्या जख्ख म्हाताऱ्या वेश्या, आदल्या रात्री तरुण वेश्यांनी आणि त्यांच्या गिऱ्हाइकांनी बेफिकिरीनं फेकून दिलेल्या गोष्टींनी भरलेल्या गल्ल्या कमरेत वाकून झाडत असत. स्वतःच्याच उंबरठ्याशी त्या स्त्रियांना भोगावा लागणारा तो निम्नतम अपमान पाहून कुनिकोला भडभडून येई.

रोज रात्री कुनिकोच्या कानांवर त्या बाजारबसव्यांचं आणि त्यांचं शरीर खरेदी करणाऱ्या गिऱ्हाइकांचं निर्लज्ज सूचक बोलणं आणि खिदळणं येई. त्या हलकट बोलण्याची आणि हसण्याची चीड येऊन कुनिको आपल्या कानांवर उश्या गच्च दाबून धरे. पापानं आणि व्यसनांनी खदखदणाऱ्या त्या रौरव नरकातून कोणत्या का प्रकारे असेना, बाहेर निघण्याची संधी चालत येणं हेच स्वर्गसुखाचं होतं. सकाळपर्यंत दम धरवेना तेव्हा त्या हिगुची बहिणींनी आपल्या आईला झोपेतून बळेच उठवलं आणि मग त्या तिघींनी, नोरीयोशीच्या त्या मित्राच्या कर्जाऊ घेतलेले पैसे परत करून त्यांना ऱ्युसेनजीमधून बाहेर पडायला मदत करावी म्हणून देवाची अनन्यभावानं करुणा भाकली.

**१२वी आवृत्ती**




# मायाबाजार

लेखक
वपु काळे

किंमत - १२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

वपुंच्या कथाविश्वात मध्यमवर्गीय जीवन केंद्रवर्ती असले, तरीही मध्यमवर्गीय जीवनाच्या ठरावीक चाकोरीच्या या कथा नाहीत.

सामान्य माणसाच्या सामान्य जीवनातल्या 'असामान्य' सुख-दुःखांना उद्गार देणाऱ्या या कथा आहेत. हलक्याफुलक्या, मिस्कील, विनोदी शैलीचे अधिष्ठान 'वपुं'च्या कथांना असले, तरीही त्यांच्या कथा कधी 'आचरट' होत नाहीत. त्यांच्या कथानिवेदनात एकप्रकारचा संयतपणा आहे. वाचकांना खुलवणाऱ्या, हसवणाऱ्या रंजकतेचे अधिष्ठान आहे. हव्यास म्हणून त्यांच्या कथा 'स्वस्त रंजकते'ला थारा देत नाहीत.

लेखक बहुश्रुत असल्यामुळे या कथाविश्वात विविधता व विपुलता आहे. त्यात अनुभवाचा तोचतोपणा नाही. त्यांच्या कथा या ना त्या प्रकारे सामान्यातल्या सामान्य वाचकांच्या मनोविश्वाला स्पर्श करून जातात.

त्या स्पर्शाने वाचक अंतर्मुख व्हावा, असे सामर्थ्य 'वपुं'च्या कथेत आहे.




## य.गो. जोशी

# सुबोध ज्ञानेश्वरी

ज्ञानदेवांच्या ज्ञानेश्वरीवर आजपर्यंत अनेक श्रद्धावान लेखकांनी भाष्यग्रंथ लिहिले आहेत. ज्ञानदेवांच्या अलौकिक चरित्राचा वेध घेणाऱ्या कादंबऱ्यासुद्धा प्रकाशित झाल्या आहेत. 'मोगरा फुलला' ही गो. नी. दांडेकर यांची ज्ञानदेवांच्या आयुष्याचा वेध घेणारी कादंबरी असो, की रवींद्र भट यांची अत्यंत लोकप्रिय ठरलेली 'इंद्रायणीकाठी' ही कादंबरी असो, किंवा पद्माकर गोवईकरांची 'मुंगी उडाली आकाशी' ही कादंबरी असो, अशा ललितरम्य कलाकृतींमुळे ज्ञानदेवांचे विलक्षण आयुष्य आणि त्यांचे विश्वव्यापी वाङ्मय समग्र, मराठी वाचकांवर मोहिनी घालून गेले होते. गेली सातशे वर्षं वारकऱ्यांच्या भावविश्वाशी समरस झालेली ज्ञानेश्वरी, विसाव्या शतकाच्या मध्यावर सर्वसाधारण मध्यमवर्गीय अशा जाणीवकक्षेच्या सर्वसामान्य माणसांपर्यंत नेण्याचे काम या ललित कलाकृतींनी निश्चितपणे नेले. त्यातच साखरे महाराज आणि सोनोपंत दांडेकरांच्या ज्ञानेश्वरीचा गूढ अर्थ आणि त्यातले अप्रतिम अद्वैती तत्त्वज्ञान सांगणाऱ्या भाष्यग्रंथांनी वारकऱ्यांबरोबरच सर्वसामान्य माणसांच्या भाववृत्तीला सुखद स्पर्श करीत ज्ञानेश्वरीच्या प्रसाराला खूप मदतच केली होती. त्यांच्या अगोदरचे कुंटे-राजवाडे-भिडे-बाबामहाराज पंडित यांचे भाष्यग्रंथ दीपस्तंभासारखे मार्गदर्शक ठरले होते. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आपल्या अबोध आणि गोडगोडुल्या वाणीने बाबामहाराज सातारकरांनी ज्ञानेश्वरीवर अप्रतिम भाष्य करणाऱ्या प्रवचनांनी ज्ञानेश्वरी घराघरातून चांदणवर्षाव करीत निनादत

ठेवली. बाबामहाराज सातारकरांच्याच 'ऐश्वर्यवती ज्ञानेश्वरी'ने मुद्रणातला फार मोठा चमत्कार दृश्य पातळीवर सिद्ध केला. विसाव्या शतकाच्या बरोबर मध्यावर म्हणजे १९५२ मध्ये न.र.फाटक यांचा 'श्री ज्ञानेश्वर वाङ्मय आणि कार्य' हा अभ्यासपूर्ण ग्रंथ सिद्ध झाला होता. ज्ञानेश्वरीतून झिरपणाऱ्या ज्ञानदेवांच्या व्यक्तिमत्त्वाचा वेध घेणारा शोधनिबंध 'ज्ञानदेवांचे व्यक्तिमत्त्व ज्ञानेश्वरीच्या आधारे' या ग्रंथातून डॉ. सुशीला पाटील यांनी प्रसिद्ध केला तो १९८४ साली. अनेक विद्वानांनी ज्ञानदेवाच्या चरित्राचा आणि त्यांच्या एकूणच शाश्वत वाङ्मयाचा वेध घेत ग्रंथनिर्मिती केली. सत्य सांगायचे झाले तर, अशा ग्रंथांची मोजदाद करणे हाच एक संशोधनाचा विषय ठरावा एवढे भाष्यग्रंथ गेल्या शंभर सव्वाशे वर्षांत निर्माण झाले आहेत. प्रत्येक ग्रंथ ज्ञानेश्वरीप्रेमाने भारलेला आहे. डॉ. शं. दा. पेंडसे, डॉ. तुळपुळे, डॉ. व. दि. कुलकर्णी यांच्यासारख्या अनेक विद्वान समीक्षकांनी तर ज्ञानेश्वरांच्या एकूणच ज्ञानोत्तर भक्तीचा समग्र धांडोळा घेणारे ग्रंथ लिहून ज्ञानेश्वरीच्या अभ्यासकांची फार सुंदर सोय करून ठेवली आहे. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी तर विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात १९५०च्या अगोदरच 'ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान' या विषयावर प्रबंध लिहून डॉक्टरेट ही अत्यंत मानाची पदवी मिळवली आणि यथावकाश तो प्रबंध ग्रंथरूपात प्रसिद्ध केला होता. थोडक्यात सांगायचे झाले तर, एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरचरणात 'ज्ञानेश्वरी' या अजोड ग्रंथावर भाष्य लिहिण्याची सुरुवात झाली आणि आजपर्यंत शेकडो ग्रंथ निर्माण करणारी ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी' ही एक अलौकिक अशी वाङ्मयीन घटना घडली. आजही ज्ञानेश्वरीवर अनेक ग्रंथ सिद्ध होत आहेत. एकविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात सिद्ध झालेला श्रीग्रंथराज ज्ञानेश्वरीची 'ज्ञानज्योती प्रभा' हा बृहनग्रंथ सौ. मालती कृष्ण वाटवे यांनी सिद्ध केला. अजूनही अनेक ग्रंथ निश्चितपणे प्रकाशित होतील.

नवकथेच्या आगेमागे ज्यांची कुटुंबकथा देवघरातील नंदादीपासारखी शांतपणे तेवत एकूणच मराठी समृद्ध कथावाङ्मयाला प्रकाशमान करीत होती, 'शेवग्याच्या शेंगा' सारख्या श्रेष्ठ प्रतीच्या कथांनी मराठी कथेचे अंगण पवित्र केले होते, ते य. गो. जोशी यांनी आपल्या आयुष्याचा नंदादीप शांत

होण्याच्या मार्गावर असताना, ज्ञानदेवांनीच जणू य. गो. जोशी यांच्या शुद्ध आणि पवित्र अंतःकरणात प्रवेश केला आणि ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ हा अलौकिक ग्रंथ, त्यांच्या ओघवत्या, लडिवाळ भाषेत अक्षरशः लिहून घेतला. य.गो.जोशी यांच्या एकूणच वाङ्मयीन आयुष्यातले एक अलौकिक आणि शाश्वत ग्रंथलेखन म्हणजे ‘सुबोध ज्ञानेश्वरी’. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरमाउलीने य. गो. जोशी या श्रेष्ठ कथालेखकाचे साधन करून वाङ्मयसृष्टीतला चमत्कार ठरावा, असे हे कार्य करवून घेतले आहे, अशी खुद्द त्यांचीच श्रद्धा होती आणि ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ विसाव्या शतकाच्या सत्तरच्या दशकात म्हणजे १९६४ मध्ये प्रसिद्ध झाली. परंतु हा श्रेष्ठ ग्रंथराज प्रत्यक्ष पाहायला स्वतः य. गो. जोशी नव्हते. त्याअगोदरच त्यांचे महानिर्वाण झाले. या ग्रंथाला प.पू. सोनोपंत दांडेकरांची जी प्रस्तावना लाभली होती, त्यात माउलीचे परमभक्त आणि ज्ञानेश्वरीचे श्रेष्ठ भाष्यकार प्रा. सोनोपंत दांडेकर म्हणतात की, ‘‘...माझी जी ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ची कल्पना होती, त्यापेक्षा अगदी वेगळ्याच प्रकारची ज्ञानेश्वरी पुढे आली. त्या लिखाणात भाऊंच्या स्फूर्तीची पुष्कळच भर होती. मला ते पाहून भाऊंच्या बुद्धीचे आणि स्फूर्तीचे कौतुक करावेसे वाटले. त्यांनी ज्ञानेश्वरीचा विषय अशा पद्धतीने मांडला की, अगदी सामान्य मनुष्यास तो समजावा; नव्हे तो आवडावा व हाती धरलेला ‘प्रसाद’चा अंक यांची ज्ञानेश्वरी वाचून होईपर्यंत खाली ठेवावा असे त्यांस वाटू नये.’’

संतवाङ्मयाला वाहिलेल्या ‘प्रसाद’मधून ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ प्रथम प्रसिद्ध झाली आणि नंतर त्या सदराने ग्रंथाचे स्वरूप धारण केले. ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ हा पारंपरिक पद्धतीने मूळ ज्ञानेश्वरी आणि त्याचा ग्रंथकाराला भावलेला अर्थ असा, सार्थ ज्ञानेश्वरीचा, नित्याचा प्रयोग नाही, तर एका श्रेष्ठ कथाकाराच्या स्वतंत्र प्रतिभेतून आणि मुक्तंभरा प्रज्ञेतून अवतारी पुरुषासारखा अवतरलेला वाङ्मयीन पातळीवरचा अशार-अवतार आहे. य.गो.जोशी यांच्या कुटुंबकथांप्रमाणे या ग्रंथाची मांडणी करीत मूळ ज्ञानेश्वरी सहजपणे उलगडलेली आहे. घरगुती गोष्टीतून उलगडण्याचा हा एक अभिनव प्रयोग आह. त्यातले ‘श्रीहरी’ हे व्यक्तिमत्त्व म्हणजे व्यक्तिचित्रणातले सर्वोत्तम असे व्यक्तिमत्त्व आहे. आपण ‘सुबोध ज्ञानेश्वरी’ वाचताना तेराव्या शतकात

सहजपणे जाऊन पोहोचतो आणि प्रत्यक्ष नेवाश्यात घडणारी ही अलौकिक कथा जी आहे, त्या कथेतले जणू एक पात्र होऊन जातो. ज्ञानेश्वरी उलगडून सांगण्याचा, हा मराठी वाङ्‌मयातला एक सर्वोत्तम असा प्रयोग आहे. या ज्ञानेश्वरीतल्या प्रसंगानुसार श्रेष्ठ चित्रकार दीक्षित यांची चित्रेसुद्धा या 'सुबोध ज्ञानेश्वरी'चे प्रधान वैशिष्ट्य आहे.

सर्वसामान्य लोकांपर्यंत ज्ञानदेवांची 'ज्ञानेश्वरी' सहजपणे झिरपत जावी, हा हेतू बाळगून ललितपातळीवर गद्य आविष्कारात प्रकट झालेली ही ज्ञानेश्वरी म्हणजे अक्षरवाङ्‌मयातला एक फार मोठा चमत्कार आहे. 'सुबोध ज्ञानेश्वरी' एक सप्ताह मनापासून श्रवण केली, तर मूळ ज्ञानेश्वरीकडे जाण्याची वाट सहजपणे मोकळी होत जाते, हेच सुबोध ज्ञानेश्वरीचे प्रधान वैशिष्ट्य आहे, हे मात्र निश्चित.

**वामन देशपांडे**


# चंपी मालीश आणि था.. था.. था!




लेखक
राजीव तांबे

किंमत - ६०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

**७वी आवृत्ती**

# नॉट विदाऊट माय डॉटर




मूळ लेखिका - बेट्टी महमूदी

सहलेखक - विल्यम हॉफर

अनुवाद - लीना सोहोनी

किंमत - २४०/- रु. । पोस्टेज - ३०/- रु.

“आता तू जन्मभर इथंच राहायचं, समजलं? तू आता इराण सोडून कधीच जायचं नाही, मरेपर्यंत इथंच राहायचं.”

बेट्टी महमूदी आणि तिचे पती डॉ. सय्यद बोझोर्ग महमूदी (अर्थात ‘मूडी’) हे अमेरिकेतून इराणला आले, ते आपल्या कुटुंबीयांना भेटण्याच्या निमित्तानं. त्यांच्यासोबत त्यांची चार वर्षांची मुलगी माहतोबसुद्धा होती.

इराणमधील गलिच्छ राहणीमानाची बेट्टीला घृणा वाटली. ज्या देशात स्त्रियांना कस्पटासमान वागणूक मिळते, पाश्चात्त्यांचा तिरस्कार केला जातो, त्या देशात राहण्याच्या कल्पनेनं ती भयभीत झाली. लवकरात लवकर अमेरिकेला परतण्यासाठी ती व्याकूळ झाली.

पण मूडी आणि त्यांच्या दुष्ट कुटुंबीयांचं काही वेगळंच कारस्थान शिजत होतं. लवकरच आई आणि मुलगी एका परकीय संस्कृतीच्या कचाट्यात कैदी होऊन राहू लागल्या. एका जुलमी, क्रूर माणसाच्या हातचं बाहुलं बनून...

कालांतरानं बेट्टीला एका माणसाचं नाव समजलं. हा माणूस त्यांना इराणमधून पळ काढण्यासाठी मदत करणार होता.

पण सुटकेचा मार्ग संकटमय, भीतिप्रद होता. आजपर्यंत असला प्रवास करण्याचं साहस जवळपास कुठल्याच स्त्रीनं व तेही लहान मुलांना घेऊन, केलेलं नव्हतं. घरी परतण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची सुरुवात एखाद्या दुःस्वप्नासारख्या भासणाऱ्या हिमवादळानं झाली...


**६वी आवृत्ती**

# द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ

मूळ लेखक - चेतन भगत

अनुवाद - सुप्रिया वकील

किंमत - २२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.




'फाईव्ह पॉइंट समवन' आणि 'वन नाईट @ द कॉल सेंटर' यानंतरची चेतन भगत यांच्या चित्रदर्शी शैलीतली ही कादंबरी वाचकांना त्या विश्वात नेऊन खिळवून ठेवते. लेखकाच्या खुसखुशीत भाषेमुळं ही कादंबरी अधिक वाचनीय बनली आहे.

तीन मित्र...

स्वतःच्या इच्छा-आकांक्षा, स्वप्नं असणारे; वास्तव जीवनाच्या धगीचा सामना करत त्याला तोंड देणारे... सत्य घटनांच्या संदर्भाशी सुरेख मिलाफ साधणारी ही कादंबरी. सध्याची पिढी, त्यांच्यापुढचे प्रश्न, सद्य परिस्थिती यांचा वेध घेतानाच, बिझनेस, क्रिकेट व धर्म याही विषयांची सुरेख गुंफण करून वाचकांना एक विलक्षण अनुभूती देते.




बेकन आणि जॉन्सन यांच्या मतांना आणखी एका वाचक योग्य त्या मताची जोड देऊ इच्छितो. तो म्हणजे इमर्सन. तो इतिहासाचा आणि इतिहासवादाचा कहर विरोधक होता. त्याने म्हटले, ''उत्तम पुस्तके ही आपल्या मनावर एक गोष्ट ठसवतात. एक जण लिहितो आणि तोच वाचतो.

बेकन, जॉन्सन आणि इमर्सन या तिघांची सांगड घालून कसे वाचावे याचे एक सूत्र तो बसवू इच्छितो.

तुमच्या मिळतेजुळते असेल ते शोधा.

मूल्यमापन आणि चिंतन यांच्या दृष्टीने त्याचा वापर कसा करता येईल ते पाहा आणि तुम्ही काळाच्या बंधनापासून मुक्त असा जो तुमचा स्थायी भाव आहे, त्याच्याशी त्यात संवाद साधू द्या.

याचाच व्यावहारिक अर्थ असा की, प्रथम शेक्सपिअर शोधा, आणि शेक्सपिअराला तुमचा शोध घेऊ द्या.

किंग लियरला तुमचा शोध घ्यायचा असेल तर त्याच्याशी तुमचा असणारा संबंध- स्वभावसाधर्म्य- तोलून बघा, विचारात घ्या आणि त्याची तुमच्याशी असणारी जवळीक जाणून घ्या.

ही काही अपवादात्मक आदर्श अशी अवस्था आहे असे तो मानत नाही.

ही दैनंदिन अनुभवाची गोष्ट आहे असे तो मानतो.

पितृसत्ताक पद्धतीबद्दलची तक्रार म्हणून किंग लियरच्या शोकांतिकेचा वापर करणे म्हणजे तुम्ही तुमच्या स्वतःचे महत्त्वाचे प्रश्न बाजूस ठेवणे. एक तरुण स्त्री म्हणून हे अधिकच उपरोधिक व विचित्र वाटते.

शेक्सपिअर हा पिढ्या न् पिढ्यांमधील संघर्षाचा अटळ अधिकारी आहे. तसाच स्त्री आणि पुरुष यांच्यातील भेदांवरचा तो जाणकार आहे. किंग

लिअरच्या पूर्ण वाचनासाठी मन खुले ठेवा.

मग तुम्हाला पितृसत्ताक असे ज्याला तुम्ही मानता त्याच्या उगमाचे आकलन अधिक नेमके होऊ शकेल.

शेवटी आपण का वाचतो?

आपले स्वत्व परिपुष्ट करण्यासाठी.

आणि आपले स्वत्त्वाचे विश्वासार्ह हित जपण्यासाठी.

प्लेझर

कलात्मक मूल्ये ही नेहमी प्लेटोपासून ते सध्याच्या कर्मठ पुरणमतवादी, सामाजिक नीतिवादांनी तुच्छ मानली.

वाचनाचा आनंद हा सामाजिक आनंदापेक्षा वैयक्तिक स्वसंबंधित अधिक असतो.

तुम्ही अधिक सखोल वाचन केले किंवा खूप वाचले म्हणून तुम्हास दुसऱ्यांचे आयुष्य प्रत्यक्षपणे बदलता येईल असे नाही.

वैयक्तिक कल्पनाशक्तीच्या विकासाला चालना दिली तर इतरांबद्दलची आस्था वाढेल, या पारंपरिक सामाजिक आशावादी दृष्टिकोनाबद्दल तो साशंक आहे.

वैयक्तिक वाचनाच्या आनंदाची सार्वजनिक हिताशी सांगड घालण्याच्या युक्तिवादाबद्दल तो नेहमीच सावध असतो.

व्यवसायाच्या गरजेनिमित्त वाचन करण्याचा एक तोटा म्हणजे तरुण वयात निर्हेतुकपणे  केलेला वाचनाचा जो आनंद लाभलेला असतो, तो पुन्हा तसा क्वचितच मिळतो.

आता जे वाचत होते ते काही प्रमाणात विद्यापीठापासून आपले जे आंतरिक व बाह्य अंतर असते त्यावर अवलंबून असते.

विद्यापीठात वाचन हे आनंदासाठी अभावानेच केले जाते.

येथे आनंद म्हणजे गंभीर अर्थाने आनंदाचे कलात्मक रूप-

शेक्सपिअर सर्वोत्तम किंग लिअरशी सरळ टक्कर घेणे- हा काही सवंग आनंदाचा भाग नव्हे किंग लिअर पूर्णपणे न वाचणे म्हणजे ज्ञानात्मक तसेच कलात्मक दृष्ट्या आपली फसवणूक करून घेणे. टीव्ही बघण्यात बालपण गेलेल्यांना, कॉम्प्युटरवर कुमारपण गेलेल्यांना कॉलेजात आल्यावर

Ripenessis all यासारखे आपण खूप काही सोसत शेवटी परिपक्व होतो, हा विचार सहज पटणे संभवनीय नाही.

वाचन हे मागे पडत जाते आणि त्याबरोबर आपलेही बरेच काही 'स्व'त्व विखुरले जाते.

त्या सर्वांचा शोक करायचे कारण नसते, आणि ते एखाद्या प्रतिष्ठेने वा कार्यक्रमाने सुधारताही येत नाही.

जे काम करायचे असते ते इलिटिस्ट अशा रूपाने करावे लागते- पण सध्या तेच निषिद्ध आहे.

आजही एकाकी वाचक आहेत विद्यापीठातही.

आज समीक्षेचे काही काम असले तरी समीक्षेने अशा एकाकी वाचकाला पुढे ठेवले पाहिजे. जो स्वतःसाठी वाचता; सेल्फच्या पलीकडे जाणाऱ्या हेतूसाठी वाचत नाही.

Value, in lit & in life, has much to do with the idiosynctalic

या ॲशट्रेवर कथा लिहा.

अशी सूचना  एखाद्या कथालेखन कार्यशाळेत करावी आणि त्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी लिहिण्याचा प्रयत्न करावा- असाच काहीसा प्रकार कथाकार अँथनी चेकॉव्हचा होता.

चेकॉव्हच्या ब्लादिमीर कोरोलेंको या लेखकमित्राने आपल्या आठवणीमध्ये ॲशट्रेच्याच संदर्भातील एका घटना नमूद केली आहे.

१८८०मध्ये चेकॉव्ह मॉस्कोत राहून  वैद्यकीय अभ्यास करीत होत, त्या वेळी त्याची सेंट पीटर्सबर्गहून निघणाऱ्या ऑस्कोलकी या मासिकाचा संपादक निकोल्स लेइकिन यांच्याशी ओळख झाली. लेइकिनच्या आग्रहावरून चेकॉव्ह कथा, विनोद, अनुभव, व्यक्तिचित्रे वगैरे  मजकूर त्यात पाठवू लागला आणि लेइकिन त्या मजकुरावर कुठलाही संपादकीय संस्कार न करता ते झटपट छापू लागला. १८८३-८४ या दोन वर्षांत चेकॉव्हचे १६२ लेख या मासिकात प्रसिद्ध झाले. त्या काळात चेकॉव्हची प्रतिष्ठा जणू मोकाट सुटली होती. ब्लादिमीर कोरोलेकोंशी एकदा कथाकल्पना कशा सुचतात यावर चर्चा करीत असताना चेकॉव्हने समोरच्या

ॲश ट्रेकडे बोट दाखवून म्हटले, ‘‘कथा कशावरही लिहिता येते. तुला जर या ॲश ट्रेवरची कथा हवी असेल तर सांग. उद्या सकाळी मी ती तुला वाचायला देईन.’’ एकूणच त्या वेळी चेकॉव्हचा लेखनाचा झपाटा आणि वेग विलक्षण होता.

ऑस्कोलकी या मासिकातील चेकॉव्हचे लेखन आजवर दुर्लक्षित राहिले होते. त्याचा शोध घेऊन पीटर कॉन्स्टटाइनने ‘दि  अनडिस्कव्हर्ड चेकॉव्ह’ हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध केले आहे. इंग्लिशमध्ये हे सर्व लेखन प्रथमच आलेले आहे. काय वाटेल त्या विषयावर आणि रोजच्या सर्वसामान्य घटनांवर लिहिलेला चेकॉव्हचा हा मजकूर कथा या आकृतिबंधात बसणारा आहे, असे त्याला वाटत नाही. बराचसा मजकूर नोंदीसारखा आहे. कथेचे रूप त्याला लाभत नाही. हा मजकूर लिहून शंभरावर वर्षे लोटली आहेत. त्यामुळे काही विषय कालबाह्य व संदर्भशून्य झाले आहेत आणि चेकॉव्हला त्यावर त्या वेळी लिहावेसे का वाटले असावे, असा प्रश्न आजच्या वाचकांना पडावा अशा स्वरूपाचे आहेत.



**११वी आवृत्ती**

राजा रवि वर्मा या अजरामर चित्रकाराच्या
जीवनावरील श्रेष्ठ कादंबरी

**राजा रवि वर्मा**

लेखक
रणजित देसाई

किंमत - ३२०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.





# श्रद्धांजली

## अभिनेते शरीफ यांचे निधन



'मॅकॅनिज गोल्ड', 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' आणि 'डॉक्टर झिवागो' या चित्रपटांमध्ये प्रभावी व्यक्तिरेखा साकारणारे अभिनेते ओमर शरीफ (वय ८३) यांचे १० जुलै रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

शरीफ यांच्या छातीमध्ये दुखू लागल्याने, त्यांना कैरोतील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' या चित्रपटातील भूमिकेसाठी शरीफ यांना ऑस्करचे नामांकनही मिळाले होते, तर याच भूमिकेसाठी त्यांना 'गोल्डन ग्लोब' पुरस्काराने गौरविण्यात आले होते.

तब्बल २२ इजिप्शियन चित्रपटांमध्ये काम केलेल्या शरीफ यांना 'लॉरेन्स ऑफ अरेबिया' या इंग्रजी चित्रपटामध्ये प्रभावी अभिनयाबद्दल ऑस्करचे नामांकन मिळाले. मागील काही दिवसांपासून अल्झायमरच्या आजाराने त्रस्त असल्याने शरीफ यांनी चित्रपट क्षेत्रातून निवृत्ती घेतली होती.

## राजस साठे यांचे निधन



रंगकर्मी आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे माजी पदाधिकारी राजस साठे (वय ६६) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने १९ जुलै रोजी निधन झाले. त्यांच्यामागे पत्नी, ज्येष्ठ कथक नृत्यांगना मनीषा साठे, कन्या शांभवी, स्नुषा तेजस्विनी आणि

नातवंडे असा परिवार आहे. साठे यांनी 'दि गोवा हिंदू असोसिएशन'च्या 'वेगळं व्हायचंय मला' आणि 'तुझा तू वाढवी राजा' या नाटकांतून काम केले होते. बालरंगभूमीवरही त्यांनी योगदान दिले होते. ते परमहंस स्वच्छंदानंद सेवा मंडळाच्या माध्यमातून ज्ञानेश्वरीवर प्रवचन देत असत. रंगकर्मी चित्तरंजन कोल्हटकर नाट्य परिषदेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष असताना साठे यांनी प्रमुख कार्यवाहपदाची जबाबदारी सांभाळली होती. आपल्या माता-पित्याच्या स्मरणार्थ त्यांनी नाट्य परिषदेला दिलेल्या देणगीतून लक्ष्मी-नारायण पुरस्कार प्रदान केला जातो.

**१७वी आवृत्ती**

# घर हरवलेली माणसं




लेखक
वपु काळे

किंमत - १६०/- रु.
पोस्टेज - ३०/- रु.

मला निरनिराळ्या संसारांनी, माणसांनी कोडी घातली.
कोडी सोडवायचा प्रयत्न केला.
त्यांच्या कथा झाल्या. कोडी तशीच राहिली. पाटी कोरी करकरीत राहिली.
शब्द निसटले. चरे राहिले.
असाच एक चरा घेऊन माझा व जगाचा संबंध एक दिवशी तुटणार आहे
याची खंत आहे, भीती पण आहे.

वपु




## प्रधानाची निवड आणि चातुर्यकथा

# सुखाचा मंत्र

खूऽऽप जुनी गोष्ट आहे.

राजा प्रजापती राज्य करीत होता. पृथ्वीवरील साऱ्या भूमीवर तर त्याचं राज्य होतंच; वर अंतराळात, तसंच खाली पाताळ लोकांतदेखील त्याचंच राज्य होतं.

तिन्ही लोकांवर राज्य करणारा हा राजा खूप लोकप्रिय होता. अतल असो की भूतल वा पाताल, सर्वांच्या भल्याकडे तो सतत लक्ष द्यायचा. आपल्या राज्यांत कोणी उपाशी न राहो, कुणावर अन्याय न होवो, यासाठी सतत धडपड करीत राहायचा.

राजा प्रजापती जितका मायाळू, कनवाळू होता, तितकाच न्यायी आणि कडक शिस्तीचा होता. सारे त्याच्या आज्ञेत होते.

एके दिवशी सकाळी तो उठला आणि त्यानं आरशात पाहिलं. तो एकदम दचकला.





त्याच्या डोक्यावरील काही केस पांढरे दिसू लागले होते.

त्याला वाटलं, की आपण आता म्हातारे झालो. पुरे आता हा सारा व्याप. नको आता हे राज्य. बस्स... आता हे सारं सोडून द्यायचं... अं... पण राज्याचं काय...

प्रजापतीचं राज्य खूप मोठं होतं. ते स्वर्ग, पृथ्वी आणि पाताळात पसरलं होतं. एवढं मोठं राज्य सांभाळणारा आणि प्रजेचं कल्याण करू शकेल असा कुणीच सामर्थ्यवान त्याला दिसत नव्हता.

त्यानं खूप विचार केला. अखेर त्यानं ठरवलं की हे ज्यांचं राज्य त्यांनाच द्यावं. त्यांनाच ठरवू दे कुणी आणि कसं राज्य करायचंय ते.

राज्याचा विस्तार जसा मोठा होता, तसेच त्यांत विविध लोकसमुदाय होते. त्यांत प्रमुख होते देव, दानव आणि मानव.

देव आणि दानव शक्तिमान होते, तर मानव बुद्धिमान पण भित्रे. देवांना व दानवांना सुखाची चटक होती; पण दोघेही तसे आळशीच. चलाख देव नेहमी आडदांड आणि आडमुठ्या दानवांवर मात करीत. त्यामुळे देव-दानवांमध्ये नेहमी भांडणं व मारामाऱ्या होत.

प्रजापतीला राज्य या तिघांत वाटायचं होतं. पण ते अशा पद्धतीनं की, देव-दानवाच्या झगड्यांचा त्रास गरीब बिचाऱ्या मानवाला होऊ नये.

राज्याच्या वाटणीचा प्रश्न तसा अवघडच होता. प्रत्येकाला त्याच्या योग्यतेप्रमाणे वाटा तर मिळावा; पण तरीही त्यांचं समाधान व्हावं. नंतर भांडणं, कटकटी वगैरे उरू नयेत.

अखेर प्रजापतीला एक युक्ती सुचली.



राजानं एके दिवशी मानव, दानव आणि देवांच्या महत्त्वाच्या नेत्यांना बोलावून घेतलं. त्यांना आपल्या मनातला राज्य सोडण्याचा बेत सांगितला.

राजाच्या आकस्मिक निर्णयानं सारे आलेले पुढारी चकित झाले. त्यासाठी आपापल्या फायद्या-तोट्याचा विचार करण्याची पुरेशी संधी व त्याची तयारी करण्यासाठी लागणारा वेळ कुणालाच मिळाला नव्हता.

साऱ्यांनीच राजाला आपला निर्णय बदलण्याचा आग्रह केला; पण राजानं निर्णय बदलला नाही.

प्रजापतीनं सांगितलं की, आज तो आलेल्या सर्व पुढाऱ्यांना मेजवानी देणार आहे. त्या मेजवानीनंतर राज्याची वाटणी करेल.

सगळ्यांना राजाचं म्हणणं मान्य करावं लागलं. प्रत्येकानं आपल्याच समूहाला चांगला आणि मोठा वाटा कसा मिळायला हवा हे सांगणाऱ्या सूचना आडून आडून केल्या. प्रजापती साऱ्यांचं बोलणं शांतपणे ऐकून घेत होता आणि हसून मान डोलवीत होता. सारे गोंधळून गेले होते. पण प्रजापतीच्या मनातलं कुणालाच समजत नव्हतं.

अखेर राजाच्या सेवकानं येऊन जेवण तयार असल्याचं सांगितलं. लोक भोजनासाठी उठले.

जेवणाला जाताना दारात राजाचे सेवक उभे होते. त्यांनी आत जाणाऱ्या प्रत्येकाच्या हाताच्या कोपरापाशी एक एक काठी बांधली. त्यामुळे त्यांचे हात ताठ राहणार होते. कोपराजवळ हात वळणार नव्हते.

देव आणि दानवांनी पंगतीत जायला गडबड केली. दोन बाजूच्या दोन रांगात ते जाऊन बसले.

एक पंगत दानवांची होती तर दुसऱ्या बाजूची देवांची.

मधल्या पंगतीमध्ये बसले बिचारे मानव.



सेवक ताटं घेऊन येऊ लागले.

प्रथम त्यांनी दानवांपुढे ताटं ठेवली. मग देवांपुढे ठेवली.

मानव मधल्या पंगतीत होते. त्यांनी आपापसांत जराशी कुजबुज केली व सारे देवांच्या दिशेनं तोंड करून बसले.

ताटं येऊ लागली, तसा सुग्रास अन्नाचा वास सुटल्यामुळे साऱ्यांच्या भुका खवळल्या.

सारे पदार्थ छान छान...

त्यांचा तो खमंग वास...

ताटातली ती सुंदर मांडणी..

कधी एकदा आपण जेवतो असं प्रत्येकाला वाटू लागलं. एकेकाचा हात पुढे झाला.

घास उचलला गेला...

पण...

हातातोंडाची गाठच पडत नव्हती. एवढं चांगलं जेवण... पण जेवणार कसं...?

अनेकांना, विशेषतः दानवांना प्रजापतीचा खूप राग आला. पण काही बोललं तर... राज्याच्या वाटणीसाठी प्रजापतीचं असलं विचित्र वागणं सहन करायलाच हवं होतं.

आडदांड आणि हावऱ्या दानवांना कुठला धीर निघायला? त्यांची भूकही मोठी, त्यामुळे ती आवरणंदेखील कठीण.

त्यांनी सरळ पालथं पडून पानांत तोंड घातलं. पशूसारखं त्यांनी पदार्थांत तोंड खुपसून खायला सुरुवात केली.

दानवांची तोंडं पदार्थांनी माखून गेली. ते मोठे विचित्र दिसू लागले.



देवांनी हे पाहिलं. प्रजापतीनं आपली परीक्षा पाहण्यासाठीच ही अशी मेजवानी दिली आहे, हे त्यांनी ओळखलं. दानवांसारखी फजिती करून घ्यायला नको म्हणून ते स्वस्थ बसले.

मानवांनी आपल्या समोरची ताटं पाहिली. पदार्थ पाहिले. अचानक एका मानव नेत्यानं आपल्या शेजाऱ्याच्या कानात कुजबूज केली. काही क्षणांतच सारे मानव एकमेकांच्या कानी कुजबुजले.

साऱ्यांच्या तोंडावर हसू उमटले.

प्रत्येकानं आपला हात समोरच्या ताटात घातला. घास उचलला...

आणि समोरच्या देवाच्या तोंडी घातला. ते सारे चक्क समोरच्या देवांना भरवू लागले. देव ते सारं भराभर खाऊ लागले.

आपलं पोट पूर्ण भरल्यावर देवांनीही थोडंफार मानवांना भरवण्याचा प्रयत्न केला. पण तेवढ्यात जेवणाची दिलेली वेळ संपली.

तोंड घाण, कपडे घाण, अर्धं शरीर भात, भाज्या आणि अन्य पदार्थांनी लडबडलेलं. दानव या धडपडीनंतरदेखील अर्धपोटीच राहिले होते.

तर देवांनी आपलं कर्तव्य नीटपणे पार न पाडल्यानं मानव अर्धपोटी होते.

देव मात्र पोटभर जेवण झाल्यानं आनंदित होते.

राजा प्रजापतीनं सर्वांना हात तोंड धुवून येण्यास सांगितलं.

सारे त्याप्रमाणे आले. प्रजापती तिथं आला. आणि त्यानं आपला निर्णय सांगण्यास सुरुवात केली.

"मित्रहो, आजच्या जेवणाच्या निमित्तानं मी तुमची परीक्षा घेतली. तुमच्या वृत्तीची, प्रवृत्तीची परीक्षा. तुमच्या वागण्याची आणि तुमच्यावर



टाकण्यात येणाऱ्या जबाबदारीविषयी लायकीची परीक्षा. त्याप्रमाणे मी माझ्या राज्याची वाटणी करणार आहे.''

''मी केलेल्या वाटणीला विरोध करेल त्याला काहीही मिळणार तर नाहीच; वर दंड होईल.''

''दानव हो, तुम्ही आडदांड आणि अधीरे तर आहातच, वर मूर्ख आणि अधाशीही आहात. आपल्या बुद्धीचा उपयोग तुम्ही करतच नाही.''

''मी तुमच्या योग्यतेप्रमाणे तुम्हांला अंधाऱ्या पाताळलोकी पाठवतो आहे. ते राज्य तुमचं. ते सोडून तुमच्यापैकी कुणीही वर, इतरत्र येण्याचा प्रयत्न कराल तर, तुम्हाला मृत्युदंड मिळेल. जा... निघा इथून....''

प्रजापतीचं रागाचं बोलणं ऐकून फजित झालेले दानव तिथून पळालेच.

प्रजापती पुढे म्हणाला, ''देवहो, तुम्ही शक्ती व बुद्धीनं सर्वांत थोर; पण स्वतःहून काही करायला नको. भोगी, चैनी आणि आळशी झाला आहात. नवीन काही करणं नाही. नवी आव्हानं स्वीकारणं नाही. त्यामुळे बुद्धीचा उपयोग आणि कष्ट घ्यायला तुमची तयारीच नाही.

मी तुम्हाला अतल म्हणजे अंतराळाचं राज्य देतो. तिथं सुख आहे. भोग आहेत. अगदी कंटाळा येण्याएवढे भोग आहेत; पण जे व जेवढं आहे ते तेवढंच मिळेल. नवं काही नाही. तेच तेच कंटाळवाणं आयुष्य तुम्ही जगत राहाल.

या मानवांनी तुम्हाला जेवू घातलं; पण मोठेपणाच्या घमेंडीत तुम्ही आपलं पोट भरेपर्यंत त्यांना जेवू घालण्याचा विचारही केला नाहीत.



तुम्ही यापुढे कधीही मानवानं दिल्याशिवाय अन्नाचा उपभोग घेऊ शकणार नाही. तेदेखील नैवेद्य म्हणून वासानंच घेऊ शकाल. कोणत्याही सुखाच्या उपभोगासाठी तुम्हाला पृथ्वीवर मानवरूपातच यावं लागेल. चला, जा आपल्या राज्यात...''

प्रजापतीचं बोलणं ऐकून देव लगेच तिथून निघून गेले.

मग राजा प्रजापतीनं मानव समुदायाकडे पाहिलं.

''मानवहो,'' प्रजापती बोलू लागला, ''तुम्ही सर्वांत दुबळे. तुमच्याकडे दानवांची शक्ती नाही की देवांइतकी चलाख बुद्धी नाही. पण जे आणि जेवढं आहे, ते योग्यप्रकारे वापरण्याची इच्छाशक्ती आहे. नवी आव्हानं स्वीकारण्याची तुमची तयारी आहे.''

''माझ्या मुलांनो, तुम्हाला बुद्धी आहे. आळस नाही. तुमच्यात स्वार्थापलीकडे विचार करून दुसऱ्याला मदत करण्याची तयारी आहे.

''एकमेकांना मदत करून आपण सारे सुखी होऊ शकतो. नवं आव्हान धैर्यानं स्वीकारून विचारानं आपण त्यावर विजय मिळवू शकतो. आजचा हा नवा धडाही तुम्ही लगेच शिकलात. तुम्हाला नवनवी आव्हानं मिळावीत. ती घेऊन तुम्ही आपली अधिकाधिक प्रगती साधावीत यासाठी योग्य जागा म्हणजे भूतल. ही पृथ्वी. हे राज्य तुमचं. परस्परांना साहाय्य, दुसऱ्याच्या सुखाचा आधी विचार, डोळस प्रयत्न हाच सुखाचा मार्ग. हाच तुमचा धर्म. माणुसकीचा धर्म.

जा, आपल्या राज्यात. सुख द्या आणि सुखी व्हा.''

प्रजापतीच्या सांगण्याप्रमाणं वागून माणूस जेव्हा नवी आव्हानं स्वीकारतो, इतरांचा विचार करतो, दुसऱ्यांना सुख द्यायला धडपडतो, तेव्हाच तो खरा सुखी होतो.

# आवर्जून वाचावे असे काही!

## अविचल




आजारपणाच्या अगदी
अति उच्च सीमारेषेवर असणारे
हे पाच रुग्ण, समाजाकडून
उपेक्षित वागणूक मिळूनही
मरेपर्यंत समाजाचे
हित साधणाऱ्यांची यशोगाथा!

मूळ लेखक **रिचर्ड एम. कोहेन**
अनुवाद **डॉ. वसु भारद्वाज**

किंमत : ₹ २९०/-

## असाध्य ते साध्य



ध्रुवीय प्रदेशातील
(-१.७ से.) जगातील सर्वांत थंड पाण्यात
आणि पाचही महासागरात
पोहण्याचे विविध विक्रम करणारा पहिला
साहसवीर लुईस गॉर्डन पगची रोमहर्षक
जीवनकहाणी त्याच्याच शब्दांत...


मूळ लेखक **लुईस गॉर्डन पग**
अनुवाद **मोहन गोखले**


किंमत : ₹ ३९५/-


RNI NO-MAHMAR/2000/2739
Regd.No.:PCW/086/2015-2017/ Posted at Marketyard Pso, Pune
Publishing Date : 11 September. 2015 Posting Date : 11 September. 2015




# आमची नवीन पुस्तके







BOOK POST
Printed Matter

**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, ______________________

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.